
म. ग्र. सं. ठाणे
विषय भू-प्रवास
सं. क ६६२




REFBK-0024486

## १

# नीलाक्षींच्या देशात

मुंबईहून फ्रँकफुर्टला आम्हाला घेऊन जाणाऱ्या ' जंबो 'मध्ये संगीतशौकिनासाठी मेजवानीच होती. कानाला हेडफोन्स लावायचे आणि त्याच दुसरं टोक डाव्या हाताशी असलेल्या एका छिद्राला जोडलं की, भीमसेन किंवा लता यांची खास आपल्या कानात मैफल सादर. शिवाय छिद्राखालचं बटण फिरवलं की, वेगवेगळे सात चॅनल्स—एकावर फिल्म संगीत, दुसऱ्यावर शास्त्रीय, तिसऱ्यावर लोकसंगीत तर चौथ्यावर पाश्चात्य संगीतसुद्धा. समोरच्या सीटच्या मागच्या खिशात एक छोटी पुस्तिका. त्यात कुठल्या चॅनलवर कुठली गाणी ध्वनिमुद्रित केलेली आहेत याची यादी. याहून अधिक काय हवं ? या ' विविध ( आंतर ) भारती 'चा आस्वाद घेत असतानाच पहाटे माझा डोळा कधी लागला ते कळलंसुद्धा नाही. जाग आली तेव्हा उठून तोंड धुण्यासाठी म्हणून मी ' टॉयलेट 'कडे गेले.

आत कुणीतरी असावं, कारण बाहेर एक स्त्री ताटकळत उभी होती. सिल्कची साडी, स्लीवलेस ब्लाऊज, केस बॉब केलेले. मला म्हणाली, " फ्रँकफुर्टला जाणार ? "

मी म्हटलं, " हो ! तुम्ही ? "

" मीसुद्धा ! तुम्ही कोणाकडे ? " तिनं विचारलं.

" माझे दीर असतात तिथे. तिथून मग आम्ही साइटसीइंग करणार. तुमचं कोण आहे ? "

" माझे मिस्टर तिथे नोकरी करतात. आम्ही तिथेच स्थायिक झालो आहोत. सुट्टीत हिंदुस्थानात आलो होतो. मिस्टर अजून तिथेच आहेत. मी पुढे आले. "

तिकडची स्थायिक म्हटल्यावर छानं वाटलं मला. हिला सगळं विचारता येईल. शॉपिंगची माहिती स्त्रियानाच अधिक असते. टेलिपथी झाली असावी. कारण तीच मला म्हणाली,

" मी माझा टेलिफोन नंबर देऊन ठेवीन. तुम्हाला शॉपिंग वगैरे करायच असेल तर मी सोबत येऊ शकेन. "

तेवढ्यात ' टॉयलेट 'चं दार उघडलं आणि ती आत गेली. नतर मात्र गड-बडीत मी तिचा फोन नबर घ्यायच विसरले. कुठं बसली आहे विमानात, तेही पाहिलं नाही.

फ्रँकफूर्टला उतरल्यावर ' तिथे पोर्टर वगैरे नसतो ' हे अगदी पाठ झालं होतं. तेव्हा आमच सामान आम्ही तिथल्या ढकलगाडीं वर ठेवून बाहेर जायच्या पवित्र्यात होतो. इतक्यात हे म्हणाले, ' मी जरा ड्यूटी-फ्री शॉपमध्ये जाऊन बघून येतो काय–काय आहे– ' आणि गर्दीतच अंतर्धान पावले. मी आणि माझी लेक – अनू – आम्ही तिथच वाट पाहात उभ्या राहिलो.

इतक्यात माझी ती मघाची मैत्रीण दिसली.

" इथं का थाबलात ? "

" माझे मिस्टर जरा ड्युटी शॉपमध्ये गेलेत. "

" तुम्हाला माझा फोन नंबर हवा होता न ? घ्या लिहून. काही गरज लागली तर– "

मी चटकन पर्समधून डायरी काढली आणि तिचा नंबर टिपून ठेवला. परक्या ठिकाणी आपली माणसं नेहमीच मदतीला तयार असतात. मी तिचे आभार मानले. ती जायला वळली आणि तेवढ्यात म्हणाली, " तुम्ही इथंच आहात न ? ही बॅग जरा ठेवते. माझ सामान आलं का ते बघून येऊन येते."

" हो, ठेवा की. " माझ्या हँडबॅगजवळ मी तिची बॅग ठेवली. ती सामान बघायला गेली.

हे थोड्या वेळान आले अन् म्हणाले, " चल, निघू या."

मी म्हटलं, " त्या बाईला येऊ दे. तिची बॅग इथ आहे. "

" ती राहू दे इथच. इथ कुणी चोरणार नाही. "

" वा, असं कस ? मी थाबते. तुम्ही व्हा पुढे. "

मी अनूलाही त्याच्याबरोबर पुढे पाठवलं आणि मी एकटीच तिची वाट पाहात थांबले.

बराच वेळ उलटून गेला. गर्दी हळूहळू पागली. रहदारी तुरळक होत गेली. माझ्या मैत्रिणीचा पत्ता नव्हता मला जरा अवघडल्यासारखं वाटू लागलं. आता बघणाऱ्याच्या नजरा विचित्र वाटू लागल्या. साडीबद्दल सगळ्यानाच कुतहल असत हे खर, पण तरी असं एकटीनं फार वेळ वाट पाहात उभ राहण एकूण कठीणच. मी इतका वेळ येत नाही म्हटल्यावर हे तरी आत मला बोलवायला येतीलसं वाटल पण तेही नाही.

मी अगदी रडकुंडीला आले. फ्रँकफूर्ट नगरीत पाऊल टाकतानाच हा ' प्रथमग्रासे मक्षिकापात ' व्हावा याला काय म्हणावं ? शेवटी ' हर हर महादेव ' म्हणत बॅग्ज् उचलल्या. डाव्या हातात माझी आणि उजव्या हातात तिची– आई ग ऽ ! दगड भरलेत की काय ? ढकलगाडी न्यावी तर विजेच्या जिन्यावर ( एस्कलेटर ) ती कशी न्यायची ? ( नतर हेदेखील शिकले ! पण हा पहिलाच दिवस ना ? ) लेफ्ट–राइट करीत निघाले. खादा मोडून पडतो की काय अस झालं आणि डावीकडे, उजवीकडे, समोर, खाली, वर करीत करीत मी किती दालन ओलाडली याला गणतीच नाही. हा एअरपोर्ट की रेसकोर्स ? चालत चालत मी हिंदुस्थानात पोहोचते की काय ? इतक्यात बॅगेजचा पट्टा दिसला.

अनू तिथेच उभी होती मला ' हुश्श ' झालं.

" पपा कुठे आहेत ? "

" ते तुला शोधायला गेलेत. "

झाऽलं ! म्हणजे आमची कुठेतरी चुकामूक झाली होती. मी तिथल्याच एका अधिकाऱ्याला पकडून ' माझा नवरा हरवला ' असल्याच सांगितलं आणि ध्वनिक्षेपकावरून त्यांचं नाव अनाऊन्स कराल का म्हणून विचारलं. सुदैवान त्याला इंग्लिश समजत होत. तो ' हो–हो ' करून नाव लिहून घेऊन गेला.

तेवढ्यात हे ' दत्त ' म्हणून उभे !

" काय हे ? " मी म्हटलं.

" काय हे काय ? तुला बोलवायला गेलो तर त्याच वाटेन परत आत जाऊ देईनात. मग दुसऱ्या वाटेनं गेलो तर तिथे तुझा पत्ता नाही."

" मी तरी किती वेळ वाट पाहायची ? ती बाई इथे असेलसं वाटलं होतं. गेली की काय निघून ? कमाल आहे ! "

" तुला मी म्हणत होतो ती बॅग तिथेच ठेव म्हणून "

" असू दे ! आता जाऊ या. तिचा नंबर आहे माझ्याकडे."

आम्ही सर्व सामान घेऊन बाहेर आलो. सुरेश माझा दीर वाटच पाहात होता. घरी सुखरूप येऊन पोहोचलो.

दिवसभर हिंडणं, फिरणं आणि अखंड गप्पा मारणं असं सत्र सुरू झालं. दुसऱ्या दिवशी मला तिच्या बॅगेची आठवण झाली. बिचारीनं किती काळजी केली असेल ? मी तिचा फोन घेतला होता, तरी माझा फोन दिला नव्हता मला ती कॉंटॅक्ट तरी कशी करणार ? कदाचित त्या बॅगेमध्ये काही नसेलही फारस. मला त्या बॅगेचा इतका राग आला होता की मी तिच्याकडे ढुंकूनही पाहिलं नाही.

दुसऱ्या दिवशी मी तिला फोन केला. ती आणि तिचा दीर येऊन ती बॅग घेऊन गेले. म्हणाली,

" माझं ऑपरेशन झालं आहे. मला जड उचलता येत नाही. त्या बॅगेत औषधं आहेत. "

छान ! म्हणून माझ्या गळ्यात ही धोंड अडकवली काय ? हसून वेळ साजरी करावी लागली. " नशीब, तुमचा फोन नंबर माझ्याकडे होता–" वगैरे–वगैरे.

नंतर ज्या वेळी मी आणखी कुणाला तरी ही हकीगत सांगत होते, तेव्हा डोक्यात कुठंतरी ' लख्ख ' झालं ! बॅगेत काय होतं ? मी यावर विचार केला नव्हता. हिंदुस्थानातून फ्रॅंकफर्टला काय ' स्मगल ' करणार ? नंतर कळलं मादक पदार्थांची वगैरे चोरून आयात होते. म्हणजे त्या बॅगेत तसलं काही... ?

बाऽपरे ! माझं धाबंच दणाणलं.

कस्टमवर आम्हाला काहीच उघडायला लावलं नाही हे नशीब ! समजा, त्या बॅगेत काही असतं तर ' ही एका बाईनं मला सांभाळायला दिली होती आणि ती बाई गायब झाली–' या माझ्या ' सुरस आणि चमत्कारिक ' कथेवर कुणी विश्वास ठेवला असता ? आणि युरोपात प्रवेश केल्याच्या पहिल्याच दिवशी जर काही कायद्याचं झेंगट मागे लागलं असतं तर ? विचारानंच मी घाबरी झाले.

आता फक्त एकच हुरहूर वाटते आहे. तिची बॅग माझ्याजवळ बारा तास होती. कुलूप होत की नाही तेही आठवत नाही. लबाडीचा संशय आधी आला असता तर माझी डीसेन्सी ' थोडी गुंडाळून ठेवून बॅग तपासली असती तर ?

युरोपच्या सफरीसाठी म्हणून आम्ही फ्रँकफूर्टच्या विमानतळावर पहिलं पाऊल ठेवल तेव्हा आमच्या खिशात फक्त मुंबई-फ्रँकफूर्ट—मुंबई असं विमान तिकीट होत. माझे दोन दीर युरोपात स्थाईक झाले असल्यान, त्याच्या सल्ल्यानुसार पुढची भटकंती करायची अस ठरल होत. प्रवासाची कसलीही आखणी झालेली नसल्यामुळ पहिल्या दिवशी मला जत्रेत शिरलेल्या लहान मुलासारख नवख आणि छान वाटल

अवतीभवती इतकी गोरी माणसं हेच मुळी पहिलं नवल. निळे डोळे आणि सोनेरी किंवा भुरे केस आजवर बहुधा सिनेमातच मनसोक्त न्याहाळलेले. प्रत्यक्षात भेटलेल्या गौरकाय व्यक्तीकडे, इच्छा असूनसुद्धा टक लावून पाहण्याचा मोह आवरलेला—सभ्यपणाचं कवच टिकाव म्हणून. पण इथ बाबागाडीतल्या बाळापासून कष्टाचं काम करणाऱ्या एखाद्या मजुरापर्यंत कुठेही हे निळे डोळे पुन्हा—पुन्हा भेटतात, आणि गंमत अशी की तेच मुळी आपल्या साडीकडे किंवा सावळ्या वर्णाकडे अपूर्वाईन पाहतात. परकीयाकडे टक लावून पाहंण हे गावंढळपणाच लक्षण हा माझा समज युरोपात पार खोटा पडला. चागल्या सुशिक्षित आणि सॉफिस्टिकेटेड स्त्रियासुद्धा माझ्या साडीच अगदी वळून—वळून बोट दाखवून कौतुक करताना भेटायच्या.

सुरेश हा माझा दीर ' बाड हॉंबुर्ग ' या फ्रँकफूर्टच्या उपनगरात राहतो. हिंदुस्थानात असताना आम्ही नकाशात ' हॅंबुर्ग ' पाहिलं होत, परतु ते हॅंबुर्ग ' ( Hamburg ) वेगळे आणि हे ' बाड हॉंबुर्ग ' ( Homburg ) वेगळ हे इथे आल्यावर कळल. कुठल्याही मोठ्या शहराच उपनगर हे एखाद्या सुप्रसिद्ध नटीच्या धाकट्या बहिणीसारख असतं. मोठ्या शहराच्या सर्व सौंदर्यखुणा इथं असल्या तरी ते ' ग्लॅमर ' नसल्यामुळ एक अनोखं, शातसं लाडिकपण असत. सुरेशच्या घरासभोवताली काही उंच इमारती नव्यानं उभ्या राहिल्या आहेत. तरी बहुतेक ' सुबक ठेंगणे ' बंगलेच आहेत. घरासमोर तर चक्क प्रशस्त असं एक शेतच आहे. तिथे वाफ्यातून नुकती पेरणी झाली होती. आणि बटाट्याची

छोटी रोप मातीतून वर फुटणारे आपले हिरवे तुरे मिरवीत होती. शेताच्या बांधावरून आम्ही संध्याकाळी भटकायला जात असू. पलीकडे चेरीच्या झाडाचं एक वनच होतं. त्याना लालचुटूक छोटी चेरीची फळं अखंड लगडलेली असत उडी मारून फांदा पकडावा आणि अतिमधुर अशा या फळाचा आनंद चाखीत गप्पाची फिरती मैफल रंगवावी. झाडं फळांनी बहरलेली आणि तिथून जाणाऱ्या माणसानी त्याच्याकडे ढुंकूनसुद्धा पाहू नये, हे युरोपीय सुबत्तेच लक्षण पुढे अगवळणी पडलं. 'कृपया हात लावू नये' अशी पाटी कुठ दिसली नाही. क्वचित एखाद्या निर्जन हायवेच्या काठाला किंवा जंगलात अशी फलसभार मिरवणारी झाडं तर मला केविलवाणी वाटत— दीदावर नसलेल्या समर्थ कलावंता-सारखी! 'कृपया हात लावा' असं ती विनवताहेत असं वाटे.

शेतीच्या पलीकडे शेतकऱ्याच घर होतं. आपल्याकडे शेतकरी, मजूर, हमाल, मोलकरीण या मंडळींच आणि गरिबीचं अतूटसं नातं आहे पण या पुढारलेल्या देशानी दारिद्र्याशी तसा घटस्फोटच घेतला असल्यामुळे शेतकऱ्याच घर हेसुद्धा सर्व सुखसोयानी युक्त असं. संध्याकाळच्या समयी हा घरमालक अंगणात आपला पाईप घेऊन बिअर पीत बसलेला दिसे घरात त्यान कोंबड्या, डुकरही पाळलेली होती. पण कुठे गलिच्छपणा नावालाही नव्हता (डुक्कर हा प्राणी तर आपल्या मनात एक विशिष्ट संदर्भ घेऊन येतो.) युरोपच्या या देखणेपणाचं, स्वच्छतेचं, सुबत्तेचं कौतुक करताना नेहमीच माझ्या मनाच्या कोपऱ्यात एक उदास एकतारी वाजत राही, 'माझा देश असा कधी होईल?'

सुरेशची पत्नी आणि मुलगा म्युनिकला असतात. त्याचं कामाच ठिकाण बाड हाबुर्ग. तेव्हा तो इथे एकटाच. 'वन् रूम अपार्टमेंट' मध्ये राहतो. या खोलीला एक अगदी छोटं स्वैपाकघर, बाथरूम व प्रशस्त व्हरांडा-देखील आहे. स्वैपाकखोलीत प्रत्येक इंच-इंच लढवून जागेचा उपयोग करून घेतलेला. तरी एका वेळी दोघाना तिथं उभं राहणं कठीण. सुरेशान मला तिथ आत जाऊच दिलं नाही. एकटा राहून, झटपट स्वैपाक करण्यात तो पटाईत झाला आहे. नाहीतरी इथ हिंदुस्थानात 'इकडची काडी तिकडे' न करणारी आपली पुरुषमंडळी तिथं घरकामात भलतीच वाकबगार दिसली. शिवाय अनेक प्रकारचे उकडलेले, स्वच्छ केलेले पदार्थ मिळत असल्यामुळे स्वैपाक हे प्रकरणही सोपं आणि कमी वेळखाऊ झालेलं आहे.

समस्त युरोप खंडात मला बाथरूममध्ये आपली बादली–तांब्या ही चिरपरिचित जोडगोळी कुठं भेटली नाही. आमच्याकडे मुंबईला एक युरोपियन पाहुणे आले होते. ते आपली पत्नी आंघोळीला गेली असता बाहेर उभे राहून ' त्या मोठ्या धातूच्या भांड्यात आधी गरम पाणी भरून घे, नंतर ते छोटं भांडं बुडवून ते उचलून अंगावर पाणी घे ' अशा सूचना देत असलेले पाहून मला भलतंच हसू कोसळलं होतं आता कळलं त्याचं कारण. सगळीकडे शॉवर्स, तेसुद्धा टबला जोडलेले. गरम आणि गार दोन्ही प्रकारचं पाणी त्यातून येतं. आपल्याला हवं तसं ते मिश्रण ॲडजस्ट करून घ्यायचं. माझ्या एका अनुभवी मावसबहिणीनं कानात सांगितलं होतं, ' संडासात जाताना नेण्यासाठी एक प्लास्टिकचा पेला जवळ ठेव. पाण्याची काही सोय नसते. ' हे वरीक खरं ! मुळात ही पाश्चात्त्य कमोड पद्धतीच मला आवडत नाही. तशात संडास वेगळा असेल तर तिथे पाण्याचा नळ बहुधा गैरहजर ! नुसतीच कागदसफाईची व्यवस्था आपल्याला पटणं कठीण. स्वच्छतेच्या बाबतीत इतके जागरूक हे लोक, पण इथे मात्र घोडं पेंड खातं. बरं या बाबतीत कुणाशी चर्चा करणंदेखील अशक्यच. दीड महिना हा त्रास निमूटपणे सहन केला झालं ! सुरेशकडे मात्र संडास–बाथरूम एकत्रच होती.

गेलो त्या दिवशी संध्याकाळी आम्ही सुरेशचं ऑफिस पाहिलं. त्या वेळी ऑफिसमध्ये कुणीच नव्हतं. फक्त एका खोलीत कॉम्प्युटर्स धडधडत होते. एका खोलीत मी टाईप केलेला संदेश मला दुसऱ्या खोलीच्या टी. व्ही. सेटवर दिसला. कॉम्प्युटर हा माणूस असल्यासारखा सुरेश त्याच्याविषयी बोलत होता " तुला काही माहिती हवी असली तर कॉम्प्युटरला विचार. तुझंच नाव फीड करून आपण तुझी माहिती विचारू. " अर्थातच कॉम्प्युटरने माझ्याविषयी काहीच माहिती नसल्याचं प्राजळपणे कबूल केलं.

ऑफिस बघून आम्ही दुसऱ्या दिवशीच्या खरेदीसाठी बाजारात गेलो जिथे टाचणीपासून हत्तीपर्यंत सर्व काही मिळतं ' असं आपण वाचतो तसली डिपार्टमेंटल स्टोअर्स या छोट्या ' बाड हॅंबुर्ग ' मध्ये देखील आहेत. मी सावकाश तिथल्या वस्तू पाहात होते तर सगळीकडे एकदम धावपळ सुरू झाल्याचं दिसलं. काय झालं कळेना ! तोच लक्षात आलं, सहा वाजायला आले होते. सहाच्या ठोक्याला म्हणे सर्व कर्मचारी बाहेर पडतात. त्यामुळे त्याआधी सर्व खरेदी

आटपायला हवी होती. कॅशरजवळ भला मोठा क्यू होता आणि भराभर बिल तयार होत होती. इथली विक्रेते मंडळीही आपल्या ' हॅंडलूम हाऊस ' सारखी ' निर्मम ' वृत्तीची असतात. ' हवं तर घ्या नाहीतर चालायला लागा ' अशा टाईपची ! म्हणजे उद्धटपणा नसला तरी मधात घोळलेलं आर्जवी हसू वगैरे कुछ नही ! ' गिऱ्हाईक म्हणजे आमचं दैवत ' वगैरे तर मुळीच नाही. शिवाय ' घासाघीस ' हा रोमहर्षक प्रकार अजिबात नसल्यामुळे दोन्हीकडून काम सोपं आणि झटपट. तर अगदी सहाच्या ठोक्याला विक्रेतीचं गिऱ्हाइकाला तसंच सोडून जाणं मला तरी कसंसंच वाटलं. ' समजा सहा पाचला तिनं आपल्या मित्राला अपॉइंटमेंट दिली असेल तर तिला पळायला नको का ? ' अशी सुरेशनं त्या विक्रेत्या मुलीची बाजू सांभाळली.

थोडंसं गावात मनसोक्त हिंडलो. एका छोट्या इटालियन हॉटेलमध्ये जेवण घ्यायचं ठरलं. अजून लख्ख उजेड होता. मी म्हटलं, " एवढ्या लवकर नको. " रात्रीचं जेवण सूर्यास्तापूर्वी कसं गोड लागेल ? पण घड्याळात पाहिलं तर नऊ वाजून गेले होते. तिथला दिवस खूप मोठा. ' पिझ्झा ' खाऊन आम्ही घरी निघालो, तेव्हा कुठे अंधारू लागलं होतं. बाहेर बरीच थंडी होती. गाडीत मात्र छान उबदार वाटत होतं. शिवाय आत गरम हवा सोडायची सोय होती.

घरी परतलो तेव्हा खाली पत्रपेटीत अभावितपणे पत्रं आहेत का ते पाहिलं खरं तर एवढ्यात घरून पत्रं येणं शक्यच नव्हतं पण पत्रपेटी ओलांडून पुढं जाणं एकूण कठीणच. इथं दार ठोठावून अवेळी कुणी येणं हे अशक्यच. आपल्याला हव्या त्या वस्तू बाजारात जाऊन आणाव्यात पोस्टमनसुद्धा पायऱ्या चढायचे कष्ट घेत नाही. सगळ्या पत्रपेट्या तळमजल्यावर. दूधवाला, पेपरवाला, पाववाला वगैरे षड्रिपू झोपेतून कधी उठवणार नाहीत. ज्यांना खराखुरा एकान्त हवा असेल त्यांच्यासाठी हे आदर्श वसतिस्थान. पण क्वचित हा एकान्त जीवघेणासुद्धा वाटत असेल, विशेषत वृद्ध मंडळींना.

रात्री व्हराड्यातून आभाळाकडे दृष्टी टाकली आणि चकित झाले या ओळखीच्या मंडळींना लगेच ' हाय ' म्हणून टाकलं. भारतात असताना गेले काही दिवस भरपूर आकाशदर्शन केलं होत. सर्व ग्रह एका ओळीत आल्याचं पेपरमध्ये वाचून दुर्बिणीतून मंगळ, शनी, गुरू हे सर्व ग्रह पाहिले होते. आता हजारो मैल प्रवास करून या सर्वस्वी परक्या ठिकाणीसुद्धा माझे हे मित्र मला

अभिवादन करायला हजर होते. फक्त त्यांची जागा थोडीशी बदलली होती. आभाळाची सोबत मला नेहमीच सुखावते आणि आज परदेशातल्या पहिल्या रात्री तर या नक्षत्रांना पाहून नातलग भेटल्यासारखा आनंद झाला

सुरेशसाठी आम्ही त्याची आवडती ' बैजू बावरा 'मधली गाणी टेप करून आणली होती. या गाण्याच्या पार्श्वभूमीवर रंगलेल्या गप्पा आम्हाला कित्येक वर्षं पाठीमागे घेऊन गेल्या. युरोपातला पहिला दिवस असा घरच्या आठवणींनी संपला.

दुसऱ्या दिवशी ' रोदनबुर्ग ' हे ऐतिहासिक स्थळ पाहायला निघालो. युरोपात आम्ही सर्व प्रवास मोटार, आगगाडी, आगबोट, बस व विमान अशा सगळ्या प्रकारच्या वाहनातून केला. फ्रँकफूर्ट ते रोदनबुर्ग मोटारीनच गेलो तिथले ' ऑटोबॅनूस ' ( म्हणजे ' हायवे 'ज् ) म्हणजे मोटार प्रवासाला एक वरदानच आहे. भरपूर रुंदीचे तीन-चार ' लेन्स ' असलेले. शिवाय जाणाऱ्या व येणाऱ्या वाहनांना वेगळं ठेवणारी मधली रेषा कुंपणानं बांधून घेतलेली. वाहतुकीचे नियम अतिशय कडक. त्यांचं पालनदेखील व्यवस्थित होत असलेलं. असं असताना तिथे अपघात होतात तरी कसे असा मला प्रश्न पडे. इथे आपल्याकडे गाडीचा वेग ऐंशी-नव्वद गेला की आपल्याला अस्वस्थ वाटतं. पण तिथे एकशे वीसपर्यंत गाडी अगदी लीलया जात असे. मधूनमधून ठराविक अंतरावर विश्रांतिस्थानं आहेत. त्यांची सूचना बरीच आधी मिळते. म्हणजे वेग कमी करून बाजूला जाणं सोपं जातं. एखाद वेळेस रस्ता चुकला तर गाडी उलट वळवणं म्हणजे अगदीच दुरापास्त !

वाटेत आम्ही विश्रांतीसाठी एका वृक्षवाटिकेत थांबलो खाण्याचे पदार्थ आणले होते ते बाहेर काढले. पलीकडे काही अंतरावर एक छोटं कुटुंब आमच्याप्रमाणे विश्रांतीसाठी थांबलं होतं. त्यांचं मूल मोठं गोड, गुटगुटीत. ( युरोपातली सर्वच मुलं मला सुदृढ, गुबगुबीत दिसली. हातापायाच्या काड्या झालेलं किरकिरणारं असं शेंबडं मूल मला कुठेच दिसलं नाही. ) इथले लोक ओळख असल्याशिवाय एकमेकांकडे बोलणं कमीपणाचं मानतात असं ऐकत आले होते. मला ते अगदीच ' आखडूपणा 'च वाटे. तेव्हा हा नियम धाब्यावर बसवायचा, बघू तरी काय होतं ते, असा चंग बांधूनच मी आले होते. गंमत अशी की मला सगळीकडे चांगला प्रतिसाद मिळाला शेवटी हाडामासाच्या माणसाला एकाकी प्रवासात संवाद अप्रिय कसा असू शकेल ? आपल्यासारखा बोलघेवडेपणा फार

क्वचित दिसला तरी ओळख नाही म्हणून कुणीही तोंड फिरवलं नाही हसून तोंडभर उत्तरं दिली. तर या कुटुंबाशीसुद्धा मी जर्मन येत नसल्यामुळे सुरेशच्या मध्यस्थीनं ओळख करून घेतली. त्या छोट्या बाळाला उचलून त्याचे लाड करायची हौस पुरवून घेतली तेही बेटं माझ्याकडे मुळीच रडलं नाही. फक्त केविलवाण होऊन 'आईकडे ने' असं बोटानं दाखवीत होत.

'रोदनबुर्ग'ला पोचलो तर तिथे अनेक परदेशी प्रवाशांची गर्दी उसळली होती. सर्वांना–विशेषत म्हाताऱ्या बायकांना माझ्या साडीच फार अप्रूप. इथ म्हातारी माणस हातीपायी धडधाकट असेपर्यंत सर्व प्रकारची सुखं उपभोगताना दिसतात. आपल्याकडे एखाद्या सत्तरीच्या आजीबाई रस्त्यातून आईस्क्रीम–कोन खात चालल्या आहेत अस दृश्य कधी दिसेल का? 'रोदनबुर्ग'ला कित्येक म्हातारे-म्हाताऱ्या मला चवीन आईस्क्रीम खाताना दिसल्या. बाराव्या शतकातलं हे शहर. सर्व जुन्या इमारती, पूल, कारजी, चर्चेस् वगैरे साभाळून ठेवलेल आहे. शहराच्या सभोवती मोठी भिंत आहे. तिला मधूनमधून मोठी प्रवेशद्वार आहेत. भिंतीवर चढून शहराला प्रदक्षिणा घालता येते. शहरातल्या मधल्या चौकात काही ठरावीक दिवशी पारंपरिक लोकनृत्य, नाटकातले देखावे वगैरे कार्यक्रम असतात. १६३१ साली जनरल टिली यान हे शहर काबीज केल. शहराची राखरांगोळी करण्याचा आणि नगरपालिकेच्या चार अधिकाऱ्याची कत्तल करण्याचा हुकूम सोडला. किती विनवण्या केल्या तरी तो ऐकेना त्याच्या सन्मानार्थ म्हणून त्याला एका भल्या मोठ्या नक्षीदार चषकातन मद्य देण्यात आलं. (हा चषक पाऊण गॅलनचा असून आजही तिथल्या म्युझियममध्ये पाहायला मिळतो.) टिलीनं एक अट घातली, जर या नगरपालिकेच्या अधिकाऱ्यापैकी कुणी एकानं हे सर्व मद्य न थांबता एका श्वासात पिऊन दाखवलं तर त्याची सुटका होईल. या चौघांपैकी रोदनबुर्गचा जो महापौर होता त्यानं हे आव्हान स्वीकारलं, आणि सर्व मद्य गटागटा दहा मिनिटात पिऊन दाखवलं. जनरल टिलीन अर्थातच दिलेला शब्द खरा केला या चार अधिकाऱ्याची सुटका केली आणि शहरातल्या कुठल्याही इमारतीला धक्कासुद्धा लावला नाही अशा रीतीनं शहर सुखरूप राहिल. या दिवसाची आठवण म्हणून वर्षातून एकदा ३१ ऑक्टोबरला मधल्या चौकात या नाटकाचा प्रयोग होतो.

शहरातल्या एका उंच इमारतीवर एक मोठं घड्याळ आहे. त्याच्या दोन्ही

बाजूंना दोन खिडक्या आहेत. सकाळी अकराचे-बाराचे ठोके वाजतात तेव्हा एका खिडकीत जनरल टिलीची प्रतिमा आणि दुसऱ्या खिडकीत मद्य पिणाऱ्या महापौराची प्रतिमा दिसते हे दृश्य पाहायला अर्थातच सर्व प्रवासी तिथे गर्दी करतात.

अशा छोट्या-छोट्या गोष्टीत कल्पकता दिसून येते. आणि म्हणूनच रोदनबुर्ग हे प्रवाशाचं आकर्षण ठरलं आहे. जुन्या इमारती आणि इतर वस्तू जशाच्या तशा जपून ठेवणं आणि तरी त्यांना कल्पकतेची जोड देऊन नव्या योजना राबवण—हे युरोपात ठिकठिकाणी दिसत. खर तर आपल्याकडे ऐतिहासिक वास्तू कितीतरी आहेत. शनिवारवाडा किंवा प्रतापगड याचा इतिहास सांगणारी एखादी योजना तिथे कार्यान्वित करता येईल. पण आपल्याकडे कल्पनादारिद्र्यसुद्धा भरपूर ' नाही म्हणायला दिल्लीच्या लाल किल्ल्यावरचा ‘ साईट अँड साऊंड ’ हा शो एक अपवादात्मक उदाहरण म्हणून सांगता येईल.

त्या दिवशी घरी परतल्यावर स्वप्नातसुद्धा मला रोदनबुर्गमधली मध्ययुगीन द्वंद्वयुद्ध आणि राजेरजवाड्यांचे लहरी षौक दिसत होते !

दुसऱ्या दिवशी सकाळी फ्रँकफर्टला एका प्रवासी कंपनीत गेलो. पुढच्या प्रवासाची आखणी करण्यासाठी तिथल्या मध्यवर्ती चौकात गाडी पार्क करणं हे एक दिव्यच. मला लक्ष्मणचं एक व्यंगचित्र आठवलं. फोर्टमध्ये कामाला आलेला एक माणूस म्हणतो, “ मी आता घरी जाऊन गाडी पार्क करून आलो—” तसाच इथे प्रकार. तेव्हा गाडी थांबवून बरच अंतर चालून जावं लागलं इथे पादचाऱ्यासाठी म्हणून असलेल्या झिगझॅग क्रॉसिंगवर आम्ही नुसतं पाऊल ठेवलं की, सर्व मोटारगाड्या आमच्यासाठी थांबत. हा अनुभव नवा होता. मोटारींना ताटकळत ठेवून आरामात रस्ता ओलांडताना थोड ओशाळल्यासारखं होई. पण जिथे पादचारी कमी तिथेच हे शक्य आपल्याकडे मोटारवाल्यांनी असं आदबशीर व्हायच ठरवल तर गाडी हलणारच नाही

प्रवासी कंपनीत आमचं ठरल की इथून प्रथम लंडनला जायचं. फ्रँकफर्ट ते ओस्तेंद हा प्रवास आगगाडीने, पुढे डोव्हरपर्यंत इंग्लिश खाडी आगबोटीन ओलांडण आणि नंतर पुन्हा आगगाडी. आता स्टेशनवर जाऊन तिकिट खरेदी करायची म्हणून खाली उतरलो तो पाऊस पडू लागला होता. हवेतला गारठा अचानक वाढला तेव्हा प्रथम हॉटेलमध्ये जेवण घ्यायचं ठरलं.

मी शाकाहारी असल्यामुळे ( अडं तेवढं खाते ) बऱ्याचजणांनी मला युरोपमध्ये तुला उपास काढावा लागेल,' असं धमकावलं होतं. मी मात्र मुळीच भ्यायले नव्हते, कारण भाजीपाला, फळं, दूध आणि दुधाचे पदार्थ व अड्याचे पदार्थ कुठेही मिळू शकतील याची मला खात्री होती; आणि तसंच झालं. कुठंही उपास घडला नाही. काही ठिकाणी भात मिळणं कठीण. ( ' भात हवाच ' असं माझं नाहीच.) बहुतेक जागी मला भाजीपाल्याचं सूप, बटाट्याचे चिप्स व सॉस, अड्याचं ऑम्लेट, पाव, लोणी, चीज, दही हे खाद्यपदार्थ हमखास मिळायचे. अगदीच काही मिळालं नाही तर मी चिकन वगैरे खाण्याची तयारी ठेवली होती. कारण माझा शाकाहार हा तत्त्वासाठी वगैरे नसून सवयीचा आहे. सर्व मांसाहारी प्रकाराची चव घेऊनही आजवर मी त्यात रस घेऊ शकलेली नाही एवढंच. परंतु हे खाण्याचा प्रसंग युरोपात कुठेही आला नाही. माझी लेक आणि तिचे पपा ( दोघेही मांसाहारातले दर्दी ) यांची मात्र तिथे चंगळ झाली. फ्रँकफुर्टच्या हॉटेलमध्ये एक पाकिस्तानी वेटर भेटला. चिकन् आणि ऑम्लेटची ऑर्डर दिल्यावर काही वेळानं तो येऊन सांगू लागला, ' इथे त्यांना ऑम्लेट बनवता येत नाही.' ( विश्वास बसतोय ? ) मी म्हणाले, ' मी तुमच्या किचनमध्ये येऊन करून दाखवते. ' तेव्हा तो ओशाळला आणि काही वेळानं ऑम्लेट घेऊन आला. आपला पिढीजात आळस ही आशियायी मंडळी युरोपातही टिकवून आहेत की काय न कळे !

सध्याकाळी ' गटे ' या जर्मन कवीचं घर पाहायला गेलो. गटे ' या नावाचा जर्मन उच्चार काही वेगळाच आहे. परंतु मराठीत ' गटे ' म्हटल्याशिवाय कुणाला कळत नाही, तेव्हा आपण त्याला ' गटे 'च म्हणू या. हा कवी गर्भश्रीमंत असावा. त्याचं घर भव्य, प्रशस्त, चार मजली असे आहे. प्रत्येक मजल्यावर अनेक खोल्या. स्वैपाकघर, वाचनालय, शयनगृह, लिहिण्याची खोली वगैरे. भिंतीवर भव्य तैलचित्रं. त्याच्या सर्व खाजगी वापरातल्या वस्तू सांभाळून ठेवलेल्या त्याच्या आईचं शिवणकामसुद्धा ठेवलेलं आहे. त्याची पत्नी आणि प्रेयसी या दोघींची तैलचित्रं आहेत, शिवाय गटेची वेगवेगळ्या वयातली तैल-चित्रंही. त्याच्या लिहिण्याच्या खोलीतली टेबलखुर्ची पाहून भारल्यासारखं वाटलं. इथेच अनेक जगप्रसिद्ध कविता स्फुरल्या असतील !

या घराच्या आजूबाजूचा सर्व परिसर ' गटे 'नंच व्यापला आहे कपड्याची

व खेळण्याची दुकानं, उपाहारगृहं, सगळीकडे मला ' गटे 'ची चित्र दिसली. ' आम्ही या भागात राहतो ' याचा सर्वांना अभिमान दिसला. नाशिकला कुसुमाग्र-जांच्या वास्तव्यानं निर्माण झालेलं एक वैशिष्ट्यपूर्ण वातावरण मी अनुभवलेलं आहे, त्याची आठवण झाली ' गटे-हाऊस 'च चित्र असलेलं एक पिक्चर पोस्टकार्ड मी खुद्द कुसुमाग्रजानाच पाठवून दिलं—या दिवसाची आठवण म्हणून.

तिथल्याच एका उपाहारगृहात चहा घेताना सुरेश वेटरला म्हणाला, " तुमची चंगळ आहे. ' गटे 'ला पाहायला येणारे सगळे लोक या तुमच्या हॉटेलमध्ये येत असतील ! " तर तो वेटर हसून म्हणाला, " अहो कसचं काय ! इथे बहुतेक या प्रवासी बसेस येतात. त्यांना ठरावीक वेळात परत जायचं असतं. त्यांना कुठला वेळ इथे चहा घ्यायला ? तुमच्यासारखे स्वतंत्रपणे रमत-गमत येणारे लोक फार थोडे. तुमच्यासारखे आणखी येतील तर फार छान होईल. "

जर्मनीला असताना ऱ्हाईन नदीतून नौकाविहार चुकवू नका ' असं अनेकांनी सांगितलं होतं. प्रत्यक्षात ही नौका म्हणजे एक मोठी मोटर-लॉंचच होती. आत खाण्यापिण्याची व्यवस्था होती. बाहेर डेकवर रंगीबेरंगी बाकडी होती. त्यावर आमच्यासारखे अनेक प्रवासी कॅमेरे आणि दुर्बिणी सरसावून बसले होते मी एका वृद्ध गृहस्थाला बसायला जागा दिली तेव्हा तो माझ्याकडे न पाहताच ' दांके ' ( जर्मन ' थँक्यू ' ) म्हणाला. नंतर बघते तो आपल्या पत्नीशी शुद्ध इंग्रजीत बोलत होता अमेरिकन असावा. अमेरिकन टूरिस्ट्स जिथेजिथे भेटत असत. पूर्वी मी ऐकलं होतं की युरोपात फक्त इंग्लिश येणाऱ्यांचे फार हाल होतात. फ्रान्समध्ये फक्त फ्रेंच किंवा जर्मनीत फक्त जर्मन बोलली जाते वगैरे. एक तर सुरेश आमच्याबरोबर असल्यामुळे जर्मन भाषेचा प्रश्न सुटला, पण तरीसुद्धा मी एकटी फिरत असताना पाहिलं, विमानतळावर, दुकानात, रेल्वे स्टेशनवर वगैरे जुजबी इंग्लिश सर्वांना कळत होतं. ही बहुतेक अमेरिकन टूरिस्टांची कृपा असावी. कारण अमेरिकन डॉलरला सगळीकडे जोरदार मागणी आहे. त्यांना खूष करायचं तर भाषा यायलाच हवी. तेव्हा पर्यायानं आपलीही सोय झालेली आहे.

या बोटीतून जाताना ' ऱ्हाईन 'च्या दोन्ही काठावर मोठं सुरेख दृश्य दिसतं. डोंगरातून वाट काढीत नदीचं विस्तीर्ण पात्र पुढे सरकतं. दोन्ही बाजूंना हिरव्या वृक्षराजीनं आच्छादलेले डोंगर आणि या झाडांच्या पाठीमागे लपलेले अनेक छोटे-

छोटे किल्ले आणि त्यांचे बुरुज. एखाद्या परीकथेसारखं दृश्य याच भयाण किल्ल्यात एखाद्या सुंदर राजकन्येला डाबून ठेवलेलं असेल, अबलख वारू घेऊन आता एखादा देखणा राजपुत्र येईल आणि तिची सुटका करील—

या किल्ल्यांपैकी एक खाली उतरून पाहायचा असं आमचं ठरलं होतं. त्या निर्मनुष्य जागी आम्हाला सोडून बोट पुढे गेली ती परत येताना आम्हाला 'पिक् अप्' करणार होती. मधल्या वेळात किल्ला पाहायचा होता जागा निर्जन दिसत असली तरी आत भरपूर वावर होता. मध्ययुगीन राजांच्या सर्व वस्तू आतल्या राजवाड्यात मांडून ठेवल्या होत्या. त्यांची चिलखतं, जिरेटोप, बंदुका, तलवारी—एका खोलीत नेपोलियनच्या 'वॉटर्लू' युद्धाची छोटी प्रतिकृती करून ठेवलेली होती. एके ठिकाणी किल्ल्याची सर्व माहिती लिहिलेला फलक होता त्यावरून कळलं की १८२५ साली याची डागडुजी करून तो पर्यटकांना खुला करण्यात आला. एके ठिकाणी एक वृत्तपत्रातलं कात्रण लावलेलं होतं. 'हरे कृष्ण पंथाच्या लोकांनी या किल्ल्याचं देऊळ करण्यासाठी म्हणून मोठी रक्कम देऊ केली होती परंतु ज्या डचेसच्या मालकीचा हा किल्ला आहे तिनं त्याला नकार दिला तिनं, किल्ला आहे त्या स्वरूपातच जतन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याबद्दल आम्ही डचेसचं अभिनंदन करतो.' एकदरीत आपले जुहूचे 'हरे कृष्ण' लोक इथपर्यंत येऊन पोचले होते म्हणायचे. डोक्याचा गोटा करून शेंडी राखलेले कुणी गौरकाय 'कृष्ण' इथे दिसतात की काय ते पाहिलं. पण इथे त्यांना कुणी थारा दिला नसावा.

आम्ही किल्ला पाहात असताना एकाएकी मुसळधार पाऊस कोसळू लागला. इथे इतका पाऊस पडतो हेही मला माहीत नव्हतं. आता आम्ही इथे अडकून पडतो की काय अशी मला भीती वाटली. या जुनाट किल्ल्यातसुद्धा एक अद्ययावत उपाहारगृह होतं. तिथल्या चटपटीत देखण्या वेटरनं आम्हाला गरमगरम खाद्य पुरवलं शाळेतल्या मुलांचा एक घोळकाच किल्ला पाहायला आला होता. त्यांच्या मागण्या पुरवताना मात्र त्याची त्रेधा-तिरपीट उडाली. या आडजागीसुद्धा स्वच्छता वाखाणण्याजोगी! टेबलक्लॉथवर एक डाग नाही की जमिनीवर एक कागदाचा कपटा नाही. एका शाळकरी मुलीनं साडीच्या कुतूहलानं आमचे फोटो काढले. मी तिला माझा मुंबईचा पत्ता दिला. तिनं न विसरता मला त्या फोटोच्या कॉपीज् पाठवून दिल्या. युरोपात माझी साडी म्हणजे सहप्रवाशाच्या मनात

शिरण्याचा एक पासपोर्टच होता.

गडावरून खाली उतरलो तो ठरल्यावेळी आमची बोट आम्हाला न्यायला हजर झाली. ' पावसामुळे बोट उशिरा सुटली ' वगैरे प्रकार इथे नाही.

दुपारी जेवायला घरी परतलो जेवून मस्तपैकी ताणून दिली. सध्याकाळी ' बाड हॅांबुर्ग 'च्या पार्कमध्ये फिरायला गेलो. पार्कने केवढी तरी विस्तीर्ण जागा व्यापली आहे. मुलांना खेळायला, सायकल फिरवायला भरपूर जागा आहे. विविध प्रकारचे पक्षी इथल्या घनदाट वृक्षांवर आणि पायथ्याशी टुकूटुकू पाहणाऱ्या आणि तुरूतुरू धावणाऱ्या खारी दिसत होत्या. काही वृद्ध गृहस्थ खारींना खाणं देत होते. या पार्कमध्ये एक क्लबदेखील आहे. त्यात एक ' कॅसीनो ' सुद्धा आहे. अद्ययावत कपडे परिधान केलेली बरीच मंडळी इथे जुगार खेळायला येत असावी. मी ' कॅसीनो ' अजून पाहिलेला नव्हता. परंतु घरी परतायला वेळ फार थोडा असल्यामुळे ' कॅसीनो 'चा बेत पुढे ढकलला.

युरोपची सफर आटपून आम्ही परत फ्रॅंकफर्टलाच येणार होतो आणि काही दिवस मुक्काम करणार होतो. तेव्हा काय-काय पाहायचं याचे बेत करीतच आम्ही फ्रॅंकफर्टचा निरोप घेतला.

# २

# इंग्लिश खाडी ओलांडून

फ्रँकफूर्ट ते लंडन हा प्रवास आगगाडी–बोट–आगगाडी असा करायचा असं ठरवलं. त्याप्रमाणे २० मे १९८२ रोजी आम्ही फ्रँकफूर्ट सोडलं. प्रवास हा थोड्या वेळात करायचा असेल तेव्हा किंवा मुलं, म्हातारी माणसं यांच्या सोयीच्या दृष्टीनं विमानप्रवास हा उत्तम खरा, परंतु एखाद्या भू-प्रदेशाची खरी ओळख व्हायची असेल तर भूमातेच्या हातात हात घालून गाडी, बस किंवा मोटार प्रवास म्हणजे खरी आनंदयात्रा असते. तशात युरोपातल्या आगगाड्या म्हणजे सुखसोयींच आगर. बुकिंगसाठी फार दिवस आधी रांगेत उभं राहणं वगैरे कटकटी नाहीत. स्वच्छ, सुंदर, प्रशस्त रेल्वे स्टेशन्स गाडी आतूनही लखलख ! बसायच्या सीट्स मऊ, आरामदायी. सोबतीला दोन स्त्रिया भेटल्या. एक थोडीशी स्नॉबिश वाटली. दुसरी गप्पा करायला योग्य अशी. तरी खिडकीतून बाहेर सुंदर शेतमळे, बैठी उतरत्या छपराची घरं, क्वचित शहरी घरांचे पुंजके हे सर्व बघायला मजा वाटत होती. फ्रँकफूर्टहून लंडनला जाताना बेल्जियममधून जावं लागत. आम्ही 'व्हिसा' तयार ठेवला होता आणि त्याप्रमाणे बेल्जियमच्या सरहद्दीवर त्याच चेकिंग झालंही.

एक लक्षात आलं, युरोपात रेल्वेच्या कुठल्याही प्रवासात तिकीट तपासनीस आला नाही असं एकदाही घडल नाही. अगदी एक-दोन तासाचा किंवा मोठा एक-दोन दिवसांचा प्रवास असो, इन्स्पेक्टर येऊन तिकीट तपासणार ही काळ्या दगडावरची रेघ. विनातिकीट प्रवास करणारेही कुठे दिसले नाहीत.

हमाल ही संस्था इतिहासजमा. त्याबद्दल आम्हाला भारतातच सूचना मिळालेल्या होत्या त्यामुळे आम्ही चामड्याच्या मोठ्या बॅगा ( चाकं लावलेल्या ) घेतल्या होत्या. या मोठमोठ्या स्टेशन्सवर किंवा विमानतळावर ओढून नेता येत असल्यामुळे सोयीच्या असतात. कुठल्याही प्रवासात माणशी दोन डाग, हातात वाहून नेण्याजोगे—घ्यायचे असा मी हिशोब ठेवलाय. ( हिंदुस्थानातसुद्धा हे फायद्याच असत. एकदा धारवाडहून मुंबईला येताना गाडी विक्रोळीच्या आसपास कसल्यातरी तांत्रिक अडचणीमुळे मध्येच कुठे थांबली ! तासभर हलायची चिन्हं दिसेनात. ज्याच लगेज हातातून नेण्यासारख होत ते लोक पटापटा खाली उतरले आणि चालू लागले आम्ही तिघं आणि सहा छोट्या बॅग्ज होत्या त्यामुळे मुलानासुद्धा सामान घेता आलं. आम्हीही उतरून चालत विक्रोळी स्टेशनवर आलो आणि लोकलन बोरीबंदरला पोचलो. एक मोठी ट्रंक घेण्यापेक्षा अशा रीतीन दोन-चार छोट्या बॅग्ज घेणं अधिक सोयीचं होत.)

बेल्जियम हा देश जिथं इंग्लिश खाडीला टेकतो तिथं ' ओस्तॉंद ' हे स्टेशन +बंदर आहे. गाडीतून उतरून बोटीत बसेपर्यंत बरंच अतर चालाव लागलं. बॅग्ज ओढून नेता येत असल्यामुळे फारसा त्रास झाला नाही. आमच्या बोटीचं नाव ' प्रिन्स ॲल्बर्ट.' हा प्रिन्स ' ॲल्बर्ट ' आम्हाला इंग्लिश खाडी ओलांडून मायदेशी ( त्याच्या ) घेऊन जाणार होता.

बोटीवर माणसच माणस आणि खूप उत्फुल्ल वातावरण ! खूपसे विद्यार्थी होते. सहलीला आले होते की काय नकळे ! हातात दुर्बिणी आणि कॅमेरे घेऊन इतस्ततः हिंडत कलकलाट करीत होते. बोटीवर उत्तम खाद्यपेय मिळण्याची सोय होती. एका खोलीत बसून टी. व्ही. पाहता येण्याची व्यवस्था होती. छोट्या टेलिफोन बूथ्समधून जगात कुठेही इंटरनॅशनल कॉल्स करता येण्यासारखे होते. आम्ही काही वेळ वरच्या डेकवर हिंडून आलो. फ्रान्स बेल्जियमचा किनारा दुरावत होता आणि दुसरीकडून साम्राज्यशाही इंग्लंडचा किनारा हळूहळू दृष्टिपथात येत होता. इंग्लिश खाडी ओलांडताना मला डिकन्सच्या ' अ टेल ऑफ टू सिटीज्'ची आठवण झाली. ' कॅले ' आणि ' डोव्हर ' ही दोन बंदराची नाव याच कादंबरीत ओळखीची झाली होती. फ्रान्सच्या सरदार घराण्यातला ' चार्लस् डार्ने ' आपल नाव बदलून इंग्लंडमध्ये राहात असतो तो आपल्या पत्नीला, ' लूसी 'ला घेऊन पुन्हा फ्रान्सला परत येतो—तिच्या म्हाताऱ्या बापाला भेटण्यासाठी आणि नतरचं

सार भीषण नाट्य—

युरोपात फिरताना एकसारखं व्हायचं ते असं की—अनेक स्थळं, स्मारकं, इमारती, पुतळे, सार्वजनिक ठिकाणं याविषयी कुठे ना कुठं तरी आपण वाचलेलं आहे, कुणीतरी काहीतरी सांगितलेलं आहे हे आठवायचं मनात अनेक संदर्भ जागे व्हायचे. आताच पाहा—' डोव्हर ' हे नुसतं नाव दिसताच माझ्या मनात डिकन्सची सारी कादंबरी, ती वर्गात शिकत असताना घेतलेला अवीट आनंद, त्याच कथेवर आधारित चित्रपट, त्यातली दृश्यं, फ्रेंच राज्यक्रांतीच इतिहासातलं धगधगीत प्रकरण--अशी ही विचाराची मालिकाच डोळ्यापुढून सरकत गेली. ' अमुक एका ठिकाणी बघण्यासारखं काय आहे फारसं ? '—असं काहीजण कंटाळून विचारतात. आमचे एक मित्र युरोपच्या ' कंडक्टेड ' टूरला जाऊन आले. आल्यावरही कोरडे ठणठणीत होते. म्हणजे आयुष्यात आपण अनेक गोष्टी केवळ एक कर्तव्य म्हणून ' उरकून ' घेतो त्यापैकी त्याच्या दृष्टीनं ही युरोप-यात्रा ! हा गृहस्थ कुठेच उचंबळून आला नसेल का ? आपण पाहात असलेल्या स्थळाचं आणि आपल्या आजवर घडलेल्या व्यक्तिमत्त्वाचं कुठेतरी नातं जुळलं तर प्रवासातला आनंद शतगुणित होतो. तशात इंग्लंडचं आपल्यावर दीडशे वर्षांचं स्वामित्व असल्यामुळे आणि आजही त्या भाषेचा, संस्कृतीचा जबरदस्त पगडा असल्यामुळे तिथल्या साध्या गोष्टीतदेखील ' मोठा आशय दिसतो. ( अंग्रेज तो गये लेकिन अपनी औलाद ( भाषा ) छोडके गये, अशी एक हिंदीत म्हण असल्याचं ऐकलं. )

बोटीवर एका नावीन्यपूर्ण प्रसंगाला सामोरं जावं लागलं. याविषयी आधी वाचूनही प्रत्यक्ष अनुभव काहीसा गंमतीचा, काहीसा अस्वस्थ करणारा होता. डेकवर खूप थंडी वाजू लागली म्हणून आम्ही खाली आलो. ही जागा बंदिस्त होती काचेतून समुद्र दिसत होता, तरी वारा नसल्यामुळे ऊबदार वाटत होतं. डेकवर बसून आम्ही निसर्गदृश्याचा आस्वाद घेऊ लागलो. आमच्यासमोरच आमच्याकडे तोंड करून एक जोडपं बसलं होतं. एक अगदी कोवळी अशी पोर फार तर पंधरा-सोळा वर्षांची असेल. सफरचंदासारखे गुलाबी गाल आणि चेहऱ्यावर निरागस हसू. तिच्याबरोबरचा गृहस्थ थोडासा प्रौढ नुकतं टक्कल पडू लागलेलं. बघता-बघता त्यांनी एकमेकांना मिठी घातली आणि प्रदीर्घ चुंबनाचा कार्यक्रम सुरू झाला इतक्या जवळून हे असे लाईव्ह खजुराहो पाहण्याचा मराठावरचा

पहिलाच प्रसंग. तशात माझ्यासोबत माझी द्वादशवर्षीय कन्यका असल्यामुळे मी भलतीच अस्वस्थ झाले. तिनेसुद्धा हिंदी सिनेमा आणि छायागीतातून (चुंबन वगळल्यास) इतर सर्व प्रकारच्या आलिंगनाची आसनं पाहिली असली तरी ती पडद्यावर. खरं तर 'छायागीत' सुद्धा मुलासमवेत पाहताना मी अत्यंत ओशाळवाणी होत असे. मग इथं तर काय विचारावं? बरं प्रकरण थोडक्यात आटपायचीही चिन्हं दिसेनात. तेवढ्यासाठी मला उठून पटकन दुसरीकडे जाणंही बरं दिसेना. आम्ही अगदी समोरासमोर असल्यामुळे दृष्टी दुसरीकडे तरी कुठं आणि कशी वळवणार? आज आठवणीनं हसू येतं पण त्या वेळी ते काही क्षण मात्र भयंकर ताप झाला. पुढे याची काहीशी सवय झाली. गाडीत, बसमध्ये कुठेही समोर तरुण जोडपं आलं की कधी 'छायागीत' सुरू होईल याचा नेम नसे. आजूबाजूची इतर मंडळी काय करतात ते मी पाहून ठेवलं. डोळ्यांना काल्पनिक झापडं लावायची आणि समोर दोन ठोकळे असल्यागत निर्विकार चेहरा ठेवायचा. तरी एकूण कठीणच गेलं ते!

'डोव्हर'ला आम्ही इंग्लंडमध्ये प्रवेश केला. इंग्लंडचा व्हिसा आधी देत नाहीत. कुणीसं म्हणालं होतं, 'तुमची लेक ब्रिटनची भावी नागरिक होऊ शकेल, त्यामुळे तुम्हाला प्रवेश घेताना काही त्रास होण्याचा संभव आहे.' त्यामुळे धाकधूक वाटत होती. प्रवेशद्वारावर बसलेली हसतमुख मुलगी म्हणाली, "तुमच्या ब्रिटन-भेटीचा उद्देश काय?" [illegible] हे म्हणाले, "साईट सीईंग", [illegible] काय? शेक्सपियरची जन्मभूमी बघायला नको?" ती हसली आणि म्हणाली, "व्हा पुढं—" असा आमचा सुरळीत प्रवेश झाला.

पुन्हा आगगाडीत बसून आम्ही जसजसे लंडनच्या जवळ येऊ लागलो, तसतसं माझ्या मनावर एक दडपण येऊ लागलं. लंडन शहरात प्रवेश करताच उत्तुंग, भव्य अशा ऐतिहासिक इमारती दिसू लागल्या. 'ज्या साम्राज्यावर सूर्य कधी मावळत नव्हता' त्याची सर्व सूत्रं इथूनच हालत होती. लंडन म्हणजे राजघराणं, लंडन म्हणजे चर्चिल, लंडन म्हणजे डिकन्स अशी कितीतरी समीकरणं मनात होती. सारं जग पादाक्रांत करणाऱ्या सार्वभौम सत्तेचं केन्द्र शोभावं असंच हे लंडन! इथलं गांभीर्य, इथली भव्यता, नवख्याच्या मनात भीतियुक्त आदर निर्माण करणारी. लंडनच्या कुंद, धुरकट वातावरणाबद्दल नेहमी ऐकलं होतं. पण आम्ही रात्री आठच्या सुमारास लंडन शहरात प्रवेश केला तेव्हा

लख्ख सूर्यप्रकाश होता

स्टेशनवर माझी मैत्रीण सुमन आणि तिचा नवरा कॉलिन अशी दोघं आली होती आम्ही सुमनकडेच राहणार होतो सुमन आणि मी मुंबईला 'सेंट कोलंबा'त पाचवीपासून अकरावीपर्यंत बरोबर होतो सुमनचा पहिला नंबर कधी चुकला नाही. तिचे वडील मिलमध्ये इंजिनिअर होते. एका अपघातात त्यांचं अकाली निधन झालं सुमन तेव्हा खूपच लहान असावी. पुढे समज आल्यावर तिनं निर्णय घेतला, आपणही मोठेपणी इंजिनिअर होणार. त्या काळात मुलींनी इंजिनियरिंगकडे जाणं हे फार क्वचितच घडे. पण सुमनची बुद्धी विलक्षण तल्लख तिनं जिद्दीनं कोर्स पुरा केला पुढे ती इंग्लंडला गेली. आधी न्यू कासल् इथे होती आता लंडनला एका मोठ्या कंपनीत चांगल्या हुद्द्यावर आहे तिथंच तिनं कॉलिन जीव्ज् या ब्रिटिश प्राध्यापकाशी विवाह केला

दोन-चार वर्षांपूर्वी ती हिंदुस्थानात आली होती. तेव्हा कॉलिनला घेऊन आमच्याकडे येऊन गेली. तेव्हाच कॉलिनशी पहिली ओळख झाली होती त्याची सूक्ष्म विनोदबुद्धी तेव्हाच ध्यानात राहिली होती. ब्रिटिश माणसाविषयी आपल्या मनात एक ठरावीक प्रतिमा असते. थोडासा अबोल, गंभीर, तुटक स्वभावाचा, आतल्या गाठीचा, शिस्त-प्रिय, आत्मकेन्द्रित असा ! कॉलिनचं व्यक्तिमत्त्व याला पूर्ण अपवाद आहे. कॉलिन हा खूप बोलका, विनोदी, सहृदय, मनमोकळा, सरळ स्वभावाचा, भरपूर वाचन केलेला, कलासक्त, सामाजिक जाणीव असलेला असा सुसंस्कृत गृहस्थ आहे

आम्ही 'नको-नको' म्हणत असतानाही आमच्या हातातलं सामान कॉलिननं ओढून घेतलं. त्याच्या मोटारीच्या टपावर आमच्या दोन्ही महाकाय बॅगा स्थानापन्न झाल्या दोरीनं त्यांना बांधून टाकलं तरी गाडी सुरू झाल्यावर दोरी सुटेल की काय ही भीती. कॉलिनची चेष्टा चालूच होती, "काही वेळानं आपल्या गाडी-मागून एखादी बॅग येताना दिसली तर मला सांगा हं—" वाटेत सारखी लाल सिग्नल्स लागत होती तर सुमनकडे त्याची कुरकूर चालू होती, "या लाल दिव्यांनी सर्वांनी मिळून माझ्याविरुद्ध कट केलाय का सुमन ?"

लंडनच्या 'नॉर्थ फिंचली' या उपनगरात सुमनचा बंगला आहे मला हे ठिकाण फार आवडलं. आपल्या जुन्या खार-सांताक्रूझसारखा शांत परिसर प्रशस्त स्वच्छ रस्ते, दोहोबाजूंनी गर्द सावली देणारे लॅबर्नम व चेरीचे डेरेदार वृक्ष

आणि छोट्या बगीच्यांनी वेढलेले एकसारखे दिसणारे बैठे बगले. सुमनच्या बगल्याची रचना अशी—आत शिरताच एक छोटं पॅसेज. उजवीकडे हॉल किंवा ड्रॉइंग रूम. इथे टी. व्ही., सोफासेट वगैरे. पुढे एक बेडरूम, इथं एक मोठा पिआनो, कॉलिनच्या ऑफिसचं टेबल ( तो एका सामाजिक संस्थेचं काम पाहतो ), पुस्तकाची कपाटं वगैरे त्याला लागून स्वैपाकघर– आपण चित्रात पाहतो तसं सर्व सुखसोयींनी युक्त किचनमधून पाठीमागच्या बागेत जायला दार आहे. मधल्या पॅसेजमधून वर जाण्याचा जिना. वर दोन बेडरूम्स व बाथ-रूम्स. यापैकी एक बेडरूम सुमनची व एक आम्हास दिलेली होती.

इथं मी एक पाहिलं, दार-खिडक्या तर थंडीमुळे बंद असतातच. पण खिडक्यांचे पडदेसुद्धा कायमचे ओढलेले असतात त्यामुळे घरात कुणी राहतंय की नाही अशी शंका यावी. एखाद्या खिडकीत एखादा चेहरा दिसणं म्हणजे उंबराचं फूल. ( मेरे सामनेवाले खिडकीमें असं प्रियाराधन अशक्यच. ) उन्हाचा ताप असतो म्हणावं तर तेही नाही मग पडदे बंद का ? कॉलिन म्हणाला, प्रायव्हसी 'साठी ' वास्तविक रस्ते इतके निर्मनुष्य आणि पडदे उघडे ठेवलेच तरी आतलं फारस काही दिसेल असं नाही पण माणस सवयीचे गुलाम असतात. युरोपात सगळीकडे हा प्रकार–दार खिडक्या बंद आणि पडदे ओढलेले. मला आपली भारतातली सवय–मोकळी हवा आणि उजेड याची. मला फार गुदमरल्यासारखं व्हायचं. पण नंतर सवय झाली.

सुमननं आमच्यासाठी खास भारतीय मेनू केला होता. भात, भाजी वगैरे. त्याचा आस्वाद घेऊन आम्ही झोपी गेलो रात्री खूपच थंडी होती खोलीत हीटर होता ( भिंतीला टेकून एक लाटालाटाचा पत्रा असतो. खोली उबदार ठेवण्याचं काम तो गुपचूप करीत असतो ) तरीसुद्धा आम्ही रजई पांघरून झोपलो.

दुसऱ्या दिवशी सुमननं सुटी घेतली आम्ही तिच्याबरोबर लंडनचं नक्षत्रालय आणि मादाम त्यूसो 'च मेणाचं प्रदर्शन पाहिलं. नक्षत्रालय खास असं काही नाही. आपलं मुंबईचं नेहरू नक्षत्रालय लंडनच्या तोडीस तोड आहे. पण मेणाचं प्रदर्शन मात्र अप्रतिम आहे. एकामागून एक कितीतरी दालनं आणि अनेक लोकोत्तर व्यक्तींचे मेणाचे पुतळे. त्यात राजे आणि राण्या ( आठवा हेन्री व त्याच्या सहा बायका, प्रिन्स चार्ल्सच्या लग्नाचा देखावा–यात दोहीकडची

वऱ्हाडी मंडळीदेखील ! क्वीन व्हिक्टोरियाची एक अगदी तरुण वयातील प्रतिकृती ) राजकीय पुढारी–यात विविध देशांचे प्रधानमंत्री व नेते ( महात्मा गांधी व इंदिरा गांधी हे दोनच भारतीय नेते ), कलावंत ( एल्विस हा गायक, पिकासो हा चित्रकार ), क्रीडापटू ( पेले, बॉयकॉट, बोर्ग व मॅकन्रो ), लेखक ( डिकन्स, व्होल्टेर, अगदी बार्बरा कार्टलंडसुद्धा ), उद्योगपती ( पॉल गेट्टी )– अशी विविध क्षेत्रातील मंडळी भेटतात शिवाय काही सामान्य माणसाच्या प्रतिकृतीदेखील आहेत. उदा इन्फर्मेशन काऊंटरवर उभा असलेला एक माणूस किंवा अगदी नैसर्गिक अशी पोझ घेऊन उभा असलेला द्वारपाल ही माणस खरी समजून आपण फसतो पुतळ्याकडे पाहात एक प्रतिमा पायरीवर बसलेल्या व्यक्तीची—हुबेहूब खऱ्या माणसासारखी आपण हात लावायला जावं तर तो माणूस खरंच हालचाल करू लागतो अशी पुतळ्याची आणि माणसाची इथं सरमिसळ झालेली

एक पुतळा भाषण करणाऱ्या माणसाचा. त्याचं भाषण टेप केलेलं पाठीमागून ऐकू येत आणि त्याबरहुकूम त्याची मान, ओठ, डोळे, भिवया, पापण्या सर्व काही हलत होतं जणू हा पुतळाच बोलतोय ! ( अमेरिकेत एब्राहाम लिंकनच भाषण असंच ऐकायला मिळतं असं वाचलं होतं. ) एल्विस प्रेसली हा गाणं म्हणण्याच्या पवित्र्यात ( गळ्यात गिटार वगैरे अडकवून ) तिथे पाठीमागे त्याच्याच गाण्याची रेकॉर्ड लावली होती

इथून खाली तळघरात जायची वाट आहे. तिथे ' यातनाघराकडे ' अशी पाटी आहे. ( चेंबर ऑफ हॉरर्स ). या यातनाघराच्या दारातच हिटलरचा पुतळा आहे. ही योजना मोठी मार्मिक वाटली. हिटलरच्या पुतळ्याखाली नावगाव काही नाही त्याची जागाच त्याच्याविषयी सगळं काही सांगते

या यातनाघरात पूर्वी देहान्त शिक्षा कशी देत असत त्याची प्रात्यक्षिकं दिसतात. फाशी, गिलोटिन, बंदुकीन ठार मारणं, विजेच्या खुर्चीत शॉक देऊन मारण इ. सर्व प्रकार आहेत. बंदुकीच्या गोळीनं ठार मारण्याचा प्रकार तर अजब आहे एका खुर्चीत बसलेल्या माणसाचा पुतळा पाठीमागे रेकॉर्डवर ' अमुक माणसाला अमुक गुन्ह्यासाठी देहान्त प्रायश्चित्त देण्यात येत आहे ' असं न्यायाधीशाच निकालपत्र ऐकू येत इतक्यात पिस्तुलाचे ' ठो ठो ' असे बार ऐकू येतात सर्वत्र धूर होतो आणि धूर निवळताच खुर्चीतल्या पुतळ्याची मान आडवी

झालेली आणि छातीतून रक्त ठिबकताना दिसत हळूहळू अंधार होतो, क्षणातच पुन्हा उजेड होतो आणि तो पुतळा पूर्ववत खुर्चीत बसलेल्या जिवंत माणसाचा पुन्हा निकालपत्र ऐकू येतं. असं हे शिक्षासत्र सारख चालू असतं. मी हा प्रकार तिथच उभ राहून दोन-तीनदा पाहिला. पण मेणाचा पुतळा बसल्या ठिकाणी क्षणात मेलेला आणि क्षणात जिवंत कसा दाखवतात याच रहस्य मला काही उलगडलं नाही.

आणखी पुढे गेल्यावर ट्रॅफल्गार युद्धात नेल्सनच्या बोटीवरील देखावा हुबेहूब उभा करण्यात आला आहे. असं वाटतं की बोटीवरच्या डेकवरून आपण फिरतो आहोत, तोफा बाहेर डागल्या जात आहेत त्याचे धडाड्धूम असे आवाज, धूर आणि सैनिकाच्या किंकाळ्या! जिन्यावरून उतरून खाली आलो की खालच्या डेकवरचा देखावा. इथ जखमी सैनिकाना आणून टाकलेलं आहे. दोन्ही बाजूना हातपाय तुटलेले सैनिक आणि त्याचे विव्हळण्याचे—कण्हण्याचे आवाज टेपवर ऐकू येतात. वाटतं खरोखरीच आपण एखाद्या युद्धनौकेवर आहोत.

थोडीशी कल्पकता वापरली तर किती नावीन्यपूर्ण चित्र उभी करता येतात याच एक उदाहरण म्हणजे दारूचा गुत्ता याची सर्व दारे-खिडक्या बंद आहेत. खिडक्याना रगीत नक्षीची तावदान आहेत त्याना अधून-मधून डोकी टेकलेली दिसतात, परतु ती काच दुधी असल्यामुळे आतलं काहीच दिसत नाही आतला उजेड फक्त दिसतो आणि मद्यपानानं बेहोष झालेल्या माणसांचा जल्लोष ( मोठ्यान बोलणं-हसणं ) आतून ऐकू येतो. असं वाटतं की आपल्याला नवीन दृश्य बघायला मिळणार. आपण एखादं दार किंवा खिडकी उघडण्याचा प्रयत्न करतो पण—इथेच तर गंमत आहे! एकही दार किंवा खिडकी उघडता येत नाही. म्हणजे हा गुत्ता फक्त बाहेरून पाहायचा. प्रत्यक्षात आत नसेलही काही परंतु आत काय असेल याचा आभास मात्र इतका उत्तम रीतीन उत्पन्न केलेला आहे की आपण या कल्पकतेलाच दाद देऊन जातो

त्या दिवशी संध्याकाळी टेम्स नदीवरून एक फेरफटका मारला लंडन ब्रिज इज फॉलिंग डाऊन ' असं एक नर्सरी गीत आठवलं. तिथल्या प्रशस्त ट्रॅफल्गार स्क्वेअरमध्ये अनेक लोकोत्तर व्यक्तींचे पुतळे आहेत. चर्चिलचा पुतळा पाहण्यासारखा. त्याची लढाऊ वृत्ती, निर्भयपणा, रुबाब, शौर्य सारं काही त्याच्या चेहऱ्यावर आणि त्याच्या उभ राहण्याच्या लकबीतसुद्धा प्रतिबिंबित झालं आहे. चर्चिल-

विषयी किती वाचलं होत ! हिटलरचा पाडाव करण्यात दिसलेली त्याची कर्तबगारी, त्याची विनोदबुद्धी, त्याचं बायकोवरचं प्रेम, ('माझं लग्न झालं आणि मी सुखासमाधानाने राहिलो' हे त्याच परीकथेतलं आवडतं वाक्य) राजकारणाच्या धावपळीतसुद्धा त्यानं केलेलं जबरदस्त वाचन-लेखन चर्चिलच्या पुतळ्याखालून हलावसं वाटेना. नुकतच मी चर्चिलच्या पी. ए. ने लिहिलेलं, त्याच्या खाजगी जीवनाविषयी–त्याच्या आवडीनिवडी व सवयी– याविषयी लिहिलेलं एक पुस्तक वाचल होत. त्यात चर्चिलच्या खूप गमती होत्या.

चर्चिल आणि त्याची बायको क्लेमेंटाईन याच्यात रोज सकाळी वृत्तपत्रासाठी भांडणं होत पेपर येण्याची वेळ झाली की दोघं अगदी तयार होऊन बसत आणि तो आल्याबरोबर त्यावर झडप घालीत कुठल कुणी आधी वाचायच यावर वादावादी होई. मग या पी ए. ला एक युक्ती सुचली. त्याने प्रत्येक पेपरचे दोन अंक मागवायला सुरुवात केली. मग गुंता आपोआप सुटला आणि दोघानी त्याला शाबासकी दिली.

चर्चिलच्या आंघोळीची तयारी करण्याच कामही या पी. ए कडेच होतं टयूबमध्ये ठराविक उष्णतामान असलेलं कोमट पाणी तयार ठेवावं लागे कुठल्या क्षणी चर्चिल आंघोळीला जाईल याची शाश्वती नसे त्यामुळे पाण्याकडे सारखं लक्ष ठेवावं लागे. एकदा चर्चिल बाथरूममध्ये शिरणार इतक्यात कुणा राजकारणी व्यक्तीचा फोन आला. येणारे फोन कुणाचे असतात आणि कोण किती वेळ बोलत याचा पी. ए ला अदाज असल्यामुळे त्यानं ओळखलं, आता अर्ध्या-पाऊण तासाची निचिंती. चर्चिल काही एवढ्यात आंघोळीला जात नाही ! म्हणून त्यानं टयूबमध्ये चागलं कडकडीत पाणी भरून ठेवलं, अर्ध्या-पाऊण तासानं ते कोमट होईल या हिशोबानं !— आणि तो दुसऱ्या काही कामासाठी आत गेला. एवढ्यात बाथरूममधून त्याच्या कानावर चर्चिलची प्रचड आरोळी ऐकू आली—

—त्या दिवशी कधी नव्हे ते फोनवरच बोलणं लवकर संपवून चर्चिल थेट टयूबमध्ये शिरला होता !!

अशा कितीतरी आठवणी त्यात होत्या. आज हा पुतळा पाहताना ते सगळं आठवलं.

शेवटी रमत-गमत घरी परतलो. लंडनमधला बहुतेक प्रवास आम्ही टयूब-

मधून, भुयारी रेल्वेतून केला. ऐन कामाला जाण्याच्या वेळा सोडल्या तर त्यात गर्दी अजिबात नसते. आपल्या लोकल्सप्रमाणे त्या दोन-दोन मिनिटांनी येतात प्रत्येक डब्यात त्या गाडीच्या मार्गाचा नकाशा असतो आणि एकामागून एक कुठली स्टेशन येणार ते दाखवलेलं असतं त्यामुळे 'डोंबिवली कधी येतं हो ताई ?' —असले प्रश्न इतरांना विचारावे लागत नाहीत.

दुसऱ्या दिवशी लंडन शहरातली इतर प्रेक्षणीय ठिकाणं पाहणार होतो. त्याची स्वप्नं पाहात निद्राधीन झालो.

# ३

# शेक्सपिअरच्या माहेरघरी

युरोपियन लोकांचे डोळ्यांचे विविध रंग हा एक खूपच कुतूहलाचा विषय होता. मी सुमनला विचारलं, " डोळ्याच्या रंगावरून त्यांचं मूलस्थान ओळखता येतं का ? " ती म्हणाली, " उत्तरेकडच्या लोकांचे डोळे जास्त गहिरे निळे असतात असं म्हणतात " हा एक धागा पकडून मी डोळ्यांचं निरीक्षण करू लागले. या म्हणण्यात तथ्य असावं. इंग्लंड जर्मनीकडून खाली फ्रान्स, स्पेन, पोर्तुगालकडे जसजसे आम्ही सरकत गेलो तसतसा डोळ्यांचा रंग काहीसा बदलत गेला या विविध छटा मनाला मोह घालतातच, पण या सर्वांत गहिऱ्या निळ्या रंगालाच ' राजा ' म्हणता येईल. सलमान रश्दी एके ठिकाणी म्हणतो, " निळभोर आभाळ कधीकधी यांच्या डोळ्यात ठिबकतं ! " असे डोळ्यात गळलेले स्वच्छ निळ्या पारदर्शी आभाळाचे थेंब उत्तरेकडे जास्त भेटतात. दक्षिणेकडे हळूहळू मग ते घारे, हिरवे, फिक्कट तपकिरी असे पालटत जातात. काळेभोर डोळे मात्र मला युरोपात फारसे कुठे दिसले नाहीत.

डोळ्याबरोबर केसांचे रंग हेदेखील एक नवलच ! निळे डोळे आणि सोनेरी केस हा संयोग फार सुंदर दिसायचा परंतु एरवी केस कधी भुरे तर कधी रुपेरी-चंदेरी, कधी तांबूस तपकिरी ! कुरळे केस अभावानेच दिसले. आपल्या-सारखे केसांचे लाड मात्र कुणी करीत नसावं केसात फुलं हा प्रकार तर नाहीच ( आपल्याकडेही तरुण पिढीत आता तो अस्तंगतच होतोय्. ) लांबसडक केसही कुठे दिसले नाहीत परंतु तेल लावण्याची प्रथा नसल्यामुळे केसांच्या नैसर्गिक मुलायम, ' रेशमी 'पणात एक स्पर्शाचं आव्हान दिसे.

त्वचेच्या गौरवर्णाचं अप्रूप तर आपल्या मनात नेहमीच ठाण मांडून असतं

प. नेहरूंच्या गुलाबी वर्णाचं वर्णन करताना ' जास्वंदीचं फूल दुधात कुस्करल्या-सारखा रंग ' असं अत्र्यांनी म्हटलेलं आहे. परंतु असा हा वर्ण नितळ कांती असल्यासच खुलून दिसतो. अनेकदा युरोपियनांच्या अंगावर काळसर ठिपके ( freckles ) दिसतात. गुलाबी छटेचा पूर्ण अभाव असेल तर त्वचा फिकट, निस्तेज, ॲनिमिक दिसते. नीलाक्षी, सुवर्णकेशी युवतींना मात्र दुग्ध-जास्वंदी वर्ण फारच खुलून दिसतो

युरोपला आल्यापासून प्रथमच एका नियोजित सहलीतून ( गायडेड टूर ) जाणार होतो. बस तर सुंदर– ऐषारामी होतीच, पण ड्रायव्हरसुद्धा देखणा आणि आमची मार्गदर्शक स्त्री ( गाईड ) हीदेखील मध्यमवयीन असूनही रूपानं सुंदर– गोल हसतमुख चेहरा, गुलाबी गाल, शरीर थोडंसं स्थूलतेकडे झुकणारं असूनही वागण्या-बोलण्यात एक चटपटीतपणा– अशी होती.

हिंदुस्थानात कधीही घडणं शक्य नाही अशी एक घटना इथं पाहिली. टूरच्या सुरुवातीलाच आपली स्वतःची ओळख करून देतानाच तिनं आमच्या ड्रायव्हरची-सुद्धा ओळख करून दिली आणि ' मीट मिस्टर अमुक ' असं म्हणताच बस-मधल्या यच्चयावत प्रवाशांनी कोरसमध्ये म्हटल्याप्रमाणे एका सुरात ' गुड मॉर्निंग मिस्टर–' असं त्याला अभिवादन केलं. इथे आपण ड्रायव्हर या संस्थेकडे काहीशा तुच्छतेनंच पाहतो, गाडी बेदरकारपणे हाकली तर शिव्या घालतो, पण क्वचित, कधी काळजीपूर्वक कसबी सारथ्य करणाऱ्याचं अभिनंदन करतो का ? आभार मानतो का ? ( सिगारेट ऑफर करणं वगैरे दूरच ! कॉलिन हिंदुस्थानात आला होता तेव्हा त्यानं एकदा आमच्या टॅक्सी ड्रायव्हरला सिगरेट दिली. मला वाटलं, तो विनयानं नको ' म्हणेल. कसचं काय ? ड्रायव्हरनं चक्क ती घेतली– त्याला परदेशी प्रवाशाकडून ही सवय असावी-- पण साधं ' थँक्यू ' मात्र म्हटलं नाही. तिथल्या तिथे त्याला हे शिकवण मलाही जमलं नाही. या एकूण प्रकारामुळं मी इतकी स्तिमित झाले होते. ) त्यामुळे हिंदुस्थानात परत आल्यावर मी माझ्या मैत्रिणीला ही ड्रायव्हर-कथा सांगितली. परवा ती नेपाळला जाऊन आली. आल्यावर मला म्हणाली,

" तू सांगितलेलं आठवून मी आमच्या बसड्रायव्हरचे मुद्दाम आभार मानले ग टूर संपल्यावर..."

तर ज्याला आपण ' डिग्निटी ऑफ लेबर ' म्हणतो, त्याची अनेक प्रत्यंतरं

आली. सगळीकडे एक समतेची भावना दिसली. आमच्या गाईडच्या वागणुकीत-सुद्धा 'अतिथिदेवो भव'सारखी अजिजी कधी दिसली नाही. ती आमची पगारी नोकर आहे, असही कुणी तिला वागवलं नाही. त्याचप्रमाणे आपण कुणी 'नेत्या' असल्यागत तिनं दादागिरीही केली नाही. (इथे एक 'सहलसम्राट' म्हणून गाजलेले गृहस्थ प्रवाशांना अतिशय तुच्छतेनं मेंढरं हाकल्यागत वागवतात असं ऐकलं होतं) तर आमची एक समवयस्क मैत्रीण असल्यागत खेळीमेळीच्या वातावरणात तिनं सर्व मार्गदर्शन केलं.

तिचा आवाज गोड होता उच्चार स्पष्ट होते वाचन, सामान्य ज्ञानही भरपूर होतं. (सर्वच मार्गदर्शक असे असतील असा माझा गैरसमज झाला, पण पुढे काहींनी अपेक्षाभंग केला.) स्थळदर्शन करताना, बसमधून जातानासुद्धा ती अनेक विषयावर भाष्य करी. प्रथम तिनं आम्हाला 'वेस्टमिन्स्टर ॲबे' आणि 'सेंट पॉल्स कॅथड्रिल' ही दोन भव्य चर्चेस् दाखवली. इथे अनेक लोकोत्तर पुरुषांची थडगी आहेत 'सेंट पॉल्स्' हा रेन नावाच्या सुप्रसिद्ध वास्तु-शास्त्रज्ञाच्या कलेचा सुंदर आविष्कार आहे. इथलं कोरीव काम, शिल्पकला हे विलक्षण थक्क करून टाकणार आहे. त्याचं मर्म तिने आम्हाला समजावून सांगितलं. याच्या वरच्या प्रचंड घुमटामध्ये गोल घुमटाप्रमाणे 'व्हिस्परिंग गॅलरीज' आहेत. म्हणजे एके ठिकाणी हळू आवाजात उच्चारलेले शब्द बऱ्याच लांबवर ऐकू येतात (आपल्याकडे मुंबईचं नरीमन पॉइंटचं टाटा थिएटर हे असंच तंत्र वापरून बांधलेलं आहे. इथे ध्वनिक्षेपक वापरावा लागत नाही. स्टेजवरचा प्रत्येक शब्द अगदी मागच्या रांगेपर्यंत ऐकू जातो.) इथे युद्धात बलिदान केलेल्या अनामिक सैनिकाची प्रतिमा आहे. अनेक मृत सैनिकांच्या नावाचं एक प्रचंड रजिस्टर इथे ठेवण्यात आलेलं आहे. रोज त्याचं एकेक पान उलटण्यात येतं आणि प्रवाशांना त्यावरची नावं वाचता येतात. (परंतु प्रवाशांना त्याला हात लावण्याची किंवा पान उलट-सुलट करण्याची मनाई आहे.) इथेच युद्धात लंडन शहर जळत असताना त्या पार्श्वभूमीवर सेंट पॉलच्या घुमटाचा कुणी एकानं घेतलेला फोटो लावलेला आहे.

नंतर आम्ही 'टॉवर ऑफ लंडन' पाहायला गेलो. इथे पूर्वी कैद्यांना ठेवण्यात येत असे. सर वॉल्टर रॅले हेसुद्धा इथेच होते. अनेक राजद्रोही व्यक्तींना इथे फाशी देण्यात आलं. या टॉवरच्या सभोवती एक भला-मोठा पाण्याचा खंदक

आहे. गाईड म्हणते, "यात पूर्वी इतकं घाण पाणी असायचं की याच्या घाणी-मुळेच शत्रू जवळ यायलासुद्धा धजत नसे असं म्हणतात." या इमारतीच्या परिसरात अनेक डोमकावळे दिसतात. त्यावर तिचं भाष्य असं, "एकदा एका ज्योतिष्यानं सांगितलं की जोवर इथं हे डोमकावळे वास करीत आहेत तोपर्यंत इंग्लंडवर राजाराणीची सत्ता चालेल. आम्हाला तर राजघराणं अतिशय प्रिय ! म्हणून आम्ही काय करतो ? या डोमकावळ्यांचे पंखच कापून टाकतो. त्यामुळं ते कुठेच उडून जाऊ शकत नाहीत आणि म्हणून आमच्याकडे अजून राणीचं राज्य आहे"

इथं रंगीत पारंपरिक युनिफॉर्म घालून फिरणारे जे पहारेकरी आहेत त्यांना 'बीफ ईटर्स' म्हणतात. कधीकधी न हलता एका जागी पुतळ्याप्रमाणं उभं राहणं हे यांचं वैशिष्ट्य. 'तुम्हाला हवं तर त्यांचे फोटो काढा, परंतु त्यांना त्रास देऊ नका. ते युद्धातले निवृत्त सैनिक आहेत. त्यांच्याविषयी आदर बाळगा--' असा इशारा गाईडनं आम्हाला दिला. 'बीफ-ईटर्स' या शब्दाची व्युत्पत्तीदेखील तिनं सांगितली. मूळ शब्द 'बूफे-ईटर्स.' 'बूफे' म्हणजे जेवण. राजाराणीसाठी बनवलेलं जेवण हे चवीला ठीक आहे की नाही याची परीक्षा करणं हे या सेवकांचं कर्तव्य होतं. म्हणून त्यांना 'बूफे-ईटर' म्हणत. त्याचाच अपभ्रंश म्हणजे 'बीफ-ईटर !' यांपैकी काहीजण बरेच वयस्क–पांढरे शुभ्र केस दाढी, मिश्या, भिवया सर्व पिकलेले असे होते. त्यांना पाहण्यासाठी आणि त्यांच्याशी बोलण्यासाठी मुलांची व हौशी प्रवाशांची झिम्मड उडाली होती. यांच्या विनोद-बुद्धीचाही प्रत्यय एके ठिकाणी आला. इथल्या तुरुंगाच्या आवारात हिंडताना आम्ही वाट विसरलो म्हणून एका 'बीफ-ईटर'ला विचारलं, "कॅन वी गो आऊट फ्रॉम हियर ?" ('इथून बाहेर जाण्याची वाट आहे का' असं आम्हाला म्हणायचं होतं. परंतु 'कॅन' हा शब्दप्रयोग चुकीचा असावा.) तो पहारेकरी हसून म्हणाला, "सर्टनली यू कॅन ! देअर आर नो मोअर प्रिझनर्स हिअर !"

याच 'टॉवर ऑफ लंडन' जवळ राजघराण्याचं 'ज्युवेल हाऊस' (रत्नभांडार) आहे. इथं तिकीट काढण्यासाठी भलामोठा क्यू होता. तरी ही संधी पुन्हा मिळणार नाही म्हणून आम्हीदेखील रांगेत उभे राहिलो. आत गेल्या-वर काचेच्या कपाटांतून विविध मौल्यवान, रत्नजडित वस्तू ठेवलेल्या दिसल्या. पाहणाऱ्यांसाठी म्हणून दोन विभाग होते. ज्यांना हळूहळू काळजीपूर्वक निरीक्षण

आली. सगळीकडे एक समतेची भावना दिसली. आमच्या गाईडच्या वागणुकीत-सुद्धा 'अतिथिदेवो भव'सारखी अजिजी कधी दिसली नाही. ती आमची पगारी नोकर आहे, असंही कुणी तिला वागवलं नाही. त्याचप्रमाणे आपण कुणी 'नेत्या' असल्यागत तिनं दादागिरीही केली नाही. (इथे एक 'सहलसम्राट' म्हणून गाजलेले गृहस्थ प्रवाशांना अतिशय तुच्छतेनं मेंढरं हाकल्यागत वागवतात असं ऐकलं होतं) तर आमची एक समवयस्क मैत्रीण असल्यागत खेळीमेळीच्या वातावरणात तिनं सर्व मार्गदर्शन केलं.

तिचा आवाज गोड होता. उच्चार स्पष्ट होते. वाचन, सामान्य ज्ञानही भरपूर होतं. (सर्वच मार्गदर्शक असे असतील असा माझा गैरसमज झाला, पण पुढे काहींनी अपेक्षाभंग केला.) स्थळदर्शन करताना, बसमधून जातानासुद्धा ती अनेक विषयावर भाष्य करी. प्रथम तिनं आम्हाला 'वेस्टमिन्स्टर अॅबे' आणि 'सेंट पॉल्स कॅथड्रिल' ही दोन भव्य चर्चेस् दाखवली. इथे अनेक लोकोत्तर पुरुषांची थडगी आहेत 'सेंट पॉल्स्' हा रेन नावाच्या सुप्रसिद्ध वास्तु-शास्त्रज्ञाच्या कलेचा सुंदर आविष्कार आहे. इथलं कोरीव काम, शिल्पकला हे विलक्षण थक्क करून टाकणार आहे. त्याचं मर्म तिने आम्हाला समजावून सांगितलं. याच्या वरच्या प्रचंड घुमटामध्ये गोल घुमटाप्रमाणे 'व्हिस्परिंग गॅलरीज' आहेत. म्हणजे एके ठिकाणी हळू आवाजात उच्चारलेले शब्द बऱ्याच लांबवर ऐकू येतात. (आपल्याकडे मुंबईचं नरीमन पॉइंटंच टाटा थिएटर हे असंच तंत्र वापरून बांधलेलं आहे. इथे ध्वनिक्षेपक वापरावा लागत नाही. स्टेजवरचा प्रत्येक शब्द अगदी मागच्या रांगेपर्यंत ऐकू जातो.) इथे युद्धात बलिदान केलेल्या अनामिक सैनिकाची प्रतिमा आहे. अनेक मृत सैनिकांच्या नावाचं एक प्रचंड रजिस्टर इथे ठेवण्यात आलेलं आहे. रोज त्याचं एकेक पान उलटण्यात येतं आणि प्रवाशांना त्यावरची नावं वाचता येतात. (परंतु प्रवाशांना त्याला हात लावण्याची किंवा पान उलट-सुलट करण्याची मनाई आहे.) इथेच युद्धात लंडन शहर जळत असताना त्या पार्श्वभूमीवर सेंट पॉलच्या घुमटाचा कुणी एकानं घेतलेला फोटो लावलेला आहे.

नंतर आम्ही 'टॉवर ऑफ लंडन' पाहायला गेलो. इथे पूर्वी कैद्यांना ठेवण्यात येत असे. सर वॉल्टर रॅले हेसुद्धा इथेच होते. अनेक राजद्रोही व्यक्तींना इथे फाशी देण्यात आलं. या टॉवरच्या सभोवती एक भला-मोठा पाण्याचा खंदक

आहे. गाईड म्हणते, " याल पूर्वी इतकं घाण पाणी असायचं की याच्या घाणी-मुळेच शत्रू जवळ यायलासुद्धा धजत नसे असं म्हणतात " या इमारतीच्या परिसरात अनेक डोमकावळे दिसतात त्यावर तिचं भाष्य असं, " एकदा एका ज्योतिष्यानं सांगितलं की जोवर इथं हे डोमकावळे वास करीत आहेत तोपर्यंत इंग्लंडवर राजाराणीची सत्ता चालेल. आम्हाला तर राजघराणं अतिशय प्रिय ! म्हणून आम्ही काय करतो ? या डोमकावळ्यांचे पंखच कापून टाकतो. त्यामुळं ते कुठेच उडून जाऊ शकत नाहीत आणि म्हणून आमच्याकडे अजून राणीचं राज्य आहे."

इथं रंगीत पारंपरिक युनिफॉर्म घालून फिरणारे जे पहारेकरी आहेत त्यांना ' बीफ ईटर्स ' म्हणतात. कधीकधी न हलता एका जागी पुतळ्याप्रमाणं उभे राहणं हे यांचं वैशिष्ट्य. ' तुम्हाला हवं तर त्यांचे फोटो काढा, परंतु त्यांना त्रास देऊ नका. ते युद्धातले निवृत्त सैनिक आहेत. त्यांच्याविषयी आदर बाळगा--' असा इशारा गाईडनं आम्हाला दिला. ' बीफ-ईटर्स ' या शब्दाची व्युत्पत्तीदेखील तिनं सांगितली. मूळ शब्द ' बूफे-ईटर्स.' ' बूफे ' म्हणजे जेवण. राजाराणीसाठी बनवलेलं जेवण हे चवीला ठीक आहे की नाही याची परीक्षा करणं हे या सेवकाचं कर्तव्य होतं. म्हणून त्यांना ' बूफे-ईटर ' म्हणत. त्याचाच अपभ्रंश म्हणजे ' बीफ-ईटर ! ' यांपैकी काहीजण बरेच वयस्क–पांढरे शुभ्र केस दाढी, मिश्या, भिवया सर्व पिकलेले असे होते. त्यांना पाहण्यासाठी आणि त्यांच्याशी बोलण्यासाठी मुलांची व हौशी प्रवाशांची झिम्मड उडाली होती. यांच्या विनोद-बुद्धीचाही प्रत्यय एके ठिकाणी आला. इथल्या तुरुंगाच्या आवारात हिंडताना आम्ही वाट विसरलो म्हणून एका ' बीफ-ईटर 'ला विचारलं, " कॅन वी गो आऊट फ्रॉम हियर ? " ( ' इथून बाहेर जाण्याची वाट आहे का ' असं आम्हाला म्हणायचं होतं. परंतु ' कॅन ' हा शब्दप्रयोग चुकीचा असावा ) तो पहारेकरी हसून म्हणाला, " सर्टनली यू कॅन ! देअर आर नो मोअर प्रिझनर्स हिअर ! "

याच ' टॉवर ऑफ लंडन ' जवळ राजघराण्याचं ' ज्युवेल हाऊस ' ( रत्नभांडार ) आहे. इथे तिकीट काढण्यासाठी भलामोठा क्यू होता. तरी ही संधी पुन्हा मिळणार नाही म्हणून आम्हीदेखील रांगेत उभे राहिलो. आत गेल्या-वर काचेच्या कपाटातून विविध मौल्यवान, रत्नजडित वस्तू ठेवलेल्या दिसल्या. पाहणाऱ्यासाठी म्हणून दोन विभाग होते ज्यांना हळूहळू काळजीपूर्वक निरीक्षण

करीत हिंडायचं असेल त्यानी कपाटाच्या जवळून जाव आणि ज्याना भरभर जायचं असेल त्यानी पाठीमागच्या रांगेतून सरकावं म्हणजे दोघाना एकमेकाचा अडथळा होत नाही.

यात तलवारी, चिलखतं, मुदपाकखान्यात वापरण्याची सोन्याची भांडी, त्याचप्रमाणे मेजवानीच्या वेळी उपयोगात आणायची कटलरी, फुलदाण्या, विविध प्रकारचे अलंकार आणि राजमुकुट हे सर्व पाहायला मिळाले. मला ' कोहिनूर ' हिरा पाहायचा आहे असं मी ' गाईडला 'ला सांगितलं होतं. तिनं मला तो आठवणीनं दाखवला. सध्या तो राणीच्या आईच्या ( क्वीन मदर ) मुकुटात आहे. तिथे कोहिनूर ' असं लिहूनही ठेवलय मी हिंदुस्थानात असताना काही दिवसा-पूर्वी पेठ्याच्या दुकानात हिऱ्याच्या किंमतीची चौकशी केली होती. एक छोटा अंगठीतला पाव कॅरटचा खडा तीन हजार रुपयाचा पाहिला होता. या ' कोहिनूर 'चं वजन काय असेल ? आणि आज त्याची किंमत किती कोटींच्या घरात असेल ? असं किती धन आपल्या ' सुजला सुफला ' देशातून या परकीयानी पळवून नेलं असेल ! सोन्याच्या ' मयूरासनात ' किती रत्न जडवलेली होती याविषयी शालेय पुस्तकात एक धडा होता. कुठे गेलं ते वैभव ? आज भिक्षेची कटोरी हाती का आली ? आणि किती काळ ती राहणार ? त्या श्रीमंत, उंची वातावरणात मला एकदम फार उदास, रितं वाटलं.

तिथून आम्ही राणीचा बकिंगहॅम पॅलेस पाहायला गेलो. हा राजवाडा आम्हाला आतून काही बघता आला नाही. तसा तो दाखवतात की नाही तेही माहीत नाही. पण ' चेंजिंग ऑफ गार्डस् ' नावाचा रोजचा ठरावीक वेळी होणारा कार्यक्रम असतो. सुमनला मी आदल्या दिवशी विचारलं, ' हा काय प्रकार आहे ? ' ती हसून म्हणाली, ' काही विशेष नाही ग ! तिथे पहारेकरी आहेत त्याची ड्यूटी बदलते एवढच.' हा ब्रिटिश सोल्जर आपण अनेक वेळेला मुलाच्या खेळण्यात किंवा चित्रात पाहिलेला आहे. लाल युनिफॉर्म आणि डोक्यावर उंच काळी टोपी. असे अनेक पहारेकरी राजवाड्याचं रक्षण करीत असतात. नव्यानं ड्यूटीवर येणारे गडी काळ्या घोड्यावर वगैरे बसून बँडच्या साथीनं येतात. पुन्हा राज-वाड्याच्या आवारात छोटं संचलन होतं. नवे रक्षक कामावर रुजू होतात व जुने निघून जातात. हा सर्व सोहळा बँडच्या तालावर होतो. कामाची पाळी बदलणं यात एवढं विशेष काय आहे ? परंतु ' झुकानेवाला चाहिये ' हेच खरं ! हा

कार्यक्रम पाहण्यासाठी कोण गर्दी ! राजवाड्याच्या फाटकाशी अगदी झोंबाझोंबी ! लोक मिळेल त्या भिंतीवर, झाडावर जागा पटकावून बघत होते, फोटो किंवा फिल्म घेत होते, दुर्बिणीतून पाहात होते. आम्हीदेखील राजवाड्याच्या पार्श्व-भूमीवर फोटो काढले-- गार्डसूचे नव्हे, आमचेच !

त्या दिवसात इंग्लंडचं अर्जेंटिनाविरुद्ध युद्ध चालू होत. गाईडनं आम्हाला माहिती दिली, 'राजपुत्र अँड्र्यूज ह्यादेखील एका युद्धनौकेवर आहे आणि त्यामुळे राणी फार काळजीत आहे ' अशी ! पूर्वी पुराणातल्या कथा सांगताना आई सांगे, ' कैकयी संतापमंचकावर झोपली ' इत्यादी. तशीच आज एलिझाबेथ राणी ' चिंता-मचका 'वर झोपली असेल काय ?

तिथून आमच्या गाईडनं आम्हाला डिकन्सचं ' ओल्ड क्युरिऑसिटी शॉप ' पाहायला नेलं. १५६७ साली बांधण्यात आलेलं छोटंसं दुकान अधूनमधून थोडीशी डागडुजी करून शक्यतो मूळ स्वरूपात संभाळून ठेवलेलं आहे डिकन्सची ही कादंबरी प्रसिद्ध होत असताना कित्येक वाचकांनी पत्र पाठवून ' छोट्या नेल्ला मारू नका ' अशी विनती केल्याचं ऐकलं. नेल्चं आणि तिच्या आजोबांचं हे निवासस्थान पाहण्यासाठी कित्येकजणांनी या छोट्या दुकानाचं दर्शन घेतलं. एकदा हे दुकान पाडून रस्ता रुंद करणार असल्याची अफवा उठली तेव्हा तर रोज वाचकांची तिथे गर्दी होऊ लागली. कादंबरीतली पात्र जणू खरोखरीच तिथे राहात आहेत अशा अर्थानं वाचक त्यांची विचारपूस करीत. नेल्च्या आठवणीनं तर कित्येक स्त्रिया अश्रू ढाळीत. शेवटी दुकान सुखरूप राहिलं आणि अजूनही उभं आहे. ' ओल्ड क्युरिऑसिटी शॉप ' या दुकानाच्या पाटीखाली ' चार्लस् डिकन्सनं अमर केलेलं ' अशी अक्षरं कोरण्यात आली आहेत. आता इथे छोट्या ' क्यूरिओज् ' तर मिळतातच, परंतु मुख्यतः डिकन्सची पुस्तकं आणि त्याच्याशी संबंधित अशा अनेक छोट्या ' स्मरणवस्तू ' ( सूवेनिअर्स ) मिळतात. दुसऱ्या महायुद्धाची झळ या दुकानाला लागली नाही हे याचं भाग्य !

संध्याकाळी घरी परतण्याची वेळ झाली, तोवर आमच्या गाईडचा आवाज पार बसला होता. परंतु तिची दिवसभराची घसाफोड चांगली सार्थकी लागली होती. सर्व प्रवाशांनी तिचे आणि ड्रायव्हरचे आभार मानले आणि आम्ही घरी परतलो.

दुसऱ्या दिवशी रविवार. लंडन वास्तव्यात हा एकच रविवार आमच्या पदरी

होता. तेव्हा आम्ही स्ट्रॅटफर्ड हे शेक्सपिअरचं जन्मस्थान आणि ऑक्सफर्ड हे विद्यापीठ पाहून यायचं ठरवलं. रविवार असल्यामुळे सुमन व कॉलिन दोघही आमच्याबरोबर आली. कॉलिन म्हणाला, " तुम्हाला नवल वाटेल पण मी स्ट्रॅटफर्ड अजून पाहिलेलं नाहीत."

मी म्हटलं, " असं नेहमीच होत. मुंबईच्या हाकेच्या अंतरावर असलेली घारापुरीची लेणी मी अजून पाहिलेली नाही."

स्ट्रॅटफर्डला जाताना आमचा मार्गदर्शक हादेखील वयस्कच होता. पण त्याच एकूण मार्गदर्शन मला काही आवडलं नाही शेक्सपियरच्या गावी जाताना मनात किती भक्तिभाव घेऊन आपण जात असतो. पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यासारखी आपली अवस्था असते. एखादा समर्थ अभ्यासू गाईड असता तर त्यानं आपल्या ओघवत्या वाणीनं आम्हाला वाङ्मयाच्या साम्राज्यात नेऊन सोडलं असतं पण या गृहस्थाची ' अतिपरिचयात् अवज्ञा ' अशी काहीशी अवस्था होती. कसले-तरी हलकेफुलके चुटके सांगून तो आमची करमणूक करीत होता. त्यामुळे नीटशी वातावरणनिर्मिती काही त्याला करता आली नाही. ( आधल्या दिवशीची मार्गदर्शिका त्याच्याहून कितीतरी अधिक लायक, कार्यक्षम आणि बहुश्रुत होती.)

वाटेतच ऑक्सफर्ड लागलं. या विद्यापीठाची ख्याती तर शैक्षणिक जीवनात वेळोवेळी ऐकत आलो होतो. विद्येचं माहेरघर शोभावं अशा भव्य, प्रशस्त इमारती, शांत वातावरण, उद्योगीकरणाचं गालबोट नाही इथल्या एका कॉलेजचं प्रचंड वाचनालय, क्लासरूम्स, हॉस्टेलचं जेवणघर आणि चर्च हे सर्व काही हिंडून पाहिलं.

रविवार असल्यामुळे कॉलेजमध्ये सामसूम होती. चर्चमध्येसुद्धा भर दुपारी कुणीच नव्हतं. फक्त वरून धीरगंभीर असे पियानोचे सूर ऐकू येत होते. वादक दिसत नव्हता. ते अशरीरी स्वर वातावरण भारून टाकीत होते. पियानोचा आवाज कुठल्या कुठे घेऊन जातो. माझं शिक्षण ' सेंट कोलंबा स्कूल ' या प्रॉटेस्टंट शाळेत झालेलं. इथे रोज सकाळची प्रार्थना पियानोच्या साथीनं व्हायची. त्यामुळे पियानोचे स्वर कानी आले की ते मोरपखी दिवस आठवतात. नाताळच्या दिवसात म्हटलेली ' कॅरल्स ', गोठ्यात जन्माला आलेल्या बाळाची कहाणी, आभाळातला तारा, भोवतीचे देवदूत, बाळासाठी नजराणा घेऊन आलेले राजे महाराजे---

पियानोचे संदर्भ प्रार्थना, चर्च, बायबल याच्याशी घनिष्ठपणे जुळलेले आहेत. जसे सनई-चौघड्याचे सूर थेट देवळात घेऊन जातात, तसाच हा पियानो.

इ. स. १२४० मध्ये स्थापन झालेले हे विद्यापीठ आजतागायत आपला मान टिकवून आहे. ऑक्सफर्डचा टिळा लागणं हे देशोदेशीच्या स्कॉलर्सचं स्वप्न असतं. टेम्स नदीतूनही ऑक्सफर्डला येता येतं. नदीतून दिसणारं शहराचं दृश्य, अनेक कॉलेज-इमारतींचे व चर्चेसचे मनोरे, सारं काही भान हरपून टाकणारं आहे.

ऑक्सफर्डकडून आम्ही स्ट्रॅटफर्डला निघालो. या शेक्सपिअरच्या जन्मस्थानाला 'स्ट्रॅटफर्ड अपॉन ॲवन' म्हणतात. (नदीवरचं स्ट्रॅटफर्ड) गावात शिरताच एका उंच चौथऱ्यावर शेक्सपिअरचा पुतळा दिसतो आणि खाली त्याच्या चारी बाजूंना त्याच्या नाटकांतील चार पात्रांचे पुतळे (हॅम्लेट, लेडी मॅक्बेथ, फॉलस्टॉफ इ.) आहेत. हॅम्लेटच्या हातात एक कवटी आहे. 'हॅम्लेट'मधला एक स्मशानातला प्रवेश—एकेक कवटी हातात घेऊन हॅम्लेट होरेशियोला म्हणतो, 'ही कवटी कुणाची असेल? एखाद्या राजकारणी पुरुषाची किंवा एखाद्या सरदाराची, एखाद्या वकिलाची! एके काळी कोण होते ते आणि आज ही काय अवस्था!' एकूणच जीवनाच्या अर्थशून्यतेवरच भाष्य हॅम्लेटच्या तोंडी आहे.

हातात कंदील घेऊन उभ्या असलेल्या लेडी मॅक्बेथच्या चेहऱ्यावरचे भावही पाहण्यासारखे! सर्वच पुतळ्यांचं बारकाईनं निरीक्षण करणं शक्य नव्हतं. कारण वेळ फार थोडा होता. शेक्सपिअर ज्या घरात जन्माला आला ते प्रथम पाहायला गेलो. इथे माडीवर ज्या खोलीत तो जन्मला तिथे झुलता पाळणा, पलंग वगैरे सगळ्या वस्तू आहेत. 'फोटो काढण्यास मनाई आहे' असं सगळीकडे लिहिलेलं असतं. परंतु तेथील रक्षकांना चुकवून प्रवासी फोटो काढतातच. शिवाय बाहेर तयार चित्रकार्ड मिळतातच. मग फोटोंना मनाई का ते मला अजून कळलेलं नाही. मी अतिप्रामाणिकपणानं तिथं पहारा करणाऱ्या स्त्रीला म्हटलं, 'मी फोटो काढू का?' तर ती डोळे मिचकावून म्हणाली, 'मी तुला फोटो काढताना पाहिलं तर मी नक्कीच मनाई करीन—' म्हणजेच 'माझा डोळा चुकवून तू काढ!'

तिथूनच पुढच्या खोलीत शेक्सपिअरची अनेक चित्रं, त्याचं हस्ताक्षर, त्याची सही वगैरे पाहायला मिळतं. खाली त्याच्या नाटकातील अनेक पात्रांची चित्रं-गोल

तबकड्यावर रेखाटलेली—भिंतीवर लावलेली दिसतात हे घर पाहून झाल्यावर आम्हाला शेक्सपियरच्या बायकोच माहेरघर दाखवण्यात आलं. इथे एका विशिष्ट बाकड्यावर बसून त्यान प्रियाराधन केलं म्हणे ! इथवर सारं आम्ही भक्तिभावान पाहिलं. पण यानंतर आम्हाला शेक्सपिअरच्या सासूच्या स्वैपाकघरात नेऊन ती घरातच पाव कसा बनवायची याचं प्रात्यक्षिक ( अर्थात नुसते हातवारे करून ) दाखवण्यात आलं. आता यानतर ती गाईचं दूध वगैरे कसं काढायची हे दाखवतात की काय म्हणून मी घाबरले. पण तेवढ्यावरच सुटका झाली. अशा टूरमध्ये आपण बहुधा ' मुकी बिचारी 'च असतो. जे जे दाखवतील ते निमूट-पणे पाहावंच लागत

शेक्सपिअरचे पुरुष वशज कुणी नसल्याच सागण्यात आलं. त्याच्या घराच्या पुढच्या भागात वडिलाच दुकान होतं म्हणे. शेक्सपिअरच्या चारशेव्या जन्मदिनी एका हंगेरियन कलाकारानं मोठ्या गोलकार धातूच्या तुकड्यावर त्याच्या नाटका-तील विविध प्रसंग कोरलेले आहेत. कुठला प्रसंग कुठल्या नाटकातला हे ठरवण्यात बराच वेळ गेला.

पूर्वी आमच्या वेळी इंग्लिश हा खास विषय घेतला नाही तरी बी. ए पर्यंत शेक्सपिअरची तीन-चार नाटकं सहज अभ्यासिली जात. आजकाल त्याचं पूर्णपणे उच्चाटन झाल्याचं ऐकलं. कुणी म्हणालं, ' इंग्लिशला शेक्सपियर नाही आणि मराठीला ज्ञानेश्वरी नाही, तर मग शिकवतात तरी काय ? ' ' स्ट्रॅटफर्ड—अपॉन ॲवन ' या गावात वावरताना मनात जे एक सुंदर इद्रधनुष्य उभ होत त्याचा आताच्या विद्यार्थ्यांना कधीच अनुभव येणार नाही.

आपल्या झेवियर्स कॉलेजमधल्या आर्मांद मेनोझिस या इंग्लिशच्या प्राध्यापका-विषयी मी एक हकीकत नुकतीच वाचली होती. ते स्ट्रॅटफर्डला गेले असता एका हॉटेलात बसून जेवत होते. तिथेच शेजारी जेवत असलेल्या एका गोऱ्या इसमाशी त्याची ओळख झाली. शेक्सपिअरच्या जन्मग्रामी आल्यामुळे प्रा. मेनोझिस भारावून गेले होते कित्येक वर्षं शेक्सपिअर शिकवीत असल्यामुळे त्याना ही नाटकं मुखोद्गत होती. बोलता बोलता ते नाटकातील उतारेच्या उतारे म्हणून दाखवू लागले. त्याचा गोरा शेजारी थक्क होऊन ऐकत होता शेवटी तो म्हणाला, ' आज रात्री इथल्या थिएटरमध्ये ' हॅम्लेट 'चा प्रयोग आहे. तुम्हाला यायचं आहे का ? '

' अर्थात ' प्राध्यापक महाशय उत्तरले.

' मग मी तुम्हाला पहिल्या रांगेत जागा ठेवीन–'

' तुम्ही, कस काय—? ' प्रा. चकित.

' मी त्या नाटकात हॅम्लेटची भूमिका करणार आहे—'

' तुम्ही कोण ? '

मी पीटर ओटूल '

नंतर त्या छोट्या गावातून खूप भटकलो सर्व दुकानात अर्थातच शेक्सपिअरच्या अनेक स्मरणवस्तू व चित्रकार्डं होतीच. युरोपच्या यात्रेत मी एक पाहिलं. प्रवासी ज्या ज्या स्थळाना भेट देतील तिथं तीन गोष्टी हमखास आढळायच्या पहिली गोष्ट म्हणजे उपाहारगृह. दुसरी गोष्ट म्हणजे स्मरणवस्तू आणि चित्रकार्डांचं एक छोटं दुकान ( अगदी चर्चमध्येसुद्धा ) आणि तिसरी गोष्ट म्हणजे स्वच्छतागृह. शिवाय सर्व स्वच्छतागृहं खरोखरीच आतून लख्ख असायची. ( आपल्याकडे अमुक ठिकाणी सार्वजनिक संडास आहे, हे लांबून वासावरून ओळखता येत. तसं इथे कुठे आढळलं नाही.) बसमधून खाली उतरल्याबरोबर या तीन गोष्टी दिसायच्या आणि त्यामुळे कुठेच गैरसोय वाटली नाही.

जिथे शेक्सपिअरचा पुतळा आहे. तिथेच पलीकडून नदीच पात्र वाहतं आणि नदीच्या काठावर नाट्यगृह उभ आहे. या नाट्यगृहात रात्री शेक्सपिअरच्या नाटकाचा प्रयोग होता. तिथं राहून तो पाहण हा एक अपूर्व अनुभव मिळाला असता. पण ते शक्य नव्हत. संध्याकाळी आम्ही लंडनला परतलो.

लंडनच्या हाईड पार्कविषयी खूप ऐकलं होत. प्रत्येक रविवारी तिथ, ठिकठिकाणी खोक्यावर उभे राहून लोक हव्या त्या विषयावर भाषणं ठोकीत असतात हेही वाचल होत. लंडन वास्तव्यातला हा आमचा एकमेव रविवार. स्ट्रॅटफर्ड भेटीमुळ सत्कारणी लागला होता. तरी घरी परतताना मी सुमनला म्हणाले, " जाताना वाटेत आपल्याला हाईड पार्क लागेल का ? "

ती हसून म्हणाली, " छे ! ते कुठल्या कुठे राहिलं ! "

दुसऱ्या दिवशी स्पॅनिश एम्बसीमध्ये जाऊन ' व्हिसा ' मिळवायचा आणि नंतर फ्रान्सकडे कूच करायचं अस ठरलं होतं. तेव्हा आमच्यापुरत ' लंडन दर्शन ' संपल होत. दुसऱ्या दिवशी जे एक वेगळ्याच प्रकारचं ' लंडन दर्शन ' घडलं त्याची मात्र स्वप्नातसुद्धा कल्पना नव्हती.

लंडनमधलं स्थलदर्शन सपल्यावर तिथून फ्रान्सला व तिथून पुढे पोर्तुगालला असा आमचा कार्यक्रम होता. पॅरिसहून लिस्बनला ( पोर्तुगालची राजधानी ) आगगाडीतून जाताना वाटेत स्पेनमधून जावं लागतं. तेवढ्या प्रवासासाठी स्पेनच्या ' ट्रान्सिट व्हिसा 'ची आवश्यकता होती तो आणण्यासाठी म्हणून सोमवार दि. २४ मे रोजी सकाळी लंडनच्या स्पॅनिश वकिलातीत निघालो. गेले तीन दिवस सुमन आमच्याबरोबर होती. त्यामुळे सोमवारी आम्ही तिला बळेबळेच ऑफिसला पाठवली. इग्लंडमध्ये भाषेचा प्रश्न नसल्यामुळे आजची भटकती स्वतंत्रपणे करायची अस ठरलं. सुमनन आम्हाला एक लडनचं गाईड आणि नकाशा दिला. या नकाशात अगदी छोटे गल्लीबोळसुद्धा दाखवले होते.

बसमधून आम्ही ' बेलग्रेव्ह स्क्वेअर ' या विभागात येऊन पोचलो. इथे बहुतेक विदेशी वकिलाती असाव्यात. विस्तीर्ण रस्ते, मोठमोठ्या इमारती आणि रस्त्यावर रहदारी अजिबात नव्हती. सुटीच्या दिवशी फोर्टमध्ये सामसूम असते तस एकूण वातावरण. ( मला मुंबईच्या गजबजाटाचा कधी उबग येतो, त्यामुळे हे निर्जन रस्ते खूप आवडायचे सुमनच्या घराच्या आसपास देखील अशीच सामसूम. मी एकटीच पत्र टाकायच्या निमित्तान एक रपेट मारून येत असे. ) परंतु त्या दिवशी असा प्रसग गुदरला की तेव्हापासून माझ्या मनात या निर्जन रस्त्याविषयी एक कायमची धास्ती बसून गेली.

स्पॅनिश वकिलात कुठे आहे ते शोधत आम्ही तिघं फिरत होतो. रस्त्यावर चिटपाखरूसुद्धा नव्हत. म्हणजे पायी फिरणारी माणस नव्हती. मोटारगाड्या येतजात होत्या. इमारतीच्या तळमजल्यावर दुकानं होती. परतु थडीमुळे त्याची दारं बद. चौकशी कुणाजवळ करावी ते कळेना. कोपऱ्यावर एक बँक होती. त्या बँकेच्या दाराशी थाबून आम्ही नकाशा पाहात होतो.

एवढ्यात एक मोठी मोटार आमच्या पाठीमागे येऊन थाबली. माझी तिकडे पाठ होती, पण ह्यानी त्या मोटारीतून एका निग्रो इसमाला उतरताना पाहिलं. तरी ह्याचं लक्ष नकाशाकडेच होत. आपली छोटी चामडी पर्स ह्यांनी काखेत धरली होती. तो निग्रो पाठीमागून आला आणि त्यानं एकदम हाताचा एक फटका देऊन पर्स हस्तगत केली. काय झालं ते आमच्या लक्षात येईपर्यंत तो आमच्या पुढे पळताना दिसला. पळतानासुद्धा त्याचा चेहरा आमच्याकडेच होता. हे एकदम त्याच्यामागे धावले, पण तोपर्यंत ती पाठीमागची मोटार फुटपाथ-

जवळून सरकत पुढे गेली, तो झटक्यात त्यात बसला–आणि मोटार आमच्या डोळ्यांदेखत नाहीशी झाली !

हा धक्का एवढा अनपेक्षित आणि जबरदस्त होता की काही क्षण आम्ही तिथं थिजल्यासारखे झालो हे हात उचावून हताशपणे म्हणाले, " गेली पर्स ! " अन् तर रडायलाच लागली. मी विचारलं, " काय–काय होतं त्यात ? "

हे म्हणाले, " घाबरू नकोस. पैसे काहीच नव्हते. पण पासपोर्ट, व्हिसा, परतीची विमानाची तिकिटं सगळ नेलं– "

पासपोर्ट गेले म्हटल्यावर माझे हातपायच गळाले. त्या ठिकाणी एकदम पोरकं, निराधार वाटलं. जाता-जाता त्या मोटारीचा नंबर आम्ही टिपून ठेवला होता. जवळच्या एखाद्या पोलिस ठाण्यावर वर्दी द्यावी किंवा फोन करावा असा विचार आमच्या मनात येत असतानाच एकदम एक पोलिस गाडी दिसली. आम्ही लगेच हात करून ती थांबवली आणि आत बसलो. सगळी हकीगत सांगितली, मोटारचा नंबर दिला, चोराचं वर्णन सांगितलं. चोर जरी निग्रो होता तरी त्याचे गाडीतले साथीदार गोरे होते. पोलिसांनी सगळ लिहून घेतलं आणि वायरलेसवरून ही सगळी माहिती कुणाला तरी सांगितली.

मला वाटलं आता सिनेमातल्याप्रमाणे ही माहिती चहूकडे जाईल आणि ती मोटार पकडण्यात येईल. ( कारण चोरीच्या क्षणानंतरच पाच मिनिटातच आम्हाला पोलिस भेटले होते.) पण कसचं काय ? त्याने सरळ आम्हाला पोलिस स्टेशनवर नेलं, तिथल्या दुसऱ्या एकानं सगळ लिहून घेतलं आणि आम्हाला थंडपणे सांगितलं, " काही तपास लागलाच तर आम्ही तुम्हास कळवतो, आता तुम्ही जाऊ शकता– "

बाहेर रस्त्यावर आलो. पुन्हा तेच निर्जन रस्ते. पण आता मला त्याचं मुळीच कौतुक वाटेनासं झालं. छातीतली धडधड अजून थांबली नव्हती. प्रत्येक कोपऱ्यावर कुणीतरी दबा धरून बसलय् अशी भीती वाटायची. प्रथम एका हॉटेलमध्ये शिरून थोडी कॉफी घेतली तिथून घरी फोन करून कॉलिनला सारी हकीकत सांगितली. तोही बिचारा स्तंभितच झाला ' सुमनला ऑफिसमध्ये कळव ' असा निरोप ठेवून आम्ही लंडनमधल्या भारतीय वकिलातीत गेलो.

परदेशातल्या भारतीय वकिलातीविषयी मी फार तक्रारी ऐकल्या होत्या त्यामुळे मनातून धाकधूक होती. पण आम्हाला मुकर्जी नावाचे एक अधिकारी

भेटले. गृहस्थ कुठल्याही सरकारी दप्तरात न शोभावा असा हसतमुख' सौजन्यशील आणि मनमोकळा ते म्हणाले, ' काही घाबरू नका असा अनुभव पुष्कळाना येतो मी तुम्हाला दुसरे पासपोर्ट करून देईन. फक्त तुमच्या ओळखीचे कुणी, इथे प्रतिष्ठित भारतीय असतील तर त्याची साक्ष लागेल.'

त्याच्या आश्वासनान इतका धीर आला की मी त्यांना म्हटलंसुद्धा, " परत गेल्यावर मी तुमच्याविषयी लिहिणार आहे इथल्या वकिलातीविषयी खूप गैरसमज आहेत तिकडे आपल्या भारतात भारतीयाना इथे फार तुच्छतेनं वागवतात वगैरे. तुमच्याकडून मात्र आम्हाला अनुभव खूप वेगळा येतोय."

त्यावर ते हसून म्हणाले, " अहो, इथे येणाऱ्याना वेळ फार थोडा असतो. पासपोर्ट हरवले की त्याना झटपट नवे करून हवे असतात. पण आम्हाला आमच्या नियमाप्रमाणे काम कराव लागत, त्यात थोडा वेळ मोडतो मग हे लोक रागवतात, आमच्याविषयी खोटंनाट पसरवितात "

एअरइंडिया ' च्या ऑफिसमध्येदेखील असाच अनुभव आला " तुम्ही उद्या परत या, तोपर्यंत आम्ही तुम्हाला परतीची तिकिटं ड्युप्लिकेट करून देतो," अस आश्वासन मिळाल. जीव थोडासा शात झाला. दुसऱ्या देशांचे ' व्हिसा ' मात्र मिळवण कठीण होत. आमच्या प्रवासाचा एकूण चेहरामोहराच बदलून जाणार होता. कदाचित इथूनच हिंदुस्थानात परत...

दुसऱ्या दिवशी नवे पासपोर्ट घेण्यासाठी म्हणून पुन्हा एम्बसीत गेलो. बरोबर सुमन आणि तिच्या ऑफिसमध्ये तिचे एक भारतीय सहकारी श्री घोष असे भक्कम साक्षीदार होते. तिथे फी भरणार, एवढ्यात कॉलिनचा घरून फोन आला.

काय सागू ? आमचे चोरीला गेलेले पासपोर्ट आणि विमानाची तिकिटं चक्क घरी परत आली होती !

हा चमत्कार कसा झाला ? तर गंमत अशी की, आमच्या पर्समध्ये पैसे नसल्यामुळे बिचाऱ्या चोराची खूपच निराशा झाली असावी. ( आम्ही बँकेसमोर उभे असल्यामुळे चागल घबाड मिळेल अस वाटलं असावं ! ) पर्समध्ये सुमनच एक पत्र होतं तर या शहाण्या शर्विलकांनी कॅमेरा तेवढा काढून घेऊन आमची पर्स पासपोर्ट–तिकिटासह सरळ सुमनच्या घरच्या पत्यावर पाठवून दिली होती, अगदी सुखरूप !

लोक म्हणाले, " हे चोरसुद्धा जटलमन होते, नाहीतर पर्स कुठे फेकून

दिली असती तर ! ''

हे बरीक खरं ! एकदरीत आमचा पुढचा सगळा त्रास वाचला. पण तरी घडलेला प्रसंग आठवून पुढे काही दिवस खूप मनस्ताप झाला आपल्याकडेसुद्धा भुरट्या चोऱ्या होतात पण चोरानं मोटारीतून येऊन डल्ला मारणं अशा प्रकारच्या 'सॉफिस्टिकेटेड' चोरीचा अनुभव जिवाचा थरकाप उडवून गेला. नतर अनेकानी अनेक अनुभव सागितले कधी या चोरांच्या हातात शस्त्रसुद्धा असतात आणि जिवाला दुखापतही होऊ शकते. त्या मानानं आमचं शेपटावरच निभावलं म्हणायचं !

पर्समधून जो कॅमेरा त्यानी चोरला, त्यात शेक्सपिअरच्या जन्मगावी काढलेल्या फोटोंची फिल्म होती. ती गेल्याची मात्र चुटपूट लागून राहिली. न जाणो स्ट्रॅटफर्ड भेटीचा पुन्हा योग येईलही !

ज्या दिवशी पासपोर्ट चोरीला गेले, त्या दिवशी रात्री 'माऊस ट्रॅप' या नाटकाची तिकिटं काढलेली होती. अगाथा ख्रिस्तीच्या या नाटकानं एक विक्रमच केलाय. गेली तीस वर्षं रोज याचा प्रयोग 'हाऊसफुल्ल' गर्दीत चालू आहे. इंग्लिश रगभूमीविषयी इतकं ऐकलं होतं, तेव्हा लंडन वास्तव्यात एक तरी नाटक बघायचं खूप मनात होत. 'माऊस ट्रॅप'चा योग घडून येणार म्हटल्यावर अतिशय आनद झाला होता. पण चोरी प्रकरणामुळे मनाला एवढा धक्का बसला की, 'नाटकाची तिकिट रद्द कर' असं मी सुमनला म्हणत राहिले. पण ती शहाणी ! ती म्हणाली, "चोरीविषयी ज्या काही तक्रारी करायच्या होत्या ते सर्व आपण केलं. आता बाकीचं काम उद्या. रात्री आपण घरी बसून काय करणार ? त्यापेक्षा नाटकाला गेलो तर तेवढाच तुमच्या मनाला विरंगुळा." खरं तर ते रहस्यमय नाटक (खून वगैरे) बघण्याचा मला अजिबात मूड नव्हता. तरी तिनं बळंबळंच आम्हाला ओढून नेलं. आता वाटतं, तिनं योग्यच केलं. कारण ती संधी पुन्हा कधीच आली नसती आणि एकदा नाटक सुरू झाल्यानतर मी सगळं विसरून त्यात गुंतून गेले.

बाहेर खूप बर्फ पडलेलं आहे आणि एका आडवाटेवर असलेल्या हॉटेलचा बाहेरच्या जगाशी पूर्णपणे सपर्क तुटलेला आहे, अशा प्रसगी त्या हॉटेलमध्ये राहणाऱ्या व्यक्तीचे एकापाठोपाठ एक असे रहस्यमय रीतीनं खून होतात. पहिला खून होताच पोलिसांशी कसा तरी संपर्क साधला जातो आणि एक पोलिस इन्स्पेक्टर येऊन थडकतो. तो छडा लावण्याचा प्रयत्न करतो. तरी आणखी खून

होतात 'आता कुणाची पाळी ?'– अशी प्रेक्षकात सारखी धाकधूक आणि 'खुनी कोण ?' हेही एक मोठं प्रश्नचिन्ह! शेवटी अकल्पितरीत्या (खास ॲगाथा–स्टाईल) रहस्याचा उलगडा होतो व खुनी सापडतो. नाटकात अगावर शहारे आणणारी वातावरणनिर्मिती छान साधली होती. 'थ्री ब्लाइंड माईस' या नर्सरी गाण्याचा खुबीनं उपयोग करून घेतला होता. नाटकाची सुरुवातच मुळी एका अंधारातल्या किंकाळीने होते आणि रहस्य गडद होत जातं. अभिनयाच्या दृष्टीने मला आपली मराठी रंगभूमी तुल्यबळ वाटली (अर्थात हे नाटक तीस वर्षांपूर्वीचं आहे हे लक्षात ठेवायला हवं.) महत्त्वाची गोष्ट म्हणजे ध्वनिक्षेपक नव्हता तरी प्रत्येक पात्राचा आवाज असा बुलंद की थेट शेवटच्या रांगेपर्यंत पोचे. नाटकाच्या शेवटी अर्थातच सर्व पात्रांनी स्टेजवर येऊन अभिवादन करणं आणि प्रेक्षकांनी खूप वेळ टाळ्या वाजवून त्यांना दाद देणं! हा प्रयोग सेंट मार्टिन्स या थिएटरमध्ये झाला. थिएटर खूप जुनं असावं. काहीसं आपल्या 'रॉयल ऑपेरा हाऊस' सारखं वाटलं.

दुसऱ्या दिवशी भारतीय वकिलातीतलं काम झाल्यावर 'हाऊस ऑफ लॉर्डस्' पाहायला गेलो. खरं तर 'हाऊस ऑफ कॉमन्स'देखील पाहायचं होतं. कारण त्या वेळी फॉकलंड बेटावरून इंग्लंडचं अर्जेंटिनाशी युद्ध चालू होतं आणि मार्गारेट थॅचर त्या दिवशी लोकसभेत बोलणार होत्या. पण त्यामुळे लोकसभेसाठी प्रवेशाचा भला मोठा लांबलचक क्यू होता. म्हणून आम्ही 'दुधाची तहान ताकावर' म्हणून राज्यसभेकडे मोर्चा वळवला.

भल्यामोठ्या प्रशस्त हॉलमध्ये मधोमध राणीसाठी सिंहासन, तिच्या उजव्या हाताला सत्ताधारी पक्ष, डाव्या हाताला विरोधी पक्ष, मधोमध कर्मचारीवर्ग व समोर पत्रकार कक्ष अशी रचना होती. पत्रकारांच्या पाठीमागे आमची बसायची व्यवस्था होती. प्रथम नव्या सदस्याची ओळख, नंतर विरोधी पक्षाचे प्रश्नसत्र, नंतर सरकार--पक्षाचं स्टेटमेंट व शेवटी चर्चा असा तेथील कामकाजाचा आराखडा. आपल्याकडील पार्लमेंट काही मी अजून पाहिलं नाही, परंतु तिथे काही सदस्य झोपतात, काही शेर वगैरे म्हणून दाखवतात, काही हमरीतुमरीवर येतात हे सर्व ऐकलंय. ('सिंहासन' चित्रपटात थोडी झलक पाहिली होती.) इथं तसं काही दिसलं नाही. सर्व व्यवहार गंभीरपणे चालले होते. बोलणारे खरेखुरे 'लॉर्डस्' वाटत होते. कदाचित लोकसभेमध्ये वेगळं दृश्य पाहायला मिळालं

असतं. पण तो योग नव्हता.

त्या दिवशी आमचे चोरीला गेलेले पासपोर्ट आणि तिकिटं परत मिळाली म्हणून आम्ही खुशीत होतो. रात्री ' पॉपियॉन ' ( फुलपाखरू ) नावाच्या फ्रेंच उपाहारगृहात जेवायला गेलो. कॉलिन नेहमीसारखाच आनंदी मूडमध्ये होता. जेवण येईपर्यंत त्याने आम्हाला ' फ्रेंड्स, रोमन्स, कंट्रीमेन ' हे ' ज्युलियस सीझर 'मधलं भाषण राणा भीमदेवी थाटात म्हणून दाखवलं. वेटरसुद्धा थक्क होऊन पाहात होता. आम्ही बिल देऊन घरी परतताना त्यान " तुमच मघाच भाषण फक्कड झालं बरं का ! "– अशी आवर्जून दाद दिली

युरोपियन स्त्रियांशी विवाहबद्ध झालेले भारतीय पुरुष अनेक आहेत. परंतु युरोपियन पुरुषाशी लग्न केलेल्या भारतीय स्त्रियाचं प्रमाणही आता हळूहळू वाढत आहे. सुमन आणि कॉलिन जीव्ह्स् हे असच एक जोडपं. ( दुसऱ्या अशाच एका जोडप्याची हकीकत पुढे सागेनच ) डोक्याला अकाली पडलेल टक्कल, निळे बारीक मिस्किल डोळे, छातीपर्यंत रुळणारी पिंगट दाढी असा कॉलिन हे एक बहुढंगी व्यक्तिमत्त्व आहे.

कॉलिन हा मुळात पेशान ' इंडस्ट्रियल केमिस्ट'. नतर त्याला तत्त्वज्ञानात रस वाटू लागला आणि आज तो तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक आहे. तो कवीदेखील आहे आणि त्यानं आपली एक मोठी वही आणून त्यातल्या कविता वाचून दाखवल्या. नाटकातील उतारेदेखील त्याला तोंडपाठ आहेत आणि ते नाटकी पद्धतीन म्हणून दाखवण्याची त्याला सवय आहे. तो बासरी आणि पियानो वाजवतो. त्यान सुमनलादेखील बासरी वाजवायला शिकवलं आहे. पियानो हा बाजाच्या पेटी-सारखाच असल्यामुळे मी एके दिवशी पियानोवर ' ख्रिसमस कॅरल्स ' ( सायलेंट नाईट, ओ कम ऑल, यी फेथफुल् वगैरे ) वाजवू लागले. सुमनन बासरीवर मला साथ केली आणि कॉलिन आमच्याबरोबर गात होता. एकूण खूपच गंमत वाटली.

कॉलिनला समाजकार्यातही रस आहे. ' पोर्शिया ट्रस्ट ' नावाच्या एका संस्थेचं तो काम पाहतो संकटात सापडलेल्या स्त्री-पुरुषाना व पौगंडावस्थेतील मुलाना सल्ला देण, मदत करणं, इ. कार्य ही संस्था करते. लंडनमध्ये अनेक डिपार्टमेंटल स्टोअर्स आहेत. तिथे चोऱ्या होऊ नयेत म्हणून टेहळणी करणारे टी. व्ही. सेट्स व कॉम्प्युटर्स बसवलेले आहेत. कधीकधी असं होतं की, एखाद्या

होतात 'आता कुणाची पाळी ?'— अशी प्रेक्षकात सारखी धाकधूक आणि 'खुनी कोण ?' हेही एक मोठं प्रश्नचिन्ह! शेवटी अकल्पितरीत्या (खास अॅगाथा–स्टाईल) रहस्याचा उलगडा होतो व खुनी सापडतो. नाटकात अगावर शहारे आणणारी वातावरणनिर्मिती छान साधली होती. 'थ्री ब्लाइंड माईस' या नर्सरी गाण्याचा खुबीनं उपयोग करून घेतला होता. नाटकाची सुरुवातच मुळी एका अंधारातल्या किंकाळीनं होते आणि रहस्य गडद होत जातं. अभिनयाच्या दृष्टीनं मला आपली मराठी रंगभूमी तुल्यबळ वाटली. (अर्थात हे नाटक तीस वर्षांपूर्वीचं आहे हे लक्षात ठेवायला हवं.) महत्त्वाची गोष्ट म्हणजे ध्वनिक्षेपक नव्हता तरी प्रत्येक पात्राचा आवाज असा बुलंद की थेट शेवटच्या रांगेपर्यंत पोचे. नाटकाच्या शेवटी अर्थातच सर्व पात्रांनी स्टेजवर येऊन अभिवादन करणं आणि प्रेक्षकांनी खूप वेळ टाळ्या वाजवून त्यांना दाद देणं! हा प्रयोग सेंट मार्टिन्स या थिएटरमध्ये झाला. थिएटर खूप जुनं असावं. काहीसं आपल्या 'रॉयल ऑपेरा हाऊस' सारखं वाटलं.

दुसऱ्या दिवशी भारतीय वकिलातीतलं काम झाल्यावर 'हाऊस ऑफ लॉर्ड्स्' पाहायला गेलो. खरं तर 'हाऊस ऑफ कॉमन्स'देखील पाहायचं होतं. कारण त्या वेळी फॉकलंड बेटावरून इंग्लंडचं अर्जेंटिनाशी युद्ध चालू होतं आणि मार्गारेट थॅचर त्या दिवशी लोकसभेत बोलणार होत्या. पण त्यामुळे लोकसभेसाठी प्रवाशाचा भला मोठा लांबलचक क्यू होता. म्हणून आम्ही 'दुधाची तहान ताकावर' म्हणून राज्यसभेकडे मोर्चा वळवला.

भल्यामोठ्या प्रशस्त हॉलमध्ये मधोमध राणीसाठी सिंहासन, तिच्या उजव्या हाताला सत्ताधारी पक्ष, डाव्या हाताला विरोधी पक्ष, मधोमध कर्मचारीवर्ग व समोर पत्रकार कक्ष अशी रचना होती. पत्रकारांच्या पाठीमागे आमची बसायची व्यवस्था होती. प्रथम नव्या सदस्याची ओळख, नंतर विरोधी पक्षाचे प्रश्नसत्र, नंतर सरकार-पक्षाचं स्टेटमेंट व शेवटी चर्चा असा तेथील कामकाजाचा आराखडा. आपल्याकडील पार्लमेंट काही मी अजून पाहिलं नाही, परंतु तिथे काही सदस्य झोपतात, काही शेर वगैरे म्हणून दाखवतात, काही हमरीतुमरीवर येतात हे सर्व ऐकलंय. ('सिंहासन' चित्रपटात थोडी झलक पाहिली होती.) इथं तसं काही दिसलं नाही. सर्व व्यवहार गंभीरपणे चालले होते. बोलणारे खरेखुरे 'लॉर्ड्स्' वाटत होते. कदाचित लोकसभेमध्ये वेगळं दृश्य पाहायला मिळालं

असत. पण तो योग नव्हता.

त्या दिवशी आमचे चोरीला गेलेले पासपोर्ट आणि तिकिटं परत मिळाली म्हणून आम्ही खुशीत होतो. रात्री ' पॅपियॉन ' ( फुलपाखरू ) नावाच्या फ्रेंच उपाहारगृहात जेवायला गेलो. कॉलिन नेहमीसारखाच आनंदी मूडमध्ये होता. जेवण येईपर्यंत त्याने आम्हाला ' फ्रेंड्स, रोमन्स, कंट्रिमेन ' हे ' ज्युलियस सीझर 'मधलं भाषण राणा भीमदेवी थाटात म्हणून दाखवलं. वेटरसुद्धा थक्क होऊन पाहात होता. आम्ही बिल देऊन घरी परतताना त्यान " तुमच मघाच भाषण फक्कड झालं बर का ! "– अशी आवर्जून दाद दिली.

युरोपियन स्त्रियाशी विवाहबद्ध झालेले भारतीय पुरुष अनेक आहेत. परंतु युरोपियन पुरुषाशी लग्न केलेल्या भारतीय स्त्रियाचं प्रमाणही आता हळूहळू वाढत आहे सुमन आणि कॉलिन जीवूस् हे असच एक जोडपं. ( दुसऱ्या अशाच एका जोडप्याची हकीकत पुढे सांगेनच ) डोक्याला अकाली पडलेलं टक्कल, निळे बारीक मिस्किल डोळे, छातीपर्यंत रुळणारी पिंगट दाढी असा कॉलिन हे एक बहुढंगी व्यक्तिमत्त्व आहे.

कॉलिन हा मुळात पेशान ' इंडस्ट्रियल केमिस्ट'. नंतर त्याला तत्त्वज्ञानात रस वाटू लागला आणि आज तो तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक आहे. तो कवीदेखील आहे आणि त्यान आपली एक मोठी वही आणून त्यातल्या कविता वाचून दाखवल्या. नाटकातील उतारेदेखील त्याला तोंडपाठ आहेत आणि ते नाटकी पद्धतीन म्हणून दाखवण्याची त्याला सवय आहे. तो बासरी आणि पियानो वाजवतो. त्यान सुमनलादेखील बासरी वाजवायला शिकवलं आहे. पियानो हा बाजाच्या पेटी-सारखाच असल्यामुळे मी एके दिवशी पियानोवर ' ख्रिसमस कॅरल्स ' ( सायलेंट नाईट, ओ कम ऑल, यी फेथफुल् वगैरे ) वाजवू लागले. सुमनन बासरीवर मला साथ केली आणि कॉलिन आमच्याबरोबर गात होता. एकूण खूपच गंमत वाटली.

कॉलिनला समाजकार्यातही रस आहे ' पोर्शिया ट्रस्ट ' नावाच्या एका संस्थेचं तो काम पाहतो. संकटात सापडलेल्या स्त्री-पुरुषाना व पौगडावस्थेतील मुलाना सल्ला देण, मदत करण, इ. कार्य ही सस्था करते. लंडनमध्ये अनेक डिपार्टमेंटल स्टोअर्स आहेत. तिथे चोऱ्या होऊ नयेत म्हणून टेहळणी करणारे टी. व्ही. सेट्स व कॉम्प्युटर्स बसवलेले आहेत. कधीकधी अस होतं की, एखाद्या

गिऱ्हाइकाच्या विसरभोळेपणामुळे किंवा नजरचुकीनं एखाद्या वस्तूचे पैसे देणं राहून जातं. ( तिथं आपणहून हव्या त्या वस्तू एका ट्रॉलीमध्ये गोळा करायच्या व काउंटरवर नेऊन बिलसाठी द्यायच्या अशी व्यवस्था असते. ) अशा वेळी कॉम्प्युटरवर या पैसे न दिलेल्या वस्तूंची नेमकी नोंद होते आणि त्या गिऱ्हाइकाला अटक करण्यात येते. त्याच्यावर खटला भरण्यात येतो.

ती व्यक्ती एरव्ही चारित्र्यवान् असेल तर अशा प्रकारच्या खटल्यामुळे तिचं नाव समाजात बदनाम होतं, तिचं मनःस्वास्थ्य बिघडून जातं अशा वेळी ' पोर्शिया ट्रस्ट ' तिला नैतिक बळ देते. तिचं म्हणणं ऐकून घेणं, कोर्टात तिच्या बाजूनं साक्ष देणं, पुरावा सादर करणं हे सारं करते. ( एकदा नर्गिस लंडनला गेली असता तिच्यावर आणि एका भारतीय क्रिकेटवर– सुधीर नाईक - सुद्धा असा प्रसंग आला होता. तो त्यातलाच प्रकार असावा. त्या दोघाना याचा खूपच त्रास झाला होता. ) आम्ही तिथें होतो तेव्हा अशी एक स्त्री कॉलिनला भेटायला येत असे. तिच्या मुलीला एका अपघातामुळे शारीरिक अपगत्व आलेलं होत. तेव्हा तिच्या मनावर केवढं दडपण असेल ! तिचं म्हणणं ऐकून घेताना कॉलिन तिच्या लेकीला कागद आणि रंगीत पेन्सिली देऊन बसवे. तिनं काढलेलं छानपैकी चित्र ( ' टू कॉलिन विथ लव्ह ' असे त्यावर शब्द ) दारावर चिकट-वलेलं होतं

आजवर अशा कित्येक निरपराध लोकाना ' पोर्शिया ट्रस्ट ' न मदत केलेली आहे. कॉलिननं मला ' फाईल ' काढून दाखवली. अनेकांनी आभाराची पत्रं पाठवली होती. या लोकाची नंतर कोर्टात सुटका होतेच. तरीसुद्धा सच्छील माणसावर खटला होणं हाच एक मोठा मानसिक आघात आहे. या काळात त्याना नैतिक पाठबळ देऊन ' पोर्शिया ट्रस्ट ' मोठंच कार्य करते आहे. समाजाच्या बदलत्या व्यवस्थेमुळे अनेक सामाजिक प्रश्न तिथे निर्माण होतात आणि अशा प्रकारच्या कार्याला भरपूर वाव आहे.

गुरुवारी आम्ही फ्रान्सकडे निघणार होतो. मध्ये एक दिवस मोकळा होता. त्या दिवशी आम्ही केटरिंग या छोट्या गावी एका मैत्रिणीकडे जाऊन आलो. ' केटरिंग ' हे लंडनच्या अगदी विरुद्ध आहे. सर्वत्र बैठे बंगले, विस्तीर्ण मोकळ्या जागा, हिरवळ, झाडंझुडपं !

किशोरी आणि गोपाल अगरवाल ही दोघही डॉक्टर. त्याचं केटरिंगला हॉस्पिटल

आहे. हॉस्पिटल बघायला वेळ नव्हता, परंतु नुकतंच बांधलेलं त्यांचं नवीन घर मात्र खूपच छान होतं. मागे-पुढे मोठी बाग आणि शांत परिसर. दुपारी त्यांच्या मुलाला शाळेतून आणायच्या निमित्तानं आम्हीदेखील गावातून एक पायी फेर-फटका मारला. आपल्याकडे खेड्यात सृष्टिसौंदर्याची लयलूट असली तरी दारिद्र्य आणि अस्वच्छता खूपच असते. युरोपात मोठं लंडनसारखं शहर आणि केटरिंग-सारखं छोटं गाव यात फक्त आकाराचा फरक. एरव्ही स्वच्छता, सुबत्ता, आधुनिक सुखसोयी याबाबतीत गाव हे हुबेहूब शहरासारखंच असतं.

दुपारचा जेवणाचा मेनू पुन्हा अस्सल भारतीयच होता. पुरीभाजी, पुलाव वगैरे. दुपारचं ऊनदेखील तिथे मऊ असल्यामुळे तापदायक होत नाही. जेवण आटपून आम्ही आजूबाजूच्या सृष्टिसौंदर्याचा आस्वाद घेत थोडं भटकलो. किशोरी म्हणाली, " इंग्लिश कंट्रीसाईडचं एवढं कौतुक करतात. पण आपल्या भारतात खरं तर याहून कितीतरी अधिक सुंदर कंट्रीसाईड आहे." किशोरीनं आपल्या बागेतही अनेक प्रकारची हौसेनं झाडं लावलेली आहेत. हॉस्पिटलचं काम, घरकाम आणि शिवाय बागकाम हे सगळं नोकराच्या मदतीशिवाय हिला जमतं कसं ?

संध्याकाळी आम्ही लंडनला परतलो. दुसऱ्या दिवशी सर्व बांधाबांध करून आगगाडी+बोट या मार्गानं फ्रान्सकडे निघालो. सुमन आणि कॉलिन या अगत्य-शील जोडप्याचा निरोप घेतला. आता पुढचा टप्पा— कलासक्त फ्रान्स !

# ४

# फ्रेंच कुटुंबात

इंग्लंडहून फ्रान्सला जाताना आम्ही ' कॅले ' या बंदरावर उतरलो. माझ्या मुलींच्या दोन पत्रमैत्रिणी ' मिरय ' व ' वॅलेरी ' या डंकर्क येथे राहतात. त्यापैकी मिरय ही आदल्या वर्षी हिंदुस्थानात येऊन गेली होती. शुभाची आणि तिची पत्रमैत्री गेली कित्येक वर्षं अखंड चालू आहे. मुंबईला ती आमच्याकडे राहिली. शुभाबरोबर ती दक्षिण भारत व दिल्ली-आग्रा पाहून आली. जाताना तिनं आम्हाला आपल्या घरी यायचं आग्रहाचं निमंत्रण दिलं होतं. आम्ही युरोप-यात्रेला जाणार असं कळल्यावर तिच्या आईचं पत्र आलं की ' डंकर्क 'ला त्यांच्या घरी यायलाच हवं. लंडनहून मी ' मिरय 'ला फोन केला. ( युरोपात सगळीकडे थेट टेलिफोन सेवा आहे.) त्याप्रमाणे ती ' कॅले 'ला आपली गाडी घेऊन आम्हाला न्यायला आली होती.

मिरय ही थोडीशी बुटकी, मुलासारखे केस कापलेली, सुरुवातीला अबोल वाटणारी पण नंतर बोलकी, थोडीशी पोरकट, ( बरीचशी फटकळ ) पण हुशार अशी मुलगी आहे. ती डंकर्कजवळच्या ' लील ' या गावी हॉस्टेलमध्ये राहून कॉलेज शिक्षण घेते आहे. शनिवार, रविवार घरी येते. तिचे वडील एका पोलाद कंपनीत ' वेल्डिंग इंजिनिअर ' आहेत. घरी आई, वडील व एक धाकटा भाऊ असं कुटुंब.

फ्रेंच कुटुंबात राहायचं म्हटल्यावर मनातून जरा धाकधूक होतीच. युरोपला जाऊन आलेले आमचे मित्र सांगायचे, ' हे लोक फार तर आपल्याला हॉटेलमध्ये

नेतील, पण आपल्या घरी कधी बोलावणार नाहीत.' त्याच्या आणि आपल्या आदरातिथ्याच्या कल्पना वेगळ्या असणारच. ह्या 'ना थोडस फ्रेंच येतं आणि सावकाश बोललेलं कळतंही. पण मला फ्रेंचचा गंध नाही. (मिरयला चागलं इंग्लिश येत ही एक जमेची बाजू. आमच्या तिथल्या वास्तव्यात तीच आमची दुभाषी होती) तरीसुद्धा हे कुटुंब इतकं अगत्यशील की भाषेचा अडसर फारसा जाणवला नाही आणि एखाद्या भारतीय कुटुंबात राहून आल्यासारखं वाटलं.

कॅले ते डंकर्क हा एक तासाचा प्रवास. चालवताना मिरय फार चुका करीत होती. म्हणाली, 'मी नर्वस झाले आहे.' नर्वस कशानं? आम्ही घरी पोचलो तर अख्ख कुटुंब आमच्या स्वागताला हजर होतं. भाषा येत नसल्यामुळे आम्ही एकमेकाकडे पाहून हसण्याशिवाय काही करू शकत नव्हतो. मिरयच्या धाकट्या भावाच नाव 'जाँ मार्क', आईचं नाव 'पिएरेत' आणि वडिलाच नाव 'जाँ', त्याच आडनाव 'लीएजुआ.' त्यांचे सर्वांचे फोटो आम्ही पाहिले होते आणि कॅसेटवर आवाज ऐकला होता. तरी भेट मात्र आज प्रथमच.

जाँ मार्क हा उंच, शिडशिडीत, मिष्किल, सदैव मदतीला तयार. (आमच्या बॅगेचा पट्टा तुटला होता तो त्याने लगेच बसवून दिला.) पिएरेत ही बुटकी, स्थूल पण अतिशय चटपटीत, हसतमुख, कामसू, केस बॉब केलेले आणि नेहमी फ्रॉक किंवा स्कर्ट-ब्लाऊझ घालणारी. जाँ हा उंच, बळकट बांध्याचा, स्थूलतेकडे झुकणारा, डोक्याला टक्कल (पण हेही कॉलिनप्रमाणे अकाली पडलेलं असावं.) बारीक डोळे, सरळ नाक, थट्टेखोर, उमदा स्वभाव (नेहमी काहीतरी विनोदी बोलणं जे, आमच्या कोऱ्या चेहऱ्याकडे पाहून मिरयला आमच्यापर्यंत पोचवावं लागे.)

मिरयचं घरदेखील एक बैठा बंगला, बगीच्यान वेढलेला. घराचा नमुना सुमनच्या घरासारखाच खाली दिवाणखाना, स्वैपाकखोली, गेस्टरूम व बाथरूम, वर पहिल्या मजल्यावर तीन बेडरूम्स व बाथरूम्स घर कलात्मकतेन सजवलेलं होतं तरी झोपण्याच्या खोलीत, विशेषत मुलाच्या, थोडी अव्यवस्था होतीच. (थोडी अव्यवस्था पाहून मला जरा घरगुती वाटलं अगदी चित्रासारखं नीटनेटकं घर पाहून थोडा न्यूनगंड वाटतो--मला ते साधत नसल्यामुळे.)

मिरयच्या आईवडिलांनी आपलं बस्तान खालच्या गेस्टरूममध्ये हलवलं होत आणि त्याची बेडरूम आमच्या स्वाधीन केली आम्हाला फार संकोच वाटला हे

पाहून, पण कुणी ऐकेना. आम्ही बॅगा उघडून त्याच्यासाठी आणलेल्या सर्व भेटी त्याना अर्पण केल्या. जॉं मार्कन लगेच लखनवी कुर्ता चढवला आणि मिरयदेखील साडी नेसली. ( हिंदुस्थानात असताना साडी नेसायची खूप प्रॅक्टिस केल्यामुळे ती आता कुणाच्या मदतीशिवाय नेसू शकते. ) शिवाय आम्ही काही शोभेच्या वस्तू नेल्या होत्या, त्या लगेच ठिकठिकाणी मांडून ठेवण्यात आल्या.

युरोपियन आणि आपण यात एक फरक माझ्या लक्षात आला. आपण जर कुणी एखादी वस्तू भेट म्हणून दिली तर आभार मानून ती तशीच वेष्टनासकट ठेवून देतो आणि नंतर सावकाश उघडतो. ताबडतोब उघडून पाहणं हा उतावीळ-पणा फक्त मुलांना शोभतो असं आपण मानतो. याच्या अगदी उलट त्याची पद्धत. वस्तू तशीच ठेवून देणं म्हणजे बॅड मॅनर्स ! ती लगेच तिथल्या तिथे उघडून आवडल्याचं सांगणं ही त्याची सवय. ( हे मला माझ्या युरोपियन जावेच्या मुलीकडून कळलं. तेव्हापासून मीदेखील त्याच्या भेटी लगेच उघडून पाहते. नाहीतरी आपल्याला कुतूहल असतंच.) मिरयच्या घरी तर सर्व वस्तू आमच्यादेखत वापरात निघाल्या. मिरयसाठी ' सलवार--खमीस ' नेलं होतं तेही तिनं दुसऱ्या दिवशी घातलं.

आम्ही ' वॉश घेऊन फ्रेश ' झाल्यावर खाली आलो. थोडंसं पेयपान झाल्यावर जेवणाचा कार्यक्रम झाला. सूप, एक सामिष पदार्थ, पॅनकेक्स ( म्हणजे आपले डोसे असतात तसे ), ॲस्परॅगस ही उकडून मीठ लावलेली भाजी व शेवटी स्ट्रॉबेरीचं स्वीट--असा एकूण बेत होता मिरय नंतर एकदा म्हणाली, " आमचं जेवण तुम्हाला खूप वेळखाऊ वाटलं का ? आमच्याकडे काही जर्मन पाहुणे आले होते, ते म्हणाले की जर्मन जेवण झटपट आटोपतं म्हणून ! "

मी म्हटलं, " आमच्या भारतीय जेवणालासुद्धा वेळ लागतोच नाही का ? फरक इतकाच की आमच्या सर्व भाज्या एकाच वेळी ताटात दिसतात तर तुमचे पदार्थ एकामागून एक येतात."

जॉं म्हणाला, " आमच्या जेवणात सरप्राईझ असतं."

मी म्हटलं, " आता ठीक आहे, पण पहिल्या दिवशी मला कळेना आणखी काय-काय देणार आहेत ते ! सूप आणि पाव झाल्यावर वाटलं संपलं, तोच आणखी एक पदार्थ, नंतर आणखी एक. "

यावर ती सगळीजणं खूप हसली. परक्या पाहुण्याना हे असं होईल याची

त्याना कल्पना नसावी. जॉं म्हणाली, "आपण आता एक 'मेनू' लिहून टेबलावर ठेवायला हवा."

जेवण झाल्यावर जॉं मार्कनं आम्हाला पियानो वाजवून दाखवला. 'तो नीट प्रॅक्टिस करीत नाही' अशी मिरय सारखी तक्रार करीत होती. धाकटा भाऊ म्हणून ती त्याच्यावर बरीच 'ताईगिरी' करते. 'तिला राग फार लवकर येतो' असं जॉं मार्क आम्हाला डोळे मिचकावून सांगत होता.

मिरय भारतात आली होती तेव्हा हिंदी फिल्मसंगीताची एक रेकॉर्ड तिनं घेतली होती. त्यातलं 'प्यार हुआ, इकरार हुआ' हे गाणं ती म्हणत असे. ते तिला आठवतं का पाहू या म्हणून मी पियानोवर ते गाणं वाजवू लागले तर गंमत अशी की ती चौघंजण ते गाणं गुणगुणू लागली. म्हणजे ती रेकॉर्ड त्यानी बऱ्याच वेळा घरी वाजवली असावी.

रात्री झोपताना जॉं मार्क आमचा निरोप घेऊन झोपला, कारण दुसऱ्या दिवशी पहाटे तो जर्मनीच्या सफरीला जाणार होता. ही मुलं विद्यार्थिदशेतच अर्धं जग पाहून येतात. विद्यार्थ्यांना सवलती खूप आणि सुट्टीत नोकरी करून भरपूर अर्थार्जनही करता येतं. त्यामुळे विद्यार्थी खूप लांबलांबच्या सफरी करताना दिसतात.

दुसऱ्या दिवशी सकाळी पिएरेतबरोबर डंकर्कमध्ये भटकलो. या छोट्या शहरात फारसं पाहण्यासारखं काही नाही. समुद्रकाठी वसलेलं हे बंदर. गावातल्या मध्यवर्ती चौकात 'जॉंबार' या चाच्याचा एक पुतळा आहे (तो चाचा असला तरी त्यानं डच व इंग्लिश यांच्यापासून गावचं रक्षण केलं होतं म्हणून त्याचा पुतळा) जॉंन आम्हाला शिपयार्डमध्ये नेऊन मोठमोठी जहाजं दाखवली. तिथेच तो वेल्डिंग इंजिनियर म्हणून काम करतो. आपल्या कंपनीची आठवण म्हणून त्यानं एक छोटं घड्याळ (गळ्यातल्या साखळीत पदकासारखं अडकवता येतं) अनूला भेट दिलं. त्यावर छोट्या अक्षरात 'यूझिनॉर' हे त्याच्या कंपनीचं नाव कोरलेलं आहे. इथे जमिनीची पातळी काही ठिकाणी समुद्राच्या पातळीपेक्षा खाली आहे तिथे डायकूस (dykes) बांधलेलं आहेत. असे डायकूस हॉलंड-मध्ये असल्याचं ऐकलं होतं. शालेय क्रमिक पुस्तकात एक गोष्ट होती. एका लहान मुलाला रात्री या बांधाला एक लहान भोक पडलेलं दिसलं. पाणी आत येऊ लागलं होतं. पाण्याचा जोर एवढा प्रचंड की काही वेळातच तो बांध

फुटून गावात पानशेतसारखा पूर आला असता. रात्रभर तो मुलगा एकटाच त्या भोकावर आपला चिमकुला हात ठेवून राहिला. थंडीत काकडला, पण गावाचं संरक्षण करण्यासाठी त्यानं आपली जागा सोडली नाही. सकाळी गावकऱ्यांच्या हे लक्षात आलं तेव्हा तो पार गारठून गेला होता. पण गावावरचं संकट टळलं. गावकऱ्यांनी लगेचच भोक बुजवून टाकलं व मुलाची मिरवणूक काढली. या छोट्या मुलाच्या शौर्याची हकीकत अजून हॉलंडमध्ये सांगतात.

डंकर्क हे नाव घेतल्याबरोबर आपल्या मनात दुसऱ्या महायुद्धाचे संदर्भ जागे होतात. इथे हिटलरनं दोस्तांचा धुव्वा उडवला होता. इथलं वॉर-म्युझियम पाहण्यासारखं आहे. तळघरात एक भलामोठा हॉल, भिंतीवर फ्रान्सचा मोठा नकाशा. आपल्याला कुठल्या भाषेत कॉमेंटरी हवी ते विचारतात, त्याप्रमाणे आम्ही इंग्लिश कॉमेंटरी मागून घेतली. ती टेप सुरू होताच समोरच्या भिंतीवरच्या नकाशात जर्मन कुठून आले आणि त्यांनी प्रदेश कसकसा काबीज केला ते दिसू लागलं. रोमेल हा त्या वेळी सैन्यातला तरुण अधिकारी होता. त्यानं शत्रूची पुरती दाणादाण उडवली. ते भीषण नाट्य विलियम शररच्या पुस्तकात वाचलं होतं—आता डोळ्यांपुढे साकार होऊ लागलं. 'युद्धस्य कथा' ऐकताना माझ्या अंगावर नेहमी शहारे येतात. शहरावर बॉंबवर्षाव होत असतानाचे काही फोटो इथे आहेत. त्याप्रमाणे उद्ध्वस्त झालेल्या डंकर्क शहराचं एक मॉडेलही काचेच्या केसमध्ये ठेवलेलं आहे. भूकंप होऊन गेल्यावर दृश्य दिसावं त्याप्रमाणे अर्धीअधिक घरं कोसळली, जी काही थोडी उभी आहेत त्यांच्या भिंती ठिकऱ्या-ठिक्कर पडलेल्या. आजचं डंकर्क पाहिलं तर या परिस्थितीची कल्पना येणार नाही. फिनिक्स पक्ष्यासारखं शहर पुन्हा दिमाखानं उभं आहे. युद्धाची नाव-निशाणीदेखील कुठल्याही इमारतीवर दिसत नाही.

दुपारचं जेवण आटपून मिरयच्या वडिलांबरोबर बेल्जियमला निघालो. इथे खाजगी मोटरीतसुद्धा पाचपेक्षा अधिक माणसांनी बसू नये असा नियम आहे. आम्ही तिघं आणि दुभाषी मिरय अशी चौघं नेहमी असायचीच. पाचवी व्यक्ती म्हणजे जॉं किंवा पिएरेत. तर जॉंनं आम्हाला बेल्जियमला नेलं. डंकर्क हे फ्रान्सच्या अगदी सरहद्दीजवळ असल्यामुळे बॉर्डर ओलांडली की बेल्जियम. अर्ध्या दिवसात परदेश प्रवास करून येता येतं.

जॉं हा फ्रान्समध्ये स्थाईक झाला असला तरी जन्मानं बेल्ज आहे. पिएरेत

मात्र फ्रेंचच आहे. त्यामुळं मुलाना दुहेरी नागरिकत्व मिळालेलं आहे. मिरय सागत होती, " बेल्ज लोक हे डोक्यान जरा अधू, थोडेसे बुद्दू असतात असा फ्रान्समध्ये समज आहे (तुमच्याकडील सरदारजी जोक्सप्रमाणे). माझा भाऊ परीक्षेत नापास झाला तेव्हा मी त्याला तुच्छतेन म्हणत असे, ' तू बेल्ज आहेस ' आता त्याला बेल्जियमच्या नागरिकत्वामुळे काही सवलती मिळाल्या आहेत. (शिक्षणात, प्रवासात इ.) आता मी त्याला सन्मानान म्हणते, " वा ! तू बेल्ज आहेस '." आपल्या मातृभूमीबद्दलची ही थट्टा जॉं मात्र हसतमुखान ऐकत होता. त्या घरातला तो नेहमीचा चेष्टेचा विषय असावा. मिरय बापाशी खूपच बरोबरीच्या नात्यान वागत असे. क्वचित मला ते उद्धटपणाचंही वाटे. तो घरकामात काही मदत करू लागला की मिरय गमतीन म्हणे, " तो आमच्या घरातला नोकर आहे असल्या कामात एक्सपर्ट ! " (अर्थात ' नोकर ' शब्दही आपल्याइतका तुच्छतादर्शक नसावा, कारण नोकरालाही बरोबरीच्या नात्यान वागवतात.)

मिरयला बोलताना हातवारे करण, डोळे चकणे करणं, तोंडान गंमतीचे आवाज करण अशी सवय आहे. पिएरेत एकदा म्हणाली, " मिरय ही कधीकधी पाच वर्षांच्या मुलासारखी वागते " पण या वाक्यात तक्रारीपेक्षा कौतुकच अधिक होतं. आमच्यादेखत तिन कधीही मुलीला दटावलं नाही. मिरयनं मात्र त्या सवयीचं स्पष्टीकरण केलं ते असं, " एकूण फ्रेंच लोकानाच हातवारे करायची फार सवय आहे. तशात माझ्या कुटुंबात जास्त आहे आणि तशात मला ती सर्वांत जास्त आहे."

बेल्जियमचा व्हिसा ' आम्ही तयार ठेवला होता. पण बॉर्डरवर पाहतो तो चेकिंगला कुणीच आलं नाही. आम्ही हॉर्न वाजवला तरी सामसूम. अधिकारी बहुधा वामकुक्षी करीत असावे. थोड्याच वेळात आम्ही ' ब्रूज ' या ऐतिहासिक शहरात पोचलो. इथेदेखील जुनी घर, राजवाडा, जुने पूल वगैरे सांभाळून ठेवलेले आहेत सार्‍या शहरात कालव्यांचं जाळं पसरलेलं आहे. त्यातून नौकाविहार करीत आम्ही सर्व इमारती पाहिल्या. सोबत वाटाड्या होताच. ' ब्रूज 'ला ' उत्तरेकडचं व्हेनिस ' म्हणतात. हे कालवे फार जुने, बाराव्या शतकापासूनचे आहेत.

ब्रूजचं वैशिष्ट्य म्हणजे इथलं लेसवर्क. खूपशी रिळ टेबलावर मांडून चट्‌चट् बोटांनी त्याची अदलाबदल करून लेस विणण्याची इथली नावीन्यपूर्ण पद्धत.

अशी लेस विणताना आजवर मी कधीच कुणाला पाहिलं नव्हतं. यासाठी जो धागा वापरतात तोही अतिशय तलम असा, त्यामुळे लेसची नक्षी खूपच नाजूक आणि गुंतागुंतीची असते शहरातल्या सगळ्या दुकानांतून या लेसचे टेबल-क्लॉथ्स, ट्रे क्लॉथ, पलंगपोस अशा अनेक वस्तू मांडून ठेवण्यात आल्या होत्या. या गावाला 'लेसचं गाव' म्हणायला हरकत नाही. मी जॉला म्हटलं, "ही लेस कशी विणतात ते मला पाहायचंय्." त्यानं आजूबाजूला चौकशी केली आणि कळलं की ही कला आता अस्तगत होते आहे. गावातल्या काही वृद्ध स्त्रियाच फक्त या कलेत पारंगत आहेत. एका विशिष्ट घरात त्या भेटतील असं कळलं म्हणून त्यांच्या शोधार्थ निघालो. मुख्य बाजाराच्या एका टोकाला एक छोटंस घर होतं. त्याच्या मागच्या बाजूला मोकळं आवार होतं. आवाराभोवती उंच भिंत. त्यात मध्ये छोटासा दरवाजा. तो लोटून आम्ही आत शिरलो.

आत मोठं गंमतीचं दृश्य दिसलं आवार मोकळं होतं. भर उन्हाची वेळ. पण थंडी असल्यामुळे हे ऊन सुखद वाटत होतं. त्या उन्हात दोन खुर्च्या टाकून त्यावर दोन म्हाताऱ्या बसल्या होत्या. वय सत्तर-ऐंशीच्या आसपास असावं. कारण चेहऱ्यावर लेससारखंच सुरकुत्यांचं जाळं होतं.

त्यांच्या पुढ्यात टेबलं होती आणि त्यावर जवळ-जवळ खिळे ठोकलेले लाकडी ठोकळे होते. सभोवती रिळं होती ती रिळं बोटांनी या खिळ्याभोवती फिरवून या म्हाताऱ्या चटचट् लेस विणत होत्या. त्यांचं ते कसब पाहून आम्ही थक्क झालो. आम्ही मुद्दाम बघायला आलो म्हणून त्या खूष झाल्या होत्या. त्यापैकी एकीनं उठून आम्हाला घरात नेलं. घरात पुन्हा लेसच लेस! त्यांच्या कलेचं तिथे प्रदर्शनच भरलं होतं. मी किंमतीची चौकशी केली तर माझे डोळेच फिरले. मिरयनं आम्ही 'नको-नको' म्हणत असताना आठवण म्हणून एक छोटी गोल 'डॉयली' आमच्यासाठी घेतली. आता एवढी महाग वस्तू ठेवायची तर ती फ्रेम करूनच ठेवायला हवी म्हणून मी अजून कपाटातच जपून ठेवली आहे.

रात्री घरी परतेपर्यंत जेवायची वेळ झाली होती. पिएरेत मोठी सुगरण होती. रोज नवे-नवे पदार्थ बनवी. शेवटचं स्वीट हे माझ्या सर्वांत आवडीचं त्यात-देखील रोज नवे प्रकार. एकदा स्ट्रॉबेरी आणि त्यावर क्रीम, एकदा रासबेरी जॅम व आइसिंग केलेला केक, एकदा पेअरचे तुकडे आणि चॉकलेट आईस्क्रीम,

एकदा विविध प्रकारचं चीज, एकदा फ्रूट 'पाय' ( Pie ) अशी नुसती चंगळ होती.

जेवण झाल्यावर मिरयन हिंदुस्थानात काढलेल्या स्लाईड्स दाखवल्या. त्या फोटोत आम्ही सर्वजण होतो. थोड्या वेळासाठी पुन्हा घरी जाऊन आल्यासारखं वाटलं.

त्या दिवशी माझ्या स्वप्नात झरझर लेस विणणाऱ्या म्हाताऱ्या येऊन गेल्या. दुसऱ्या दिवशी दुसऱ्या एका फ्रेंच कुटुंबात आम्हाला जेवणाचं आमंत्रण होतं. तिथली माणसं कशी असतील याचा विचार करीत मी पुन्हा झोपी गेले.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६६२
ग्र. क्र. २५४८६
२५.२०।९।६५
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# ५

# एक चिरतरुण शहर

मिरय हिंदुस्थानात आली असताना आम्ही सर्व तिच्याशी इंग्लिशच बोलत असू. त्या वेळी कुठल्याही इंग्लिश शब्दाला 'फ्रेंच' असं विशेषण लागलं की ती कान टवकारीत असे. फरसबीला 'फ्रेंच बीन्स' असं का म्हणतात? ('फरसबी' हासुद्धा 'फ्रेंच बीन्स' या शब्दाचाच अपभ्रंश असावा. त्याचं आणखी पुढे सुलभीकरण करून आमचे भाजीवाले 'फरशी' म्हणतात.) त्याचप्रमाणे एका विशिष्ट प्रकारे बनवलेल्या टोस्टला 'फ्रेंच टोस्ट' का म्हणतात? (अंड्यातलं पांढर व पिवळं एकत्र घुसळून त्यात मीठ व मिरपूड टाकायची. हे मिश्रण एका बशीत घेऊन त्यात ब्रिटानियाच्या ब्रेडचा एक स्लाईस उलटसुलट बुडवायचा. पावानं हे मिश्रण शोषून घेतलं की तो स्लाईस तव्यावर टाकून चहूकडून लोणी किंवा तूप टाकून खरपूस भाजून घ्यावयाचा. परतून दुसरी बाजूही लालसर भाजायची. आवडत असल्यास या अंड्याच्या मिश्रणात चीजचा बारीक कीसही टाकावा.) असा हा फ्रेंच टोस्ट टोमॅटो सॉसबरोबर खायला छान लागतो हा प्रकार खास फ्रान्समधून आला असावा म्हणून त्याला हे नाव पाडलं असं आम्हाला वाटे. परंतु मिरय यावर काही प्रकाश टाकू शकली नाही.

आम्ही पॅरिसमध्ये असताना मिरयशी गप्पा मारीत होतो. तेव्हा अशाच एका शब्दाचं मूळ सापडलं. 'तुमचं घर छान आहे' असं मी तिला म्हणाले तेव्हा ती म्हणाली, "इतर सगळं ठीक आहे. पण या घराच्या खिडक्या मला फार लहान वाटतात. आमच्याकडे थंडी खूप असते, त्यामुळे घरात जेवढा सूर्यप्रकाश

येईल तेवढा आम्हाला हवा असतो, म्हणून आम्हाला मोठमोठ्या खिडक्या आवडतात. तुम्ही दुसरी घर पाहिलीत तर तुमच्या लक्षात येईल, काही खिडक्या दरवाज्याइतक्या मोठ्या असतात. वर छतापासून खाली जमिनीपर्यंत काचेचं तावदान असत आणि त्यामुळे खोलीभरून सूर्यप्रकाश मिळतो. ”

मी एकदम म्हटल, “ अच्छा ! म्हणून अशा खिडक्याना इंग्लिशमध्ये फ्रेंच खिडक्या म्हणतात. ”

“ होय ? ” मिरय चकित झाली, “ मला माहीतच नव्हत ! ”

‘ वॅलेरी ’ ही माझ्या दुसऱ्या मुलीची ( त्रिभाची ) पत्रमैत्रीण. तिनच मिरयचा पत्ता त्रिभाला दिला होता. मिरयबरोबर वॅलेरी हिंदुस्थानात येणार होती. पण तिच्या आईने परवानगी दिली नाही. वॅलेरीचे वडील व मिरयचे वडील एकाच जहाज कंपनीत ( यूझिनॉर ) काम करतात. त्याची घरदेखील जवळजवळ आहेत.

सकाळी आंघोळी आटपून आम्ही त्याच्या घरी लंचला गेलो. वॅलेरीच्या घरी ती, तिचे धाकटे दोन भाऊ, आई-वडील व आजी अशी मंडळी भेटली. शेवटी कुटुबाचं चित्र सगळीकडे सारखच असतं असं मला एवढं हिंडून आल्यानंतर वाटतय. भावडाची भाडण, आजीची माया, वडिलाची थट्टा, आईचा वैताग--हे सार मला वॅलेरीकडे पुन्हा पाहायला मिळालं वॅलेरी मिरयच्या मानान काहीशी अबोल आणि लाजाळू वाटली. दिसायला मात्र खूपच सुंदर. उच उफाड्याची, तजेलदार काती, रेशमी केशसंभार आणि चेहऱ्यावर एक नाजुकस हसू तिच्या आईला मी म्हटलं, “ वॅलेरीचा अलीकडचा फोटो तुम्ही त्रिभाला का पाठवला नाही ? फारच सुंदर दिसतेय ती ! ”

तिची आई थट्टेत म्हणाली, “ कुठल्याही फोटोत तिचं सौंदर्य उतरणं कठीण आहे. तुम्ही तुमच्या शब्दातच तिचं वर्णन करा.”

मी म्हटलं, “ माझे शब्द तरी कसे पुरे पडतील तिच्या सौंदर्याचं वर्णन करायला ? ”

तिचं नाव आनेत् आणि तिच्या नवऱ्याचं नाव पीटर. या दोघाना इंग्लिश चागलं येत असल्यामुळे एक प्रश्न मिटला. आनेत् ही कॉलेजमध्ये अर्थशास्त्राची प्राध्यापिका आहे, त्यामुळे तिच वाचन आणि इतर विषयाचा व्यासंगदेखील सखोल वाटला. दिसायला ती पिएरेतपेक्षा खूप वेगळी. सडसडीत, उच, डौलदार चाल आणि बोलण्यात एक अधिकाराची झाक ! पिएरेतचा चटपटीतपणा तिच्यात

नव्हता. हालचालीत एक ॲरिस्टोक्रॅटिक सभ्यपणा व रुबाब होता जेवताना तिच्या मोठ्या मुलानं काही तक्रार केली. त्याबरोबर ती म्हणाली, " माझ्या मुलाचं कध्धी समाधान होत नाही. नेहमी त्याची काही ना काही कुरकूर चालू-असते."

पाहुण्यासमोर असं काही म्हटलं की मुलं गोरीमोरी होतात. म्हणून मी ते थट्टेवारी नेत म्हटलं, " पर्फेक्शनिस्ट असेल तो, म्हणून असं–"

पण तरीसुद्धा ती त्याच्याविषयी तक्रारीच्या सुरात बोलत राहिली. मला काही ते योग्य वाटेना. माझ्या अपेक्षेप्रमाणेच झालं. जेवण आटोपल्याबरोबर तो जो नाहीसा झाला तो पुन्हा कधी आम्हाला भेटलाच नाही मागाहून देखील ॲनेत् मला सांगायची, " मला त्याची फार काळजी वाटते अभ्यासात त्याचं लक्ष नाही. नेमकं पुढे काय करायचं हेही त्याला ठरवता येत नाही."

मी म्हटलं, " या वयात काही मुलं अशी असतात. पण त्यात एवढी काळजी करण्याचं कारण नाही. पुढे मग ती स्थिर होतात."

माझ्या बोलण्यानं तिला बरं वाटलेलं दिसलं.

व्हॅलेरीची आजी नुकतीच पोर्तुगालची सफर करून आली होती ( वृद्धांच्या काही खास सफरी असतात म्हणे ! ) तिला फ्रेंचशिवाय दुसरी भाषा येत नसल्यामुळे ती अडचणीत सापडली होती. आम्ही पोर्तुगालला जाणार म्हटल्याबरोबर तिने आपला तिथं काढलेल्या फोटोंचा आल्बम आणून दाखवला. मुलांनी कसलीतरी जॅझ संगीताची रेकॉर्ड लागली होती म्हणून ती कानावर हात ठेवून सारखी आवाज बारीक करायला सांगत होती. नातू तिला चेष्टेनं म्हणत होता, " जरा थोडं हे संगीत ऐकलस तर काय बिघडतं ? "

ॲनेत्शी माझी खूप विषयांवर चर्चा झाली. इथे आणि नंतर ती पॅरिसला आली तेव्हा. त्या सर्वांनी मिळून आम्हाला ' पॅरिस दर्शन 'ला नेण्याचं प्लॅनिंग केलं. मिरयच्या वडिलांना–जॉला–फक्त दोनच दिवस सुट्टी होती. मिरयची एक गॉडमदर पॅरिसला राहते. ती नवऱ्याबरोबर कुठे बाहेरगावी जाणार होती. तेव्हा पहिले दोन दिवस तिच्या रिकाम्या फ्लॅटमध्ये मुक्काम करायचा असं ठरलं. तिसऱ्या दिवशी जॉं व मिरय डंकर्कला परत येणार होती. पिएरेत तिथे आमच्याबरोबर राहणार होती. ॲनेतनं आपणहून तिला सोबत करायची इच्छा दर्शवली. ॲनेतच्या बहिणीचा एक फ्लॅटदेखील पॅरिसला होता. बहीणसुद्धा सुट्टीत बाहेर पर्यटनाला जाणार होती. तेव्हा नंतरचे दोन दिवस ॲनेतच्या बहिणीच्या घरी मुक्काम व

पॅरिसमध्ये अशा रीतीने चार दिवस स्थलदर्शन केल्यावर पाचव्या दिवशी आग-गाडीने लिस्बनकडे प्रस्थान--असा एकंदर आराखडा आखण्यात आला. ( आणि त्याबरहुकूम कार्यक्रम पारही पडला. )

एकदरीत पॅरिसमध्ये राहण्याच्या जागेबाबत आम्ही फारच भाग्यवान ठरलो एरवी तिथे हॉटेल्स फार महाग असल्याचं ऐकलं होतं. ( अर्थात तीही तयारी आम्ही ठेवलीच होती. कारण असं खास घरगुती आदरातिथ्य आमच्या वाट्याला येईल अशी कल्पना तरी कुठे होती ? )

व्हॅलेरीकडचं जेवण आटपून आम्ही मिरयकडे आलो तेव्हा मिरय मला विचारीत होती, " व्हॅलेरी कशी वाटली ? " मी म्हटलं, " जरा लाजाळू वाटली. " मिरय खांदे उडवून म्हणाली, " लाजाळू ? "

ती तशी नव्हती की काय कुणास ठाऊक ! तिचा अबोलपणा हा लज्जेमुळे की गर्विष्ठपणामुळे ? पण चेहरा हसतमुख होता. तेव्हा ती गर्विष्ठ नसावी असं मी मनाशी ठरवलं.

मिरय म्हणाली, " तिच्या आईचं इंग्लिश कसं वाटलं तुम्हाला ? " मी म्हटलं, " ती चांगलं बोलते, पण तुझ्यासारख्याच चुका करते. " मिरय पटकन म्हणाली, " म्हणजे कुठल्या ?"

या फ्रेंच लोकांची एक गंमत आहे. ते इंग्लिश बोलताना ' अ ' आणि ' ह ' ची अदलाबदल करतात म्हणजे ' ओप यू हंडरस्टड. ' ( होप यू अंडरस्टँड. ) हे मी म्हणून दाखवताच तिला खूप हसू आलं.

फ्रेंच व इंग्लिश लोकांचं एकमेकांशी वैर हीदेखील पुरातन काळापासून चालत आलेली गोष्ट असावी इग्लंडमध्ये आम्हाला सांगत, " तुम्हाला फ्रेंच येत नसेल तर फ्रान्समध्ये हाल होतात. त्यांना इंग्लिश येत असलं तरी ते बोलत नाहीत. कळत नसल्याचं ढोंग करतात. " प्रत्यक्षात मला अनुभव वेगळा आला. हे मी मिरयजवळ म्हटलं तर ती रागावून म्हणाली, " हे इंग्लिश लोकच उलट आडमुठे ! आम्ही गेल्या वर्षी लडनला गेलो होतो तर वडिलांनी ' रिजंट पार्क ' कुठे आहे ?--असं एकाला विचारलं तर तो पुन्हा--पुन्हा ' री ऽऽ जंट पार्क ' ' री ऽऽ जंट पार्क ' असं वडिलांना शिकवू लागला आणि बरोबर उच्चार येईपर्यंत पार्क कुठे आहे तेही आम्हाला सांगेना. आगगाडीत तर किती हैदोस घालतात हे इंग्लिश विद्यार्थी. दुसऱ्याच्या जागा अडवून बसतात. मॅनरलेस ! "

अर्थात असा प्रकार मी काही लंडनमध्ये पाहिला नव्हता. एकदरीत इंग्लिश व फ्रेंच लोकांचे एकमेकांविषयी खूपच गैरसमज दिसले.

[illegible] जेवण आटपून ( कोल्ड मीट, उकडलेल्या भाज्या, स्ट्रॉबेरीज् व पाय् ) आम्ही मिरयकडे परतलो व थोडी वामकुक्षी पदरात पाडून घेतली. मध्याकाळी वॅलेरीचं सबंध कुटुंब मिरयकडे बसायला आलं आजीसकट ! ड्रिंक्स घेता-घेता खूप गप्पा झाल्या. मोठमोठ्यानं हसणं व बोलणं चालू होतं. आम्हाला भाषा समजत नाही हे आमचे कोरे चेहरे पाहून त्यांच्या लक्षात येई. मग थोडंसं इंग्लिशमध्ये खुलासा, पण थोड्याच वेळात गाडी फ्रेंचवर, असं चालू होतं. मिरय भारतात आली होती तेव्हा आम्हीदेखील असंच बोलत होतो का तिला अगम्य असलेल्या भाषेत ' हा अनुभव एकदा स्वत: घेतल्याशिवाय त्यातली व्यथा समजायची नाही ! विशेषत ज्या वेळी हास्यकल्लोळ होतो त्या वेळी आपल्याला [illegible] फार कठीण असते.

त्या रात्रीदेखील जाँचे एक मित्र कॉफी प्यायला आले. ते थोड्याच दिवसात काही कामासाठी भारतात जाणार होते, त्यामुळे मिरयचं मार्गदर्शन घ्यायला आले होते. मी मिरयची ' इंडियाची पी. आर. ओ. ' म्हणून थट्टा केली. तिच्याकडचं एक गाईड तिने या गृहस्थाना दिलं. त्यात भारताविषयी काय लिहिलं आहे ते मला पाहायचं होतं, पण ते फ्रेंचमध्ये असल्यामुळे माझा नाइलाज झाला. पूर्वी इंग्लिशमध्ये असलंच एक गाईड मी पाहिलं होतं. त्यात मजेदार सूचना होत्या, ' घरात जाताना बूट काढून जा. घरातल्या बायका बाहेर आल्या नाहीत तर अपमान समजू नका, कारण तशी तिथे पद्धतच आहे. जेवताना इतर कसे खातात ते पाहा व नंतर त्याचप्रमाणे खा–' वगैरे.

मला काट्याचमच्यानं जेवताना फार त्रास होतो. हातानं जेवणं हे खरं नैसर्गिक आणि कुणालाही सहज येण्यासारखं अशी माझी समजूत, पण तिथे लक्षात आलं की, त्या लोकाना सवय नसल्यामुळे हातानं जेवणं फार कठीण जातं. त्यांची बोटंच आपल्यासारखी वळत नाहीत. ती फार ताठ, सरळ अशी असतात. त्यात लवचिकपणा नसतो.

मिरयशी पुष्कळ विषयांवर वाद झाले. त्यांपैकी एक म्हणजे आपली वडील माणसानी लग्न जमवण्याची पद्धत. ही पद्धत बहुतेक पाश्चात्त्य लोकाना फार हास्यास्पद वाटते. पण मी तिला सांगितलं की कुठल्याही मुलाला पकडून आणून

मुलीशी लग्न लावणं असा हा जुलमी प्रकार नसून बहुधा दोन्ही कुटुंबाची व खुद्द वधूवराची आधी माहिती काढली जाते, ती एकमेकांना अनुरूप आहेत की नाहीत ते पाहिलं जातं, दोघांचीही अनुमती घेतली जाते आणि नंतरच विवाह ठरवला जातो. शेवटी बाल्झाकनंच कुठंतरी लिहून ठेवल्याचं मी तिला सांगितलं की "एकाच सांस्कृतिक पातळीवरच्या दोन कुटुंबातल्या स्त्री-पुरुषांनी आधी ओळख नसताना लग्न केलं तरी त्यांचा संसार बहुत करून सुखाचा होतो."

खरं तर, लग्नाच्या बाबतीत कुठलेही सर्वसाधारण नियम ठरवणं मला तरी कठीण वाटतं. आणि म्हणून प्रेमविवाह किंवा जमविलेले विवाह यांपैकी कुठल्याही एका पद्धतीवर कुणी कडाडून हल्ला चढवला की मी नेहमी विरुद्ध बाजू घेते. कारण दोन्ही पद्धतींत गुणदोष आहेत. शेवटी कुणाचा संसार सुखाचा किंवा दु:खाचा होईल हे छातीठोकपणे सांगणं कठीण! बहुतेक संसार तर 'पूर्ण सुखी' आणि 'पूर्ण दु:खी' या दोन टोकांच्या मध्ये कुठेतरी असतात.

लग्नापूर्वी एकत्र राहणं हा प्रकार तिथं सर्रास सुरू आहे. इथेही मिरयचं म्हणणं, 'एकत्र राहिल्याशिवाय खरा स्वभाव कळत नाही.' हे जरी खरं असलं तरी याला कालमर्यादा किती? खरा स्वभाव ओळखायला नेमका किती काळ लागतो? वॅलेरीची आई म्हणाली, "आमच्या वेळी ही पद्धत एवढी रूढ झाली नव्हती. काही जोडपी लग्नापूर्वी एकत्र राहात. परंतु ते गुप्तपणे. आईवडलांना ते कळलं, तर त्यांना ते मुळीच आवडलं नसतं. पण आता वॅलेरीच्या बाबतीत मात्र मी काहीच हस्तक्षेप करू शकणार नाही. तिने निवडलेला मुलगा तिच्यायोग्य नाही असं मला वाटलं तरीसुद्धा मी फार तर तिच्याशी बोलू शकेन. पण त्या-पलीकडे माझा तिच्यावर काहीही अधिकार चालणार नाही."

आनेत् आपल्या सासूबद्दल बोलताना म्हाताऱ्या माणसांचा विषय निघाला. ती म्हणाली, "माझी सासू, सासऱ्यांच्या निधनानंतर एकटीच राहते. अधूनमधून ती सारखी मुलांकडे जात येत असते म्हणून आम्ही तिला 'फ्लाइंग ममी' म्हणतो पण एरवी ती स्वतंत्र राहणंच पसंत करते. पण म्हातारपणामुळे ती फार अशक्त झाली की आम्ही तिला आमच्याकडे बोलावणार प्रश्न एवढाच की आम्ही तिच्या सर्व सुना नोकरी करतो. तेव्हा घरी तिची काळजी कोण घेणार? तरी-सुद्धा आम्ही यातून मार्ग काढूच. कारण तिला वृद्धाश्रमात पाठवणं आम्हाला कुणालाही आवडणार नाही. कारण आम्ही कौटुंबिक संबधांना फार जपतो—"

कुटुंबसंस्था मोडकळीस येतेय म्हणून ज्यांना खंत वाटते आणि आपल्या घरात तसं होऊ नये म्हणून जे आटोकाट प्रयत्न करतात त्यापैकी हे कुटुंब वाटलं मला. लैंगिक स्वातंत्र्य फ्रान्समध्ये फार, असं आपण वाचतो. पण एकदा आनेतनं मला बोलून दाखवलं की 'माझा नवरा दुसऱ्या स्त्रीच्या नादाला लागला तर मला मुळीच सहन व्हायचं नाही.' एकंदरीत ती मला कुठल्याही भारतीय स्त्रीसारखी पतिपत्नींमधील एकनिष्ठता मानणारी अशी वाटली, आणि इतरही अनेक तशा असतील यात शंका नाही.

घरगुती नोकराचा प्रश्न निघाला. फ्रान्समध्ये कुणालाही महिन्याला चार हजार फ्रँक्सपेक्षा कमी पगार मिळू नये असा कायदा आहे. परिणामी घरगुती नोकर ही संस्था अभावानंच आढळते. मिरयकडे नोकर नाहीत. वॅलेरीकडे आई प्राध्यापिका असल्यामुळे सकाळी फक्त स्वैपाकाला एक बाई येते. तिला 'हाउसकीपर' म्हणतात. 'अमूक कर, तमूक कर' अशी आज्ञा न देता 'प्लीज, हे करशील का?'– अशी तिला विनंती करण्यात येते. वरिष्ठ–कनिष्ठ अशी वर्गवारीही फारशी नाही. कुठल्याही प्रकारच्या कामाला प्रतिष्ठा आहे.

ह्या हाउसकीपरची मुलगी मिरयची मैत्रीण आहे. हॉटेलमधील वेटर किंवा टॅक्सी ड्रायव्हर यांना बरोबरीच्या नात्यानं वागवण्यात येतं. त्यांनादेखील 'प्लीज, थँक्यू' वगैरे म्हणावं लागतं. सिगरेट ऑफर करावी लागते. त्यांच्याशी थट्टामस्करी देखील होऊ शकते. एकदा पॅरिसच्या एका हॉटेलमध्ये कॉफी घेतल्यानंतर कप नेण्यासाठी वेटर आला. अनूनं कप गोळा करून त्याच्या हाती दिले. त्यावर तो काही म्हणाला आणि पिएरेत व आनेत हसल्या. मी विचारलं, "काय म्हणाला तो?" तर आनेत् म्हणाली, "तो म्हणतोय की ही मुलगी कामात हुशार आहे, हिचं आता लग्न करायला हरकत नाही."

लंडनच्या हॉटेलमध्येदेखील कॉलिननं आम्हाला गंमतीनं शेक्सपिअरचं एक स्वगत नाटकी पद्धतीनं म्हणून दाखवलं तेव्हा तिथल्या वेटरनं त्याला आवर्जून दाद दिली होती आणि कॉलिननं त्याचे आभारदेखील मानले होते.

डंकर्कमध्ये दोन दिवस राहून आम्ही पॅरिसला निघालो. गाडीत पुन्हा पाचपेक्षा जास्त बसू शकत नसल्यामुळे मिरयची आई भल्या पहाटे उठून पाचच्या ट्रेननं पॅरिसला गेली. नंतर आम्ही मोटारीतून निघालो. वाटेत एका छोट्याशा उपाहार-गृहात आम्ही नाश्ता केला. इथे वेटर नावाचा प्रकार नव्हता. सर्व सेल्फ सर्विस!

आपल्याकडे प्रवासात वाटेवर अशी छोटी उपाहारगृह असतात तिथं स्वच्छतेच्या नावान एकूण आनंदच असतो. पण फ्रान्समध्ये हे आडवाटेवरचं एकाकी छोटं हॉटेलसुद्धा स्वच्छ आणि कलात्मकतेनं सजवलेलं दिसलं

उत्तर फ्रान्स हा बहुतेक सपाट प्रदेश आहे. मिरय सागत होती की, दक्षिण फ्रान्समधले लोक उत्तरेची चेष्टा करतात छोटासा डोंगर दिसला की, हा उत्तरेकडचा आल्प्स ' असं चिडवतात. हे ती सागत असतानाच आम्हाला एक छोटी टेकडी दिसली म्हणून मी म्हटलं,

"हा उत्तरेकडचा हिमालय वाटत?"

पण खरी गंमत तर पुढेच आहे. ती खरीखुरी नैसर्गिक टेकडीसुद्धा नव्हती. जवळच कसलसं उत्खनन चाललेलं होत. ती खणून काढलेली माती बाजूला टाकल्यामुळे ती टेकडी बनलेली होती. खर म्हणजे मातीचाच भला ढीग मानवनिर्मित डोंगर म्हणायला हरकत नाही.

आपल्याप्रमाणेच तिथेदेखील उत्तर-दक्षिण हा भेदभाव आहेच. मिरयचं कुटुंब उत्तरेकडच असल्यामुळे अर्थातच दक्षिणेविषयी त्यांच्या मनात अढी आहे. मिरय भारतात आली असता शुभाबरोबर वेरूळ, अजिंठा पाहायला गेली होती. तिथे काही फ्रेंच लोक आले होते. शुभा म्हणाली, "तू त्यांच्याशी बोलत का नाहीस?" तर मिरय म्हणाली, "ते दक्षिण फ्रान्सचे असावेत. किती मोठ-मोठ्यान बोलतात, पाहिलंस? मला त्याची लाज वाटते."

आम्ही पॅरिसला येऊन पोचलो त्याआधीच पिअरेत येऊन पोचली होती. आणि तिन घर आमच्यासाठी सुसज्ज करून ठेवलं होत. मिरयच्या गॉडमदरच नाव (या घराची मालकीण) मादाम कारॉं ! पॅरिसच्या ग्रनेल् या विभागात तिचा चार खोल्याचा फ्लॅट आहे. ती आणि तिचा नवरा दोन दिवसाच्या सुट्टीत कुठे सहलीला गेली होती. (तिला मुलं नाहीत.) तिला प्रवासाची खूप आवड असावी. कारण ठिकठिकाणच्या स्मरणवस्तूंनी घर सुदर सजवलेलं आहे प्रथम-दर्शनी तिच्या बेडरूममध्ये एकच मोठा पलंग दिसतो. परंतु रात्री पिअरेतन जादूची काडी फिरवल्यागत तीन बेडरूम्स तयार केली. हॉलमधल्या सोफ्याच डबल बेडमध्ये रूपांतर करण्यात आलं. (हे तर आपल्याकडेही आपण पाहतो. इनडोअर्स किंवा ' लिव्हिंग रूम'च्या जाहिरातीत ) पण डायनिंग रूममध्ये भिंतीला लागून ओळीन लाकडाचे वॉर्डरोब्स (कपाटं) होती. त्यातल्या एका

पाटाचं दार पिअरेतन पुढं ओढलं आणि काय गंमत ! हा देखील एक डबल बेडच होता. सकाळी उठल्यावर उचलून बंद करून ठेवला की हुबेहूब कपाटासारखा दिसे. आत फोमची गादी, चादर, उश्या, पांघरूण सर्व काही जय्यत तयार होत.

तर त्या दिवशी सकाळी जेवण आटपून आम्ही पॅरिस-दर्शनाला निघालो. भर दुपारचं ऊन. इथल्यासारखं उकडत नव्हत तरी तिथले लोक 'पॅरिस इज हॉट' अशी तक्रार करीत होते. जी स्थळं आणि इमारती पर्यटकाची आकर्षणं म्हणून प्रसिद्ध आहेत तिथे जवळपास मोटारी नेण्यास सक्त बंदी आहे. म्हणून आम्ही बहुतेक पॅरिसदर्शन ट्यूब रेल्वेमधूनच केल.

एफेल टॉवर हा तर मादाम कारॉंच्या घरापासून जवळच आहे रमतगमत निघालो आणि कॉंक्रीटच्या जंगलामधून मोकळ्या जागी येताच निळ्या आभाळात घुसलेला उंचच उंच टॉवर दिसला. स्थापत्यशास्त्राच नवल म्हणून साऱ्या जगातून लोक हा मनोरा पाहायला येतात. याची उंची डोळ्यात भरावी म्हणून आजूबाजूच्या परिसरात कुठेही उंच इमारती बांधण्याच कटाक्षानं टाळलेलं आहे. जवळ जाता जाता या अजस्त्र बांधकामाचा परीघसुद्धा किती मोठा आहे याची जाणीव होते. वर जाण्यासाठी म्हणून लिफ्ट आहे. पण तिथे एवढा मोठा क्यू होता की आम्ही तो बेत रहित केला.

या टॉवरच्या आसपासचं वातावरण मला खूप आवडलं. चित्रविचित्र पोशाखातले देशोदेशीचे लोक—कुणी फोटो काढीत होते, कुणी चित्र काढीत होते, कुणी समोरच्या हिरवळीवर विसावले होते. तरुण मुलं घोळक्या-घोळक्यानं उभी होती. त्याचा एखादा म्होरक्या मधे उभा राहून गिटार वाजवी आणि बाकीचे टाळ्या वाजवून मुक्तकंठानं गात किंवा नाचत. कुणी छोट्या बॉक्समधला सिनेमा पाहात होते, कुणी फ्रान्सचं परपरागत संगीत कॅसेटवर वाजवून दाखवत होते.

स्टीफन झ्वाईगनं पॅरिसला 'सिटी ऑफ इटर्नल यूथ' (चिरतारुण्याचं शहर) असं म्हटलेलं आहे. अनेक रसिकांना अनेक प्रकारचा साक्षात्कार या शहरानं दिलेला आहे. 'कलेचं माहेरघर' म्हणून तर हे प्रसिद्ध आहेच. 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व' हा नारा याच पॅरिसनं जगाला दिला. इथली सॉरबॉन ही युनिव्हर्सिटी म्हणजे विद्येचं आगर असं मानतात. जगप्रसिद्ध संगीततज्ज्ञ, चित्रकार, शिल्पकार, साहित्यिक, नर्तक हे सर्वजण पॅरिसला कुर्निसात केल्याशिवाय आपल्या

कलेच सार्थक झालं असं मानीत नाहीत. असं हे बहुरंगी पॅरिस त्या मे महिन्यातल्या उष्ण दुपारीसुद्धा मला स्वच्छ, सुंदर, मनमोकळं, यशस्वी, दिलदार, रसिक आणि स्वागतोत्सुक वाटलं.

तिथन आम्ही फिरत–फिरत अधूनमधून भूमिगत आगगाडीचे साह्य घेत 'आर्क द त्रिआफ,' (विजयकमान), शाँसोलेसे ' हा प्रशस्त व सरळ रस्तला लांबच लांब फॅशनेबल रस्ता, त्वीलरी गार्डन्स्, कॉंकॉर्ड येथील स्तंभ ही सर्व स्थळं पाहिली. आर्क त्रिआफ ' या नेपोलियनने बाधलेल्या विजयकमानीवर त्यान जिथं विजय मिळवला त्या सर्व लढायांची नावं कोरलेली आहेत युद्धात बलिदान केलेल्याच एक स्मारकही तिथे आहे. बाहेरच्या बाजूनं एका योद्धयाची मूर्ती कोरलेली आहे. त्याच्या एका पायाला त्याच्या पत्नीनं विळखा घातलेला आहे. (तिच्या कडेवर एक अर्भक) आणि दुसऱ्या पायाशी त्याचा वृद्ध पिता आहे. तरीही त्याची दृष्टी मात्र दूरवर खिळलेली आहे. कुटुंबाचे पाश तोडून स्वदेशरक्षणासाठी शिर तळहातावर घेणाऱ्या शूर वीराचं हे एक बोलकं चित्रं आहे.

नेपोलियनचं थडगं हेदेखील पाहण्यासारख आहे. त्याच्या मृत्यूनंतर वीस वर्षांनंतर हे बांधण्यात आलं. अत्यंत कलात्मक अशा चकचकीत [illegible] लाकडाच्या शवपेटिकेत ठेवलेलं आहे. (त्याच्या आत निरनिराळ्या धातूंच्या आणखी पाच शवपेटिका आहेत म्हणतात.) सभोवती देवदूतांच्या आकृत्या कोरलेल्या आहेत. त्याचप्रमाणे या इमारतीत नेपोलियनच्या आयुष्यातील काही महत्त्वाचे प्रसग भिंतीवर चितारलेले आहेत.

एका सभागृहात माहितीपट दाखवतात. त्याचप्रमाणे पैसे टाकून एक टेलिफोन-सारखा रिसीव्हर कानाला लावला की त्यातून रेकॉर्ड करून ठेवलेली सर्व माहिती ऐकायला मिळते. (ही व्यवस्था बहुतेक सर्व ऐतिहासिक इमारतीत पाहायला मिळाली. म्हणजे गाईड बरोबर नसला तरी फारसं बिघडत नाही आपल्याला हव्या त्या भाषेतून ही माहिती ऐकता येते. त्या भाषेच बटण दाबून पैसे टाकले की झाल !)

त्या रात्री 'सनम' नावाच्या एका भारतीय उपाहारगृहात जेवलो. पॅरिसमध्ये 'विष्णू' नावाचं एक भारतीय उपाहारगृह अतिशय लोकप्रिय आहे असं जॉं सागत होता. तो तिथे अनेक वेळा जातो. पण नेमक त्या दिवशी विष्णू' बंद असल्यामुळे आम्हाला 'सनम' चा आसरा घ्यावा लागला.

इथे फारशी गिऱ्हाइकं नव्हती. तरी लीएजआ मडळींना तदुंरी चिकन, छोले पुरी, वगैरे प्रकार आवडले मिरय आपल्या आई-वडिलाना डोळ्याच्या खुणा करून 'हातानी खा, काटे-चमचे वापरायचे नसतात' अशी ताकीद देत असताना पाहून मला हसू आलं. मी म्हटलं "आमचे टेबल मॅनर्स एवढे काही काटेको-नसतात. तुम्हाला हातांनी जमत नसेल तर जरूर काटेचमचे वापरा—" पिअरेतला रसगुल्ले आणि जाँला लोणचं फार आवडलं. ते लोक तिखट खात नाहीत असा आपला समज. पण समोर आणून ठेवलेल्या छोट्या काचपात्रातलं लोणचं एकट्या जाँनं संपवलं—अगदी चाटूनपुसून! आपल्याला भारतीय मसाले फार आवडतात असं तो पुन्हा-पुन्हा सांगत होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी नोत्र दामचं चर्च, पाँतेआं, सॉरबॉन्चं विद्यापीठ ही ठिकाण पाहिली. हचबॅक ऑफ नोत्र दाम या लहानपणी पाहिलेल्या चित्रांतली चर्चची भली मोठी घटा स्मरत होती. हे चर्च पॅरिसच्या अगदी मध्यभागी असल्याच जाँ सांगत होता. सॉरबॉन विद्यापीठाचा कॅंपस काही फार मोठा प्रशस्त असा वाटला नाही. (एरवी विद्यापीठाच आवार नेहमी ऐसपैस असत.) की आम्ही या विद्यापीठाच्या इमारतीचा मागचा भाग पाहिला नकळे! तिथे मला एक नवलदृश्य दिसलं

एक सुदर तरुण मुलगी, व्यवस्थित वेशभूषा केलेली, फुटपाथवर डोळे मिटून बसली होती आणि तिच्या हातात फलक होता, 'कुणी मला पैशाची मदत करील का?' खर तर फ्रान्समध्ये भिकारी हा प्रकार मी पाहिला नाही. गिटार वाजवून हॅटमध्ये पैसे गोळा करणाऱ्या मुलाना जाँ 'प्रतिष्ठित भिकारी' म्हणत असे. परतु हा प्रकार काही औरच होता. जाँचं म्हणणं असं की काही चागल्या घरच्या मुलाना अमली पदार्थांच व्यसन लागतं. त्याच्यापैकी ही मुलगी असावी.

'टेल ऑफ टू सिटीज' या कादबरीमुळे मला 'बॅस्टिल हा तुरुग पाहण्याची फार इच्छा होती. परतु तो फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी म्हणे उद्ध्वस्त करण्यात आला. परतु ट्यूबसाठी खणताना या तुरुंगाचा पाया अस्तित्वात असलेला दिसला. तो तशाच स्वरूपात जतन करून ठेवलेला आहे. त्या ट्यूब स्टेशनच नावच 'बॅस्टिल' तिथे पूर्वी हा तुरुग कशा स्वरूपात उभा होता त्याची चित्रं (कल्पित) लावलेली आहेत. आणि माहितीचे फलकही आहेत.

१४ जुलै हा फ्रेंच राज्यक्रांतीचा दिवस त्याच दिवशी बॅस्टिल पडलं. पॅरिस-मधल्या एका रस्त्याचं नावही ' १४ जुलै मार्ग ' असं आहे.

आता पॅरिसमधलं एक मुख्य ' दर्शन ' राहिलं होतं, ते म्हणजे ' नाईट क्लब 'चं ! याविषयी खूप ऐकलं होतं, वाचलं होतं. त्या रात्री एखाद्या ' नाईट क्लब 'ला भेट देता येईल का ? —असं जॉला विचारायचं ठरवून मी दुपारी घरी परतले

# ६

# पॅरिस : आणखी काही पैलू

सर्वसाधारणपणे फ्रेंच माणूस हा मनमोकळा, विनोदी, कलासक्त, विलासी, ख्यालीखुशालीत रमणारा, सुखलोलुप असा रंगविला जातो. खरा प्रातिनिधिक फ्रेंच माणूस कसा असेल हे सागणं, हे खरा प्रातिनिधिक भारतीय कसा असेल हे सागण्याइतकंच कठीण आहे. फ्रेंचाविषयीचे काही चुटके तिथे युरोपात असताना ऐकले. त्याचे दोन नमुने–

एकदा एका फ्रेंच माणसाची बायको वारली. तिच्या अत्ययात्रेच्या वेळी तो अगदी ओक्साबोक्शी रडू लागला. इतरानी त्याच सात्वन करण्याचा प्रयत्न केला," अरे, रडू नकोस. दोन-तीन महिन्यांत तुझं दु ख ओसरेल. तुला दुसर लग्नकरता येईल."

तेव्हा तो रडत म्हणाला, " दोन महिन्यानतरचं ठीक आहे हो, पण आजच्या रात्रीचं काय ? ए स स्वार् ? "

एकदा एका हॉटेलात एक इंग्रज, एक अमेरिकन आणि एक फ्रेंच असे तिघे प्रवासी उतरले होते. तिथल्या पोहण्याच्या तलावातलं पाणी बर्फासारख थडगार होत. समजा एक पैज लागली की कसही करून त्या तिघांना पाण्यात उतरायला लावायच, तर तुम्ही काय केलं असत ?

याच उत्तर अस . इग्रज माणसाला सागायच की या पाण्यात पोहायलाच हवं असा इथला नियम आहे-की लगेच तो उडी मारेल. ( इंग्रजाची शिस्तप्रियता.)

अमेरिकन माणसाला सागायचं की इथे पोहायला खूप पैसे पडतात, आणि तुमच्या रोजच्या हॉटेलच्या भाड्यातच हे पोहण्याचे पैसे अतर्भूत केलेले आहेत

तर लगेच अमेरिकन पाण्यात उतरेल. ( अमेरिकन खर्चिकपणा )

फ्रेंच माणसाला मात्र सांगायचं की इथे या तलावात पोहण्याची सक्त मनाई आहे की लगेच त्याने उडी मारलीच म्हणून समजा. (हा फ्रेंच गुण (?) तुम्हाला आवडला का ?)

आदल्या दिवशी मी पिएरेतजवळ 'नाईट क्लब'ची गोष्ट काढली होती. पण ती नापसतीच्या सुरात पुटपुटली, "त्यापेक्षा आमच्या पॅरिसमध्ये आणखी कितीतरी सुंदर बघण्यासारख्या गोष्टी आहेत-" पॅरिस म्हणजे रंगेल नाईट क्लब्ज अशी जी पर्यटकाची समजूत असते त्याबद्दल खुद्द फ्रेंच मंडळींना फार वैषम्य वाटतं असं मला दिसून आलं. या विषयावर ते लोक फार कमी बोलत होते, नव्हे बोलण्यात टाळतच होते. मला वाटलं, स्त्रियाना याविषयी बोलणं अवघड वाटत असेल, म्हणून मी 'ह्या'ना म्हटलं 'जाँ'जवळ हा विषय काढावा. पण त्याची प्रतिक्रियादेखील अगदी अनपेक्षित अशीच होती. आपल्या दोन्ही तर्जन्या हवेत 'क्रॉस'सारख्या फिरवून तो अगदी हुकुमशहासारखा ठाम-पणे गर्जला, "नो, नो, नो!" मी तर बावरूनच गेले. कशाला हा विषय काढला, असं झालं. सर्वसाधारणपणे इथे कुणी परदेशी पाहुण्यानी येऊन आम्हाला 'फोरास रोड' पाहायचाय म्हटलं तर आपली जी अवस्था होईल तशी त्याची झाली. जाँ मला म्हणाला, "तुम्हाला तर तिथे काही बघवणारसुद्धा नाही, इतके बीभत्स प्रकार असतात." मिरय् मला म्हणाली, "मीसुद्धा अजून तो 'शो' पाहिलेला नाही." तिची आईदेखील तेच म्हणाली. आता यावर काय बोलणार ? माझी तर खूपच निराशा झाली.

त्या रात्री सेन् नदीमधून नौकाविहार करायचा असं ठरलं. पॅरिस बाय नाईट' अशी ही जलसफर असते. नदीच्या दोन्ही काठावरच्या इमारतीवर मोठ-मोठ्या दिव्याचा प्रकाश टाकून रोषणाई केलेली असते. सेन् नदीवरचे पूल हेसुद्धा स्थापत्यशास्त्र आणि शिल्पकला याचा मनोहर संगम दर्शवितात. एका पुलाच्या पायथ्याशी साक्षात मदन म्हणता येईल अशा एका अत्यंत बांधेसूद शरीराच्या पुरुषाचा पुतळा खडा होता. मिरय् म्हणाली, "सेन् नदीत पाणी किती आहे ते या पुतळ्याच्या संदर्भात ओळखता येतं म्हणजे पेपरमध्ये बातमी येते, आज त्याच्या गुडघ्यापर्यंत किंवा कमरेपर्यंत पाणी आहे, अशा पद्धतीनं." या मोटर लाँचच्या उघड्या डेकवर खुर्च्या होत्या. त्यावर बसून आम्ही अवती-

भवतीच्या मानवनिर्मित सौंदर्याचा आस्वाद घेत होतो. एवढ्यात काही मंडळी जाऊन कठड्यापाशी उभी राहिली. हळूहळू तिथे गर्दी वाढली. आम्हाला खुर्ची-वर बसल्या ठिकाणाहून काहीच दिसेना. आमच्या शेजारी काही वृद्ध पर्यटक-देखील होते. त्याचीही परिस्थिती कठीण झाली. मिरयने जाऊन उभ्या असलेल्या मंडळींना विनंती केली की, " सर्वजण आपापल्या जागेवर बसले तर सर्वांनाच नीट दिसेल " वगैरे. पण कुणी ऐकेना. मिरय् खूप रागावली. आम्ही तिला शांत केलं. सफर संपवून आम्ही परत फिरलो तेव्हा कठड्यापाशी उभ्या असलेल्या लोकांचं बोलणं मिरय् काळजीपूर्वक ऐकू लागली आणि नंतर आमच्यापाशी येऊन रागानं म्हणाली, " वाटलंच मला ! जर्मन लोक होते ते ! असा उद्धट-पणा आणखी कोण करणार ? आपण ऐकून घेतो म्हणून हे जास्तच करतात. सगळ्यांनी मिळून एकजुटीनं अशा वागणुकीचा प्रतिकार करायला हवा. पण बहुतेकजण ' जाऊ दे ! ' म्हणून गप्प बसतात, त्याचा हा परिणाम ! " अन्याया-विरुद्धचा हा तरुण फ्रेंच रक्तातला सळसळता संताप मला अगदी स्पष्ट जाणवला. ' हिटलर आणि जर्मन्स ' या दोघांचं ठाम नाव फ्रेंच मनात रुजलेलं आहे. मिरयचं बोलणं मला या कटू इतिहासाशी कुठेतरी संदर्भ सांगतय असं वाटलं.

दुसऱ्या दिवशी मिरय् आणि जाँ डंकर्कला परतले. कारण मिरयचं कॉलेज होतं आणि जाँची रजा संपली होती. पिएरेत मात्र आमच्याबरोबर पॅरिसलाच राहिली. त्याच दिवशी आनेत ( वॅलेरीची आई ) डंकर्कहून पॅरिसला आली आणि आम्ही आमचा बाडबिस्तरा मादाम कारोंच्या घरून आनेतच्या वहिणीच्या घरी हलवला. हेही कुटुंब सुट्टीवर होतं. या घराच्या मुलाच्या खोलीत ढीगभर तऱ्हेतऱ्हेची खेळणी होती. ती बघून मला खूपच गंमत वाटली. मूल या घरात या क्षणी हजर नसलं तरी त्याच्या असंख्य छोट्या वस्तूंनी या घराला जिवंतपण आलेलं होतं.

त्या दिवशी आम्ही आनेत् आणि पिएरेतच्या सोबतीनं खूप भटकलो. तिथे भुयारी रेल्वेची तिकिटं एकदम घाऊक मिळतात. तशी पिएरेतनं खूप गठ्ठाभर घेऊन ठेवली होती. स्टेशनात शिरताना प्रत्येकाच्या हातात ती अक्षता दिल्या-प्रमाणे एकेक तिकीट ठेवी. स्टेशनच्या दाराशी तिकीट चेकर हा प्रकार नाही. तिथल्या एका यंत्रात आपलं तिकीट टाकलं की झुलतं दार उघडतं आणि आपण आत जाऊ शकतो. दुसऱ्या बाजूनं ते तिकीट आपल्याला परत मिळतं. ते जवळ

वाळगायच. कारण आगगाडीत टी. सी. येऊ शकतो. एकदा एका स्टेशनात शिरताना मी माझं तिकीट यत्रात घातलं आणि माझ्यासाठी ते झुलत दार उघडलं. कुणीतरी घाईत असल्यासारखं माझ्या पाठोपाठ आत शिरलं, तेवढ्यात तिथं हजर असलेल्या साध्या वेषातल्या पोलिसान त्याला अटक केली. तो कुणी अरब असावा. माझ्या तिकिटात आत शिरण्याची त्याची चपळाई आणि त्याला पकडण्यात दिसून आलेली पोलिसाची त्याहून अधिक चपळाई पाहून मी थक्कच झाले.

थोडा बसप्रवासही केला. बसमध्ये शिरताच आपणच पैसे टाकून तिकीट ध्यायचं. बहुतेक जणाचे पासेस् होते. आनेत् म्हणाली, "मला कुठल्याही प्रवासात सवलत असते." का ? तर तिला तीन मुलं आहेत म्हणून ! फ्रान्सची लोकसख्या कमी कमी होते तेव्हा लोकसंख्या वाढीला उत्तेजन द्यावं म्हणून तीन मुलापेक्षा अधिक मुलं असणाऱ्याना ट्रेन आणि बसप्रवासात सरकारनं सवलत जाहीर केली आहे. आहे की नाही गमत ? मी तिला सागितलं की, "आमच्या भारतात अगदी उलट प्रकार आहे तरीसुद्धा आमच्याकडे कमी मुल असणाऱ्याना कसल्याही सवलती नाहीत." असो !

त्या दिवशी व्हिक्टर ह्यूगोच प्रशस्त घर पाहिल 'प्लास वाँदोम' हा आपल्या जव्हेरी बाजारासारखा तिथला भाग पाहिला. काचेपलीकडे सुंदर जड-जवाहिर कलात्मकरीत्या माडून ठेवलेल. किंमती मात्र डोळे फिरतील अशा ! याच्या कितीतरी पटीन कमी किंमतीत याहून सुदर दागिने आमच्या हिंदुस्थानात बनवतात अस मी आवर्जून सागितलं. (मिरय आमच्याकडे आली होती तेव्हा तिन पेठ्याकडून एक हिऱ्याची अगठी करवून घेतली आणि तिथे ती सर्वांना खूप आवडल्याचं पत्रातून कळवल होतं.) याच भागात रस्त्यावर एक सिनेमाच शूटिंगही चाललं होत. आम्ही काही वेळ थाबून ते पाहिलही. चित्रपट ऐतिहासिक असावा. कारण पात्राचे कपडे एकोणिसाव्या शतकातले होते.

'लूव्र' हा सुप्रसिद्ध म्युझियम पाहायचा म्हणून आमचा पॅरिसचा मुक्काम आम्ही खास वाढवला होता. तिथली 'मोनालिसा', 'मायकेल ॲंजेलो'च्या अप्रतिम शिल्पाकृती अस खूप काही पाहायचं होत (मोनालिसाविषयी सुमनचा नवरा कॉलिन एक चुटका सागत असे—एकदा मोनालिसा हे पेंटिंग काही कारणा-साठी काढून ठेवण्यात आल होत. तरी गाईड मात्र त्या रिकाम्या जागेकडे बोट दाखवून भक्तिभावान नेहमीसारखंच बोलत असे आणि प्रेक्षकसुद्धा ते चित्र

खरोखरच तिथं असल्यागत 'फार सुंदर !' असे उद्गार काढीत. हा चुटका ऐकून आम्ही हसलो तेव्हा कॉलिन गंभीर चेहरा करून म्हणाला, "हा चुटका नव्हे हं, ही खरी घडलेली हकीगत आहे!" सांगायचा मुद्दा असा की, फ्रेंच लोकांचा 'मोनालिसा 'विषयीचा भाबडा भक्तिभाव सर्वश्रुत असून थोडासा चेष्टेचा विषयही आहे.) अशी मोनालिसा पाहण्यासाठी डोळ्यात प्राण आणून वाट पाहात होतो परंतु इथं मात्र दैवानं घात केला. 'लूव्र' चे कामगार संपावर होते त्यामुळे लूव्र बंद होता, आमची खूपच निराशा झाली. आता दुधाची 'तहान ताकावर' म्हणून 'ज द पोम' हे चित्रदर्शन पाहायला गेलो.

आनेत् आणि तिचा नवरा पीटर याचा चित्रकलेचा अभ्यास दांडगा असावा. इथली अनेक सुप्रसिद्ध तैलचित्रं मला आनेत्नं समजावून सांगितली. 'इंप्रेशनिझम्' म्हणजे काय तेही मला इथंच कळलं. प्रत्येक चित्राचं रसग्रहण करता करता खूपच वेळ गेला. (या छोट्या म्युझियममध्येच इतका वेळ तर लूव्र पाहायला किती वेळ लागत असेल ! तिथल्या एकेका दालनात एकेक दिवस घालवावा असं जाणकार सांगतात.) तुलूस लोत्रेक, गोगँ, व्हॅन गॉग, रूसो, देगा वगैरे अनेक चित्रकारांच्या अप्रतिम कलाकृती इथं आहेत. देगाची 'बॅलेरिना', तुलूस लोत्रेकची 'बिछान्यात झोपलेली मुलं', व्हॅन गॉगचं 'सेल्फ पोर्ट्रेट' ही काही कायमची लक्षात राहण्यासारखी चित्रं !

तिथून आम्ही 'मॉमार्त्र' या छोट्या टेकडीवर गेलो पायऱ्या चढण्याचा ज्यांना त्रास होत असेल त्यांच्यासाठी वर जायला एक तिरपा लिफ्ट आहे. वरून साऱ्या पॅरिस शहराचं मोठं विहंगम दृश्य दिसतं. तिथे छोट्या दुर्बिणीदेखील ठेवलेल्या आहेत. त्यातून आपल्याला नॉत्रदामचं चर्च आणि इतर उंच इमारती पाहता येतात.

मॉमार्त्र ची सर्वांत लक्षात राहण्यासारखी आठवण म्हणजे तिथल्या चर्चच्या बाजूला असलेला 'चित्रकारांचा चौक'' अनेक चित्रकारांनी इथे आपली छोटी प्रदर्शनं उघड्यावर मांडलेली आहेत. काही चित्रकार तर चित्र काढतानाच आपल्याला पाहायला मिळतात. आपलं देखील पोर्ट्रेट हवं असल्यास तिथल्या तिथे काढून मिळतं. एक चित्रकार तर 'हिंदी आता है' असं म्हणून आम्हाला बोलावीत होता. तेवढं एकच वाक्य त्यानं शिकून ठेवलेलं असावं. दुसरा आम्हाला हाक मारण्यासाठी 'अच्छा–अच्छा' म्हणत होता. आम्हाला वेळ

नव्हता म्हणून नाही तर कलानगरी पॅरिसमध्ये एकतरी पोर्ट्रेट आम्ही काढून घेतलं असतं. एकूण इथलं विविधरंगी कलंदर वातावरण फार छान वाटलं. असा एखादा 'चित्रकार चौक' आपल्याकडेही असावा असं वाटून गेलं

घरी परतताना 'कॉंकॉर्डि'चा प्रचंड इजिप्शियन स्तंभ पाहून आनेत् म्हणाली, "हा तर इजिप्तला परत द्यायला हवा. तिथल्या वाळवंटात निळ्या आभाळाच्या पार्श्वभूमीवर तो किती छान दिसेल! इथल्या इमारतींच्या गर्दीत तो मुळीच शोभत नाही." मी तिला म्हटलं, "बाई ग, ही सगळी साम्राज्यशाहीची बिरुदं आहेत. ती अशी सुखासुखी कोण परत देईल?" इंग्लंडमध्ये राणीच्या मुकुटातला 'कोहिनूर' पाहून माझ्या पोटात कसं तुटलं ते मी तिला सांगितलं. तिच्या डोळ्यात मला सहानुभूती दिसली. जगाच्या पाठीवर कुठेही सुसंस्कृत, भावना-प्रधान मनाच्या तारा जुळायला वेळ लागत नाही.

त्या दोघींबरोबर आम्ही पॅरिसच्या जुन्या अरुंद गल्लीबोळातून भटकलो. पण कुठेही दारिद्र्य, अस्वच्छता दिसली नाही. मग एका जुन्या ऐतिहासिक उपाहार-गृहात जेवण घेतलं. इथे जुनेपणदेखील मिरवायचं असतं, त्यामुळे ते घासूनपुसून लख्ख ठेवलेलं असतं. जुन्या पद्धतीच्या कोरीव लाकडाच्या खुर्च्या आणि टेबलं, भिंतीवर जुने कलाकुसरीचे आरसे, तैलचित्रं, कोपऱ्यात उभे असलेले आणि भिंतीवर कोरलेले पुतळे. आपण अगदी एकोणिसाव्या शतकात वावरतो आहोत असंच वाटतं.

आम्ही खास परदेशी पाहुणे म्हणून त्या दोघींनी भोजन आणि चहासाठीसुद्धा उपाहारगृहं अगदी चोखंदळपणे निवडली होती. दुपारचा चहा ज्या ठिकाणी घेतला तेही हॉटेल अगदी नावीन्यपूर्ण--म्हणजे असं की खाली पुस्तकाचं दुकान आणि वर उपाहारगृह. चहा घेण्यासाठी वर जायचं असेल तर पुस्तकांच्या दुनियेतून वाट काढावी लागते. अर्थातच पाय तिथं रेंगाळतात आणि जाता-येताना एखादं दुसरी खरेदी होतेच. 'जॉन मॅकेन्रो'चं एक छोटेखानी चरित्र पुस्तक दिसलं. या 'सुपर ब्रॅट' विषयी माझ्या लेकीला--विभाला--खूप आत्मीयता आहे. (तीही थोडीशी शीघ्रकोपी आहे म्हणून असेल!) म्हणून मी ते आणि एक दोन पुस्तकं विकत घेतली. हे दुकान खास इंग्लिश पुस्तकांचं होतं हे विशेष!

त्या रात्री आम्हाला आमचे एक मित्र श्री. शिंके यांच्याकडे जेवणाचं निमंत्रण होतं. श्री. शिंके 'बँक ऑफ इंडिया'त आहेत. अनायासे भारतीय जेवणाचं

लाभ आमच्या फ्रेंच मैत्रिणींना मिळेल म्हणून आम्ही त्यानादेखील चलण्याचा आग्रह केला. त्या म्हणाल्या, "पण आम्ही त्याना ओळखत नाही." आम्ही म्हटले, "आम्ही भारतीय या बाबतीत इतके काटेकोर नसतो तुम्ही आलात तर त्याना आनदच होईल." त्याप्रमाणे शिंत्रे याना फोन करताच त्यानी या दोघींना घेऊन येण्याबद्दल आग्रह केला. त्याच्याकडे गोव्याचे माजी खासदार श्री. मुकुंद शिंक्रे व सौ. शिंक्रे याचा मुक्काम होता.

पुष्कळ दिवसानी एका भारतीय घरात मला कसं छान मोकळ मोकळ वाटल. इथे मॅनर्सच वगैरे अवडबर नव्हतं. 'काय बोलावं ?– कसं वागावं ?' याविषयी काही दडपण नव्हत. सौ शिंक्रे याचा मेनूसुद्धा सर्वांना आवडेल असाच होता. तदुरी चिकन, व्हेजिटेबल पुलाव, छोले, सॅलड, पुऱ्या वगैरे ! जेवताना खूप चर्चाही झाली. नेपोलियनचा विषय निघाला आनेत्च म्हणणं, "नेपोलियन काही फार मोठा होता असं आम्हाला वाटत नाही. त्यान सामान्य माणसासाठी काहीही केलं नाही." श्री. शिंक्रे म्हणाले, "त्यान एक 'कोड ऑफ लॉ' दिला, तेवढा त्याच मोठेपण सिद्ध करायला पुरेसा आहे." आनेतला काही ते पटलं नाही. पण विरोध दाखवण्याची तिची पद्धत मला मोठी गंमतीची वाटली ती म्हणाली, "वेल्, दॅट कॅन बी ॲन् ओपिनियन, बट् नॉट माइन् !"

नाईट क्लबची गोष्ट निघाली आणि मी शिंक्रे मडळींना सागितलं की मला असा एक क्लब बघायचा होता. पण हे लोक त्यात मोडता घालताहेत वगैरे. तेव्हा सौ शिंक्रे म्हणाल्या, "मीसुद्धा पाहिला आहे. तिथे खूप बीभत्स असं काही नसत. नग्न स्त्रिया असतात हे खर, पण त्यांची शरीर इतकी बांधेसूद असतात आणि त्याचं नृत्य हे तर डोळ्याचं पारण फेडणार असतं. तुम्ही जाच बघायला.."

हे ऐकताच मला खूप धीर आला कारण आधल्या दिवशी आमच्या यजमान मंडळींचा एकंदर अवतार पाहून 'कुठून ही इच्छा व्यक्त केली' अशी अपराधी भावना माझ्या मनात घर करून होती. आता खरी गोष्ट अशी होती की, ह्या फ्रेंच स्त्रिया घरदाज असल्यामुळे त्या बाजूला कधी फिरकल्या नव्हत्या. त्यामुळे नाईट-क्लब्जविषयी त्याच्या काही अवास्तव कल्पना होत्या. अश्लील चाळे दाखवणारे काही क्लब्ज असतीलही, परतु त्यातही काही प्रतिष्ठित म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दोन क्लब्जची नाव श्री. शिंक्रे यानी सांगितली. तिथले

'शो' स्त्रियांनी पाहण्यासारखे आहेत असं ते म्हणाले.

हे ऐकून आनेत् म्हणाली, "तुम्हाला तिथे जायचंच असेल तर आपण असं करू. आम्ही दोघी अनूला सांभाळतो तुम्ही दोघं नवरा–बायको, जाऊन या. दॅट ऑल्सो कॅन बी ॲन् एक्सपीरिअन्स!"

त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी रात्री मी आणि 'हे' अशा दोघांनी नाईट-क्लब पाहायला जायचं असं ठरलं. आनेत् आणि पिएरेत अनूला घेऊन कुठल्यातरी सिनेमाला जाणार होत्या. हे ठरल्यावर मला जरा बरं वाटलं. पॅरिसला येऊन– 'नाईट क्लब' पाहिला नाही ही नामुष्की मला टाळायची होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी स्पॅनिश एंबसीमध्ये जाऊन आम्ही स्पेनचा 'ट्रान्झिट व्हिसा' घेतला आणि लिस्बनला जायची आगगाडीची तिकिटं काढली. गाडी पोर्तुगालला जाताना स्पेनमधून जाणार म्हणून स्पेनचा व्हिसा- अनूला व्हिसाची गरज नाही' असं सांगण्यात आलं. म्हणून आम्हा दोघांचाच फक्त व्हिसा घेतला. (पुढं एक कठीण प्रसंग गुदरला, ते नंतर सांगेनच.)

तिथून 'जॉर्ज पॉम्पिदू-सेंटर' पाहायला गेलो. ही एक नवीनच प्रकारची विचित्र अशी अवाढव्य इमारत आहे. ग्लास, ॲल्युम्युनियम आणि मार्बल यांचा उपयोग करून हा 'शॉपिंग कॉम्प्लेक्स' बांधलेला आहे. यात दुकानं, उपाहारगृहं, चित्रपटगृह, डिसकोतेक्, सभागृहं, नाट्यगृह, कायम स्वरूपाची प्रदर्शनं, वाचनालयं, मत्स्यालयं असे अनेक प्रकार आहेत. सर्वांत वरच्या मजल्यावर जाऊन आम्ही चहा घेतला. इथून पुन्हा सभोवतालचं विहंगम दृश्य.

शेजारच्या टेबलावर 'काही म्हातारे आणि एक म्हातारी' चहा घेत होते. म्हातारी माझ्याकडे निरखून पाहात होती वाटलं, साडीचं कौतुक असेल. पण थोड्याच वेळात माझ्याजवळ येऊन ती म्हणाली, "तुम्ही मुंबईहून आलात का?" मी चकित होऊन म्हटलं, "हो." तर ती एकदम माझ्याशी हस्तांदोलन करीत म्हणाली, "मी तिकडे होते. लेडी रामारावच्या अध्यक्षतेखाली काम करणाऱ्या फॅमिली प्लॅनिंग कमिशनची मी सभासद होते." मी म्हटलं, "तुम्हाला भेटून फार आनंद झाला." ती म्हणाली, "गिव्ह माय् लव्ह टु बॉम्बे."

ती तुरूतरू परत गेली आणि आपल्या सख्यांना खूप काही सांगत असावी. कारण तेही कौतुकानं आमच्याकडे पाहात होते. या अनोळख्या ठिकाणी माझ्या

मुंबईवर प्रेम करणारं कुणी भेटेल असं स्वप्नातसुद्धा वाटलं नव्हतं. ' गिव्ह माय लव्ह टु बॉम्बे ! ' किती सुंदर कल्पना ! मुंबई या शहरावर मनापासून प्रेम करणारी आणि या शहराचे सर्व दोष पोटात घालणारी जी काही हाताच्या बोटावर मोजता येण्यासारखी माणसं असतील त्यापैकी मी एक आहे. त्यामुळे मुंबईची अशी कुणी दर्दभरी आठवण काढली की मी विरघळतेच. एरवी आमच्या मुंबईत एवढी अफाट गर्दी हे खरं, पण सगळे पोटार्थी ! एरवी याची अंत:करणं दुसरीकडेच कुठंतरी जडलेली असतात. मुंबईचे फायदे सगळे उपटायचे, मुक्काम इथेच करायचा, पण बोलताना मात्र शिव्या मुंबईला आणि ओव्या आपल्या दूरस्थ जन्मग्रामाला ! -- असा प्रकार बहुधा दिसतो.

चहा घेताना रात्री अनूला घेऊन कुठल्या सिनेमाला जावं याची त्या दोघी चर्चा करीत होत्या. का कोण जाणे, पण आम्ही दोघानीच ' नाईट क्लब ' बघायला जाणं या विचारानं मला उगीचच अस्वस्थ वाटू लागलं. सर्वस्वी परक्या अशा त्या झगमगत्या दुनियेत न जाणो काय वाढून ठेवलेलं आहे ! सोबत कुणी पॅरिशियन्स असायला हवे होते. या दोघी तर ठाम नकार देऊन बसल्या होत्या. श्री. शिंके याना विचारायलाही आता वेळ नव्हता. परतताना वेळ मध्यरात्रीची असणार. आम्ही नवखे परदेशी प्रवासी असल्याचा ठळक शिक्का आमच्यावर आहेच. न जाणो, लंडनसारखा कठीण प्रसंग गुदरला तर ! शिवाय आज पॅरिस-मधली शेवटची रात्र. इतके दिवस आम्हाला सोबत करणाऱ्या या दोघींना सोडून जाणही मला योग्य वाटेना.

त्याऐवजी नाईट क्लबचा बेत रद्द करून त्या दोघींना ' विष्णू 'मध्ये डिनरला नेलं तर !

माझा बेत ह्यानाही पसत पडला. नवल असं की, नाईट क्लब पाहण्याची ह्या 'ना अजिबात उत्सुकता नव्हती मी आमचा बदललेला कार्यक्रम सांगताच तिचा पवित्रा एकदम बदलला. इतके दिवस ' नाईट क्लब ' ही बघण्यासारखी जागा नाही हा एकच सूर तिन धरला होता. आता मीच नको म्हणते म्हटल्या-वर तिला वाटलं, ' हिची निराशा होतेय.' ती लगेच समजावणीच्या सुरात म्हणाली, " तुला एवढी हौस आहे तर जा तुम्ही ! तशी माझी बहीणसुद्धा तिथे जाते बघायला. " मीही तिचा गैरसमज होऊ नये म्हणून सांगितलं की, " आबटशौक म्हणून नव्हे, तर प्रवासी कुतहल म्हणून मला ती जागा पाहायची

होती, एवढंच ! पण आता या खेपेस नको पुन्हा केव्हातरी पाहीन."

नाईट क्लबमधील जीवनाचं सार मला एका छोट्या फ्रेंच कवितेत सापडलं त्याचं इंग्लिश रूपांतर असं —

Life is vain,
A little love,
A little hatred,
And then 'good day'!

Life is short,
A little hope,
A little dream,
And then 'good evening'!

( कवि लेऑं द मॉनिकं )

अशा रीतीनं त्या रात्री आमच्या यजमानिणींना 'विष्णू' या भारतीय उपाहारगृहात घेऊन गेलो. विविध कलात्मक वस्तूंनी हे उपाहारगृह छान सजवलेलं आहे वर जाऊन पाहतो तो सर्व जागा 'हाऊस फुल' होत्या आणि भारतीयापेक्षा फ्रेंच लोकच जास्त होते. आपलं जेवण तिथं एवढं लोकप्रिय झालेलं पाहून आनंद झाला. एक जरा खटकलं. दारात एक स्वागतिका होती. चटपटीत व हसतमुख, पण मुळीसुद्धा सुंदर नव्हती स्त्रीसौंदर्यलोलुप फ्रान्सच्या राजधानीत भारतीय सौंदर्याचा अधिक चांगला नमुना का नाही? अगदीच ब्यूटी क्वीन नसली तरी थोडा आकर्षकपणा अपेक्षित होता. असो! इथले खाद्यपदार्थ मात्र भलतेच महाग होते. एका पापडाचे आठ की दहा रुपये, यावरून बाकीची कल्पना करा. इथलं जेवणदेखील आमच्या फ्रेंच मैत्रिणींना खूप आवडलं. तिखट पदार्थांना मात्र त्या बोटही लावीत नव्हत्या. या बाबतीत युरोपियन पुरुष 'पुढारलेले' दिसले.

तिथून जवळच पॅरिसचं सुप्रसिद्ध 'कॉफीगृह' होतं. तिथं कॉफी घ्यायला गेलो. फुटपाथवर मांडव घालून खुर्च्या-टेबलं ठेवलेली होती. कुणी विद्यार्थी गिटार वाजवून मनोरंजन करीत होता. रस्त्यावरून पॅरिसच्या फॅशनेबल स्त्रीपुरुषांची ये-जा चालू होती. पावसाची सौम्य भुरभूर चालली होती. अशा वातावरणात गरम कॉफीचे घुटके घेत गप्पा करणं...अहा! मी आनेतला सांगून टाकलं की,

" नाईट क्लबला न गेल्याचा मला मुळीच पश्चात्ताप होत नाहीये, कारण आजची रात्र तुमच्याबरोबर फार आनंदात गेली."

हिंदुस्थानच्या गोष्टी निघाल्या. तिच्या मनात अनेक गैरसमज होते. ' एका खेड्यात माणसाना जिवंत जाळलं ' अशी काही बातमी तिनं वाचली होती आणि चित्रं पाहिली होती. मी तिला म्हटलं,

" असे हिंसेचे प्रकार युरोपात घडत नाहीत का ? पण एवढ्यावरून आम्ही सर्व असंस्कृत, जगली आहोत असं समजू नकोस. आमचे प्रश्न खूप आहेत. परंतु त्याचबरोबर आमच्याकडे चांगलंही पुष्कळ आहे ! "

तिच्या मुलीला- व्हॅलेरीला- मिरयूबरोबर हिंदुस्थानात येण्याची इच्छा होती, पण आनेतनं परवानगी दिली नव्हती. आता मला त्याचं कारण समजलं. गांधींच्या आत्मचरित्राच्या काही प्रती मी बरोबर आणल्या होत्या त्याची एक प्रत मी तिला भेट म्हणून दिली. त्या वेळी ' गांधी ' चित्रपट लागला नव्हता. भारत काय आहे, याची थोडी तरी झलक तिला कळेल ही आशा !

दुसऱ्या दिवशी आम्ही पॅरिस सोडलं. निघताना मी आनेतला म्हटलं, " आता तुला मी हिंदुस्थानातच भेटेन ! " ती हसून म्हणाली, " कदाचित ! " पिएरेत आमच्याबरोबर स्टेशनवर आली. गेले आठ-दहा दिवस आणि रात्री ती आमच्याबरोबर होती. कधी मी तिला दमलेली पाहिली नाही. सदैव उत्साहमूर्ती ! झटपट घरकाम उरकणं आणि स्थळदर्शनाला तयार ! मी तिला म्हटलं, " तू खूप दमली असशील, आता डंकर्कला जाऊन विश्रांती घे ! " मी काय म्हणतेय ते लक्षात येताच ती जोरजोरानं मान हलवून म्हणाली, " छे, छे, छे ! उलट तुमच्याबरोबर मी किती नवीन ठिकाणं पाहिली."

अनूला तिचा लळा लागला होता. गाडी सुटायची वेळ झाली, त्याबरोबर अनू रडायला लागली. तेव्हा तिला कुरवाळत तिचा मुका घेऊन पिएरेत म्हणाली, " रडू नकोस हं राजा, तू मोठी झालीस की, पुन्हा ये फ्रान्सला–" मी म्हटलं, " त्याआधी तू हिंदुस्थानात यायचं कबूल केलं आहेस ! " ती हसून म्हणाली, " जरूर जरूर ! "

गाडी स्टेशनातून बाहेर पडली. तिनं वळण घेईपर्यंत पिएरेत प्लॅटफॉर्मवर उभी राहून हात हलवीत असलेली दिसत होती.

ती दृष्टीआड झाली तरी आमच्या मनात तिनं कायमचं स्थान पटकावलेलं

आहे हे तेव्हाच जाणवलं. भारतीय आदरातिथ्याबद्दल आपण एवढं बोलतो. काय कमी पडलं इथल्या आदरातिथ्यात? युरोपियन लोकांविषयी आपल्या मनात किती गैरसमज आहेत? एका भारतीय कुटुंबात राहून आल्यासारखंच वाटत होतं. आम्ही भाग्यवान म्हणून आम्हाला ही चांगली मंडळी भेटली का? की जगभर माणसं सारखीच असतात? आपण बरेचसे पाश्चात्त्य होतोय्, तेही थोडेसे पौर्वात्त्य होताहेत का? जग हळूहळू लहान होत असावं!

एकंदर फ्रान्सची सफर मनाला पूर्ण समाधान देऊन गेली एवढं खरं! यानंतर पोर्तुगाल– आमच्या गोव्याचे एकेकाळचे ऋणानुबंध पुन्हा जागे होणार...!

# ७

# द्राक्षांचा देश : ' पोर्तुगाल '

स्पेनचा भूप्रदेश हा सर्वत्र सपाट दोहोबाजूला द्राक्षाच्या वेली आणि संत्र्याची झाडं खूप दिसत होती. आमचे पोर्तुगीज सहप्रवासी खूप बोलके होते. गप्पा करीतच झोपी गेलो. युरोपात आगगाडीचा प्रवास रात्री असेल तर होल्डॉल वगैरे नेण्याची गरज नाही स्वच्छ धुतलेलं अथरूण-पांघरूण व स्वच्छ अभ्रा असलेली उशी, सर्व प्लास्टिकच्या आवरणात सीलबंद केलेले—असा एकेक सेट प्रत्येकाला आणून देतात. दुसऱ्या दिवशी सकाळी गोळा करून धुवायला नेतात.

फ्रान्सची सरहद्द ओलांडून स्पेनमध्ये शिरल्यावर एका स्टेशनवर गाडी थांबली. एक ऑफिसर येऊन आमचे पासपोर्ट, व्हिसा वगैरे घेऊन गेला. नेहमीच रूटिन म्हणून आम्ही निर्धास्त होतो. एवढ्यात तो माणूस आमच्या नावाचा पुकारा करीत आला. मी जरा बावरलेच ! हे खाली प्लॅटफॉर्मवर उतरले होते. मी त्यांना घाईघाईने वर बोलावलं. ऑफिसर विचारू लागला, " अनुजाचा व्हिसा कसा नाही ? " ह्यांनी सांगितलं, " पॅरिसमधल्या स्पॅनिश एम्बसीत सांगितलं की फक्त प्रौढांना व्हिसा लागतो मुलीला गरज नाही."

त्यावर एकदम मान हलवून तो म्हणाला, " शक्यच नाही ! तिचा व्हिसा नसेल तर तुम्हाला परत पॅरिसला जावं लागेल."

आमची झोप उडाली. ह्यांनी त्याच्याशी वाद केला. पण तो ऐकेना. शेवटी हे म्हणाले, " तुमचा जो कोणी बॉस असेल त्याच्याकडे मला घेऊन चल."

परत येईपर्यंत मला धाकधूक ! शेवटी एकदाचे हे परतले.

" मी त्याच्या बॉसला सांगितलं, आमच्या दोघांचा व्हिसा घेतला असताना तिच्या एकटीच्या घेतला नसता का ? तशी गरज नाही म्हणाले म्हणूनच ! तुम्ही इथून पॅरिसला ट्रंककॉल लावा. मी पैसे भरीन. तिथल्या स्पॅनिश एम्बसीला विचारून पाहा, म्हणजे मी म्हणतो त्याची शहानिशा होईल." असं म्हटल्यावर तो अधिकारी म्हणाला, " बर, मग तुम्हाला पुढे जायला परवानगी देतो."

ह्यांचं शालेय शिक्षण गोव्याला झालेलं असल्यामुळे, आणि तिथे पोर्तुगीज भाषा हे शिक्षणाचं माध्यम होतं त्यामुळे, याना पोर्तुगीज चांगली येते. स्पॅनिश आणि पोर्तुगीज या बहिणी-बहिणी आहेत. उच्चारात थोडा फरक. यामुळे एक फायदा झाला की या पोलिस अधिकाऱ्याशी वाद घालता आला व आमची सुखरूप सुटका झाली. नाहीतर त्यानी आम्हाला नाहक अडवून ठेवलं असतं. कल्पना करा पॅरिसला परत जायची वेळ आली असती तर... !

पण हे असं कसं झालं ? स्पॅनिश एम्बसीनं अनूला व्हिसाची गरज नाही म्हणून सांगितलं आणि हे अधिकारी त्याची मागणी कशी करीत होते ? आम्ही नवल करीत राहिलो. पुढे पोर्तुगालला पोचल्यावर. कळलं की काही लाच खाण्याचा या अधिकाऱ्यांचा उद्देश असतो. म्हणून परदेशी पाहुण्याना ते वेठीला धरतात. आतापर्यंत युरोपात कुठे लाचखाऊपणाचा अनुभव आला नव्हता. आता मात्र आपले भाईबंद इथेही आहेत हे कळून सावध झालो.

फक्त पंधरा वीस मिनिटाचाच हा प्रसंग. पण तोंडचं पाणी पळविणारा होता. मुख्य म्हणजे इतका वेळ आमच्याशी खेळीमेळीनं गप्पा करणारे सहप्रवासी, ही पोलिसाची गडबड सुरू होताच एकदम आमच्याकडे संशयानं पाहू लागले. या अनोळखी ठिकाणी त्याना पटवून तरी कसं देणार, आम्ही निरपराध आहोत ते ! शेवटी सर्व गुंता सुटला आणि आम्ही व्यवस्थित मार्गी लागलो. पण त्या मधल्या पंधरा मिनिटात मला मनुष्यस्वभावाची एक वेगळीच चुणूक दिसली आपला काहीच गुन्हा नाही हे ठामपणे माहीत असतानासुद्धा दुसऱ्याच्या संशयी नजरांनी उगीचच अस्वस्थ व्हायला होतं.

लिस्बन ही पोर्तुगालची राजधानी आमचे गोव्याचे मित्र म्हणत, ' एवढा मी युरोपात हिंडतो, पण पोर्तुगालमध्ये पोचल्याबरोबर घरी आल्यासारखं वाटतं.' भाषेचं साधर्म्य आणि साडेचारशे वर्षांचे ऋणानुबंध आहेत ना, म्हणून असेल. पोर्तुगालमध्ये असताना ' ह्यांच्याही चित्तवृत्ती मला सदैव उत्फुल्ल दिसल्या.

शाळेत शिकलेला पोर्तुगालचा इतिहास अजून आठवत होता. प्रत्येक ठिकाण मनात अनेक संदर्भांना जाग आणीत होतं. ( जन्म माझं इंग्लंडमध्ये झालं ! )

लिस्बनच्या स्टेशनवर प्रीतीदास ( माझे दीर, यांना आम्ही ' प्रीती ' म्हणतो ) फर्नांदा ( माझी पोर्तुगीज जाऊ ) व डॉ. राम हेगडे ( गोव्याचे स्वातंत्र्यसैनिक ) अशी मंडळी आली होती. प्रीती लिस्बनमधील एक यशस्वी कायदेपंडित असून तिथेच स्थायिक झालेला आहे. मोहन रानडे याच्या सुटकेला तो बऱ्याच अंशी कारणीभूत आहे. डॉ. हेगडे हेही आता तिथेच स्थायिक झाले असून त्यांचीही पत्नी पोर्तुगीज आहे.

प्रीतीचं घर लिस्बनच्या मध्यवर्ती भागात ' शेरेटॉन ' या सुप्रसिद्ध हॉटेलच्या शेजारी एका अनेक मजली इमारतीत आहे. प्रीतीची पत्नी फर्नांदा ही तत्त्वज्ञान व मानसशास्त्र या विषयाची पदवीधर असून तिचं वाचन खूप दांडगं आहे. तिला प्राचीन कलात्मक वस्तू ( अँटिक्स ) जमवण्याचा खूप छंद आहे. आणि आपलं घर तिनं अशा वस्तूंनी चोखंदळपणे सजवलेलं आहे. तिच्याकडे जुनी तैलचित्रं, क्रॉकरी, चांदीची भांडी वगैरे अनेक अँटिक्स आहेत.

पहिल्याच दिवशी रात्री मी आणि फर्नांदा एका लोकप्रिय नटीचा ऑपेरा पाहायला गेलो. तिकिट त्यांनी सहा महिने आधी काढली होती म्हणे ! इतकी मागणी ! आम्ही ऐन वेळी पोचलो म्हणून प्रीतीऐवजी मला हे नाटक बघायची संधी मिळाली. ( इतर सर्व मंडळी एक राजकीय फार्स बघून आली, परंतु त्यातले बहुतेक विनोद तिथल्या चालू राजकारणावर असल्यामुळे त्यांचा आस्वाद ह्यांना नीट घेता आला नाही. )

आमच्या ' ऑपेरा ' चा प्रयोग ' हाऊसफुल ' होता. दर्जेदार नाट्यप्रयोगासाठी सुप्रसिद्ध असलेल्या एका ऐतिहासिक नाट्यगृहात हा प्रयोग होता. कोरीव नक्षीकाम आणि पुरातन कलात्मकतेची साक्ष देणारे भिंतीत खोदलेले पुतळे यांनी चहूकडच्या भिंती छतापर्यंत मढवलेल्या होत्या. उपस्थित प्रेक्षकवर्ग अर्थातच ' क्रीम ऑफ द सोसायटी ' असावा. रंगमंचासमोर वाद्यवादकांचा ताफा स्थानापन्न झाला होता आणि संगीत दिग्दर्शक प्रेक्षकांकडे पाठ करून त्यांना मार्गदर्शन करीत होता. आमची आसनं पुढच्या रांगेत असल्यामुळे संगीत दिग्दर्शकाचे जोरजोरात चाललेले हातवारे मला स्पष्ट दिसत होते आणि मला त्याची सवय नसल्यामुळे की काय नकळे, नाटकाचा आस्वाद घेताना अडथळा आल्या सारखा वाटे.

इतर सर्व वातावरण आपल्या नाट्यप्रयोगासारखच होतं. अलेक्झांडर ड्युमाच्या एका कथेवर ही संगीतिका आधारित होती. एक चांगल्या घराण्यातला तरुण, एका गायिका व नटी असलेल्या वेश्येच्या प्रेमात पडतो. त्याच्यासाठी म्हणून ती आपल्या व्यवसायाचा त्याग करते आणि शहरापासून दूर असलेल्या निवांत जागी वास्तव्य करते. वैवाहिक सुखाची स्वप्न पाहात असते, त्याच वेळी नायकाच्या बहिणीच्या लग्नाच्या वाटाघाटी चालू असतात. परंतु हे लग्न ठरायला हवं असेल, बहीण चांगल्या स्थळी पडायला हवी असेल तर नायकाने वेश्येशी संबंध तोडून टाकायला हवेत, अस सांगण्यात येत. नायक अर्थातच ही विनंती धुडकावून लावतो, तेव्हा अगतिक झालेला नायकाचा बाप त्याच्या नकळत त्याच्या प्रेयसीला ( या वेश्येला ) जाऊन भेटतो. तिच्यापुढे पदर पसरतो आणि विनंती करतो, ' माझ्यासाठी, माझ्या मुलीसाठी, तू माझ्या मुलाचा नाद सोड. त्याच्या जीवनातून निघून जा.'

हे ऐकून तिला फार क्लेश होतात. परंतु वृद्ध गृहस्थाच्या विनंतीला मान देऊन ती आपल्या प्रियकराच्या जीवनातून जाण्याचं वचन देते. तिच्या मनाचा मोठेपणा पाहून नायकाचा बाप भारावून जातो. म्हणतो, ' तू हीन कुळात जन्मली असलीस तरी तुझी वर्तणूक, हा त्याग, कुठल्याही उच्चकुलीन स्त्रीला लाजविणारा आहे.' ती त्यानंतर परागंदा होते. नायक तिचा शोध घेण्यासाठी जंग जंग पछाडतो पण व्यर्थ ! शेवटी क्षयरोगाच्या भक्ष्यस्थानी पडून ती अंतिम घटका मोजीत असताना त्याची आणि तिची भेट होते. इथेच पडदा पडतो. हा हृदय-विदारक अंत डोळे ओलावून जातो.

यातलं संगीत, अभिनय सारच काही उच्च प्रतीच होत. नायिकेचं काम करणारी नटी सुप्रसिद्ध व लोकप्रिय अशी गायिका असावी. तिच्या प्रत्येक गाण्याला टाळ्यांचा कडकडाट आणि ब्रावो !' – ' ब्रावो !' अशी दाद मिळत असे प्रत्येक अंक संपून पडदा पडला की प्रेक्षक टाळ्या वाजवून तिला पाचारण करीत आणि मग ती त्या अंकात काम करणाऱ्या इतर नटनट्यांसह हातात हात घालून पडद्यापुढे येई. कमरेत वाकून पुन्हा पुन्हा अभिवादन करी. पुन्हा एकदा टाळ्या आणि ' ब्रावो !' चा जयघोष ! अभिनयाला, गाण्याला अशी तिथल्या तिथे पावती देण्याची पद्धत एका अर्थी चांगली आहे. आपण मराठी प्रेक्षक टाळ्यांच्या बाबतीत एकूण कद्रूच आहोत. संगीत नाटकात एखाद्या गाण्याला टाळ्या पडतात, नाही असे नाही. त्याचप्रमाणे एखाद्या विनोदाला किंवा चांगल्या वाक्यालाही

टाळ्या पडतात, परंतु नाटक संपल्यावर नटांनी स्टेजवर येणं आणि प्रेक्षकांनी टाळ्या वाजवून त्यांना अभिवादन करणं, ही चाल आपल्याकडे नाही हेच बरं असंही वाटतं. कारण नाटक दु:खान्त असेल तर त्याचा जो गडद परिणाम होतो त्याला या अभिवादन प्रकरणामुळे छेद जाईलसं वाटतं.– प्रेक्षकांनी सुन्न, नि:शब्द होऊन परत फिरणं ही देखील एक मूक दाद असते तरीसुद्धा लिस्बनमध्ये पाहिलेली ही संगीतिका हा एक नावीन्यपूर्ण आनंददायी अनुभव होता.

पोर्तुगालची सुप्रसिद्ध युनिवर्सिटी ' कोइंब्रा ' पाहण्याची फार इच्छा होती तीही या भेटीत पूर्ण झाली. लिस्बनहून ' पोर्तु ' ला जाताना वाटेत ' कोइंब्रा ' लागतं. कुठल्याही विद्यापीठाच्या कॅंपसचं वातावरण नेहमी मनाला सुखविणारं असतं. जिथे अभ्यासवर्ग भरतात ती ऐतिहासिक वास्तु, आजूबाजूला बहुधा विस्तीर्ण, मोकळं आवार–कधी डेरेदार वृक्षांनी बहरलेलं, कधी हिरव्या मखमलीनं आच्छादलेलं आणि मुख्य म्हणजे उमलत्या खळाळत्या यौवनाचा चहूंकडे वावर ! ' कोइंब्रा ' देखील याला अपवाद नव्हतं. ' मोंदेगु ' या नदीच्या काठावर वसलेले हे छोटेखानी शहर एकेकाळी पोर्तुगालची राजधानी म्हणून मिरवीत असे. इ. स. १२९० मध्ये ' दिनीज ' या राजाने लिस्बनमध्ये या युनिव्हर्सिटीची स्थापना केली. १५४० मध्ये तिचं ' कोइंब्रा ' ला स्थलांतर झालं. इथली सर्वांत लक्षात राहण्यासारखी गोष्ट म्हणजे इथलं प्रचंड वाचनालय ' पाचवा जुआव ' या राजानं हे देणगीदाखल इ. स. १७१६ मध्ये युनिव्हर्सिटीला दिलं. इथं दशलक्षावर ग्रंथ आहेत आणि ते सर्व सोन्याने मढविलेल्या ब्राझिलियन शेल्फमध्ये मांडून ठेवलेले आहेत. पार छतापर्यंत ही कपाटं आणि वर छतावर सुंदर तैलचित्रं चितारलेली आहेत. भिंतीवरची कलाकुसर आणि कोरीव काम यावर खऱ्या सोन्याचा मुलामा दिला असल्याचं आमचा गाईड आवर्जून सांगत होता. लायब्ररीतलं इतर फर्निचर सुद्धा काळ्या शिसवी लाकडाचं, तुकतुकीत पॉलिशचं होतं. जिथं पदवीप्रदान होतं, तो कॉन्व्होकेशन हॉलदेखील विस्तीर्ण आणि भव्य गडद रंगाच्या जाड भारदस्त अशा पट्ट्यांनी सजवलेला असा होता. हे विश्वविद्यालय उंच टेकडीवर वसलेलं असल्यामुळे इथून 'मोंदेगु' नदीचं चकाकतं पात्र आणि तिच्या सभोवती दाटीवाटीनं उभी असलेली लाल छपराची छोटी छोटी घरं यांचं मोठं मनोरम दृश्य दिसतं.

उत्तरेकडे ' पोर्तु ' शहराकडे जाताना रस्त्याच्या दोहो बाजूला द्राक्षाचे मळेच्या मळे दिसतात. गेल्या दोनशे वर्षांपासून पोर्तुगालची ' पोर्ट वाईन ' जगप्रसिद्ध

आहे. मुख्यत: ही काळ्या द्राक्षापासून बनवली जाते. या मद्याच्या अवीट चवीचं गुपित इथल्या काहीशा रुक्ष जमिनीत आणि भूमध्य समुद्राच्या हवामानात दडलेलं आहे म्हणतात. ' रोज थोडीशी वाईन घेत जा म्हणजे एका मजुराच्या पोटाची व्यवस्था केल्याचं श्रेय तुम्हाला मिळेल ' असं पोर्तुगालचं घोषवाक्य होतं, असं प्रीती सांगत होता. हे मद्य आंबवण्याच्या प्रक्रियेत थोडीशी ब्रँडीदेखील मिसळली जाते, त्यामुळे द्राक्षाचा नैसर्गिक गोडवा टिकवून ठेवण्यास मदत होते.

' पोर्तु ' हे शहर लिस्बनहून खूप वेगळं. लिस्बनचा मोकळेपणा इथं नाही. काहीसं बंदिस्त असं गंभीर, उदासवाणं शहर इथे ( आणि युरोपात सगळीकडे ) घरांना नावं न देता फक्त क्रमांक देण्याची प्रथा आहे समजा, एखाद्या सरळ रस्त्यावरची दुतर्फा घरं घेतली तर क्रमांक फार तर शंभर दोनशेपर्यंत जातील. परंतु ' पोर्तु ' शहरात एक सरळ रस्ता इतका लांबलचक आहे की, या रस्त्या-वरच्या दुतर्फा घरांचे क्रमांक हजारावर गेले आहेत. पोर्तुजवळच्या एका छोट्या गावात फर्नांदाच्या आईचं जुनं प्रशस्त घर आहे. पाठीमागे मोठी बाग. घर कलात्मक ' अँटिक ' स्टाईलच्या फर्निचरनं सुंदर सजवलेलं. ( फर्नांदाला हा छंद आईमुळे लागला असावा. ) बागेत संत्री, लिंबं वगैरे फळांनी लगडलेली झाडं, छोटसं तळं, त्यात पोहणारी पांढरीशुभ्र बदकं, काठावर दगडी पुतळे, आणि लताकुंजाच्या सावलीत झुलणारा झोपाळा. फर्नांदाची आई पंचाहत्तरीच्या आसपास असेल, पण उत्साह आणि लगबग पन्नाशीतली. स्वभाव थेट भारतीय ' आजी '-सारखा. तुम्ही काहीच जेवला नाहीत ' म्हणण, मुलांचे लाड करण, पाहुण्यांचं सगळं व्यवस्थित होतंय् ना याची सारखी काळजी करण, पाठीवरून हात फिरवणं- तिला इंग्लिश आणि मला पोर्तुगीज अजिबात येत नसूनही आमचा संवाद शंभर टक्के यशस्वी झाला. शेवटी गृहिणी व पाहुणे यांच्यातली भाषा जगभर एकच असते. तिचे ऐंशीच्या पलीकडचे यजमान या वयातदेखील आपला रुबाब आणि दरारा राखून आहेत. ऐन उमेदीत त्यांनी आपलं साम्राज्य कसं गाजवलं असेल याची कल्पना येण्याइतपत !

' पोर्तु 'ला मुक्काम करून आम्ही सर्व उत्तर पोर्तुगाल पाहिलं. दक्षिणेपेक्षा उत्तरेला घनदाट वृक्षराजी अधिक आहे. आपल्याकडे प्रवास करताना बहुतेक वेळा असं दृश्य दिसतं की, एखादं गाव आलं की घरांचा पुंजका, नंतर रस्त्याच्या दोन्ही बाजूंना शेतं किंवा मोकळं पठार, पुन्हा गाव आलं की घरं ! पण युरोपात

मी पाहिलं, रस्त्याच्या दोन्ही बाजूला सतत छोटी छोटी घरं दिसतात. वीज, पाणी सगळीकडे खेळवलेलं आणि वाहतुकीची साधनं सहज उपलब्ध, त्यामुळे मनुष्यवस्ती अशी एका जागी एकवटलेली न राहता सर्वत्र विखुरलेली दिसते.

पोर्तुगालचे विस्तीर्ण, स्वच्छ समुद्रकिनारे हीही एक देशाची दौलत! लिस्बनला खेटून वाहणारी ' तेजू ' नदी ओलांडून आम्ही ' २५ एप्रिल पुला '-वरून ( पूर्वी याला ' सालाझार पूल ' म्हणत. २५ एप्रिलला पोर्तुगाल सालाझारच्या हुकुमशाहीतून मुक्त झाला. ) पलीकडच्या समुद्रकिनाऱ्यावर गेलो हा पूल पूर्वी जगातला सर्वांत मोठा पूल म्हणून ओळखला जात असे. हा समुद्रकिनारा लिस्बनपासून काही किलोमीटर अंतरावर आहे. ही सफर आम्ही नीताच्या ( प्रीतीची मुलगी ) छोट्या गाडीतून केली. पॅरिसहून लिस्बनला आलेलं शिंक्रे दांपत्यही आमच्याबरोबर होतं. नीताला आपल्या भारतीयत्वाचा अभिमान आहे. तिला युरोपियन ' म्हटलं तर राग येतो. आपल्या वडिलांचे कुठले गुण आपल्यात उतरले आहेत ते शोधून काढण्यात ती मग्न असते. ' माझ्या हाताचा पंजा मला उलटा वाकवता येतो ' असं सांगून तिनं प्रात्यक्षिक करून दाखवलं. खरंच, फर्नांदा सोडून आम्हाला सर्वांना ते जमलं. ' जेवताना तुमच्या बोटांना व्यायाम होतो म्हणून तुम्हाला बोटं अशी उलटी वाकवता येतात ' असा फर्नांदानं शोध लावलाय्. ' मग नीताला कसं येतं ? ' यावर नीताचं उत्तर, आनुवंशिक ! ' नीताचा वर्णदेखील एक सुरेख कॉकटेल आहे. ती वडिलांइतकी सावळी नाही आणि आईइतकी गोरीही नाही. अशा या ' टॅन 'च युरोपात भारी कौतुक आहे. बिकिनी घालून बीचवर सूर्यस्नान न करता नीताला त्याची प्राप्ती झाली आहे.

बीचवर खरी गर्दी ऑगस्ट-सप्टेंबरच्या ' समर 'मध्ये असते. आम्ही गेलो तेव्हा फक्त पूर्वतयारी चालू होती. छोट्या शॅक्स ( झोपड्या ) बांधून तयार होत होत्या. पोहायला गेलेल्यांपैकी कुणी बुडू नये म्हणून खास जागता पहारा ठेवण्याची व्यवस्था करण्यात येत होती. नीता, अनू आणि मी गुडघाभर पाण्यात जाऊन लाटांशी खूप खेळलो. इथे सूर्य नऊ-दहा वाजेपर्यंत बुडत नाही. आम्ही अंगात काही गरम न घालताच आलो होतो. काही वेळानं समुद्रावरच्या अणकुचीदार झुळकांनी आम्हाला हुडहुडी भरली म्हणून वाळूत परतलो. तिथल्याच एका उपाहारगृहात जेवायला गेलो. वाळूत सुंदर छोटी उपाहारगृहं आहेत आणि

तिथे विविध प्रकारचे उत्तम, ताजे, गरमागरम पदार्थ मिळतात. श्री. शिंके म्हणतात, 'पोर्तुगाल हा गरीब देश आहे असं तुणतुण आपण ऐकतो, पण हा युरोपातला गरीब देश आहे हे आपले लोक विसरतात,' याचा पुरेपूर प्रत्यय आला. स्पेन, पोर्तुगाल हे गरीब देश आहेत असं ऐकताना आपल्या डोळ्यापुढं वेगळंच दृश्य दिसतं. परंतु प्रत्यक्षात आपल्याकडे जसं उघडं-नागडं अर्धपोटी दारिद्र्य रस्त्यावर दिसत, तसं तिथे मुळीच दिसत नाही. गरीब लोकाची घरं-सुद्धा टुमदार, स्वच्छ, सुंदर. त्याचे अगणात वाळत टाकलेले कपडे पांढरेशुभ्र फाटका कपडा मला दिसला नाही. भिकारी आहेत असं ऐकलं, पण तेही कुठे फारसे दिसलेच नाहीत. आपली गरिबी आणि त्याची गरिबी यांत फार फरक आहे हेच खरं. तिथली छोटेखानी सुंदर खेडी पाहताना मला इथली आठवण येई. आपल्याकडेसुद्धा अशी सुबत्ता खेड्यापाड्यातून दिसेल तो सुदिन!

पोर्तुगालवर तब्बल चाळीस वर्षं सालाझारचा एकछत्री अमल होता. सुरुवातीला देश बिकट परिस्थितीतून जात असताना त्याला आर्थिक स्थैर्य मिळवून दिलं, म्हणून सालाझारचं कौतुक झालं. पुढे मात्र कुठल्याही हुकुम-शहाप्रमाणे त्याची लोकप्रियता संपुष्टात आली. आपल्या जिवाला काही धोका पोहोचेल या भीतीनं तो शक्यतो जाहीर सभातून जनतेपुढे येण्याचं टाळीत असे. त्यामुळे कित्येक सामान्य नागरिकानी त्याला पाहिलंदेखील नव्हतं. त्यावर आधारित एक चुटका असा—

एकदा सालाझार आगगाडीच्या पहिल्या वर्गाच्या डब्यातून प्रवास करीत होता. मधल्या एका स्टेशनवर एक नवश्रीमंत अशिक्षित (निरक्षर) शेतकरी डब्यात चढला व सालाझारशेजारी बसला. थोड्या वेळान तो सिगरेट ओढू लागला. 'फू फू' करून धुराचे लोट सोडू लागला. सालाझारला या धुराचा फार त्रास होऊ लागला. (स्वतः सालाझार हा धूम्रपान आणि मद्यपान, दोन्ही करीत नसे.) धूम्रमान थाबवण्याविषयी सालाझारने त्याला विनती केली पण तो ऐकेना तेव्हा सालाझारनं खिशातून आपलं कार्ड काढून त्याला दिलं. त्यान ते वाचलं. शात-पणे खिशात ठेवल आणि तो पुन्हा 'फू फू' करू लागला. (तो निरक्षर असल्यामुळे त्याला कार्डावर काय आहे ते वाचता आलं नाही. परतु तस दाखवणं हे कमीपणाचं होत, म्हणून त्यान वाचल्यासारखं केलं.) त्याचं हे औद्धत्य पाहून सालाझार आणखीच सतापला. एका स्टेशनवर उतरून त्याने

तावातावानं स्टेशनमास्तरकडे तक्रार केली. स्टेशनमास्तर डब्यात आला तर त्या शेतकऱ्याचं 'फू फू' चालूच होत. 'तुम्हाला कळत नाही का तुमच्या धूम्रपानानं दुसऱ्यांना त्रास होतो ते?' –असं मास्तरने विचारताच त्याने शांतपणे खिशातून कार्ड काढून (जे सालाझारने दिलं होत ते) मास्तरला दिलं. त्यावरचं नाव वाचताच मास्तर दचकला आणि त्यानं खाडकन सलाम ठोकला. धावत धावत आपल्या ऑफिसमध्ये परत येऊन तो खऱ्या सालाझारला म्हणाला, "साहेब, तुम्हाला दुसऱ्या डब्यात जावं लागेल, तो माणूस दुसरा तिसरा कोणी नसून मूर्ख सालाझार आहे!"

पोर्तुगालमधील एक तरी सण किंवा उत्सव बघावा असं माझ्या मनात होतं आणि आमच्या दहा दिवसाच्या टीचभर वास्तव्यातसुद्धा एक छानपैकी सण पदरात पडला. बारा जूनला 'सांत आतोन'चा दिवस. रात्रभर साऱ्या लिस्बन शहरात जल्लोष चालू होता. आम्ही रात्री नऊ वाजताच, 'आल्फायश' या हॉटेलमध्ये डिनरला गेलो. हॉटेल अगदी 'हाऊसफुल्ल' होत. सगळ्या टेबलांभोवती उत्साही तरुणतरुणी दाटीवाटीनं बसली होती रंगीबेरंगी कागदी फुलांनी हॉटेल शृंगारलं होत. वेटर्स आणि वेट्रेसेससुद्धा हसतमुख, लगबगीनं पदार्थांच्या डिशेस् घेऊन येत होते. त्या दिवशी खायच्या काही खास खाद्यपदार्थांचा आस्वाद घेऊन आम्ही बाहेर पडलो.

मला वाटत त्या रात्री घरात फार थोडे लोक झोपले असावेत. अवघं लिस्बन शहर रस्त्यावर दाखल झालं होत. 'प्रास दु पोंबाल' या प्रमुख भागात सर्व वाहतूक थांबवून रस्ते खास मिरवणुकीसाठी राखून ठेवण्यात आले होते. दुतर्फा माणसं गर्दी करून उभी होती. आम्ही कशीबशी वाट काढून मोक्याची जागा पकडली.

दुरून बँडचा, झांजाचा आवाज ऐकू येऊ लागला ड्रमच्या तालावर पावलं टाकीत एकेक पथक पुढे येऊ लागलं. एका ठरावीक जागी येताच सर्वजण थांबत, बँडच्या तालावर समूहनृत्य करीत. ते झालं की मार्चिंग करीत पुढे निघून जात. पाठीमागून दुसरं पथक येई. नंतर त्याचं नृत्य. अशी ही मिरवणूक चालू होती. ज्या गावचं पथक येई, त्या गावचा फलक सोबत येई. ('लालबाग सार्वजनिक गणेशोत्सव'च्या चालीवर) हा फलक दिसला की प्रेक्षकांपैकी जे कुणी त्या गावचे असत ते मोठमोठ्याने 'हिप् हिप् हुर्रे'सारख्या उत्तेजनपर

घोषणा देत. काही पथकाबरोबर घोषणा देणारी मंडळीदेखील पुढे पुढे जात. या समूहनृत्याची ती एक स्पर्धाच होती आणि जे पथक सर्वांत उत्तम, त्याला बक्षीस मिळणार होतं. म्हणून हे चढाओढीचं वातावरण. नृत्य करणाऱ्या स्त्री-पुरुष नर्तकांचे कपडे सुंदर रंगसंगतीचे होते. स्त्रियांनी डोक्याला विविधरंगी तलम स्कार्फ बांधले होते. टाळ्यांच्या गजरात त्यांचं सर्वत्र स्वागत होई. प्रेक्षकांपैकी छोटी गुटगुटीत बाळं तर त्यांना बघून हर्षभरे नाचत होती, समोरच्या मोकळ्या जागेत स्वच्छंदपणे वागडत होती आणि त्यांच्या आया गर्दीतून त्यांना कौतुक भरल्या नजरेनं न्याहाळत होत्या. नृत्य करणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या हातात कधी रंगीत रुमाल, कधी झेंडे, कधी घंटा, कधी वाद्यं असं काही असे. अवघा परिसर या उत्सवी वातावरणानं झपाटल्यासारखा झाला होता.

तिथून आम्ही 'आल्फाम' या लिस्बनच्या जुन्या वस्तीत आलो. कित्येक वर्षांपूर्वीची जुनी घरं आणि छोटे निमुळते गल्लीबोळ. या बोळातून आज वाहनांना अजिबात बंदी होती. पायीच माणसं इथून तिथून हातात हात घालून भटकत होती. संगीताचे सूरही कानी पडत होते. कोपऱ्यावर कुठे नृत्यही चालू असावं. फूटपाथवर काही खाद्यपदार्थांची विक्री चालू होती. फर्नांदानं माझ्यासाठी एक पदार्थ विकत घेतला. गरम गरम चपातीमध्ये पिठीसाखर घालून तिची गुंडाळी केली तर कशी लागेल, तशी काहीशी चव. चपातीला छान पदर सुटले होते. मला पदार्थ आवडला.

मला गर्दीची जरा भीती वाटते. मुंबईत प्रजासत्ताकदिनी दिव्यांची रोषणाई वगैरे पाहायला मी पायी कधी जात नाही. कारण गर्दीत स्त्रियांची छेड काढण्याचे प्रकार हमखास होतात. तेव्हा ही लिस्बनची गर्दी पाहून मी जरा भ्यायलेच, 'घरी जाऊ या' म्हणू लागले. पण फर्नांदा म्हणाली, 'घाबरू नकोस, या गर्दीत तसा त्रास कुणी देत नाही.' तिच्या म्हणण्याचा प्रत्यय मला आला. त्या चिंचोळ्या गल्लीत एवढी तुडुंब गर्दी होती तरीही कुणी मुद्दाम धक्का दिला नाही. त्या आनंदी बेहोष वातावरणातसुद्धा कुणी सभ्यतेची मर्यादा ओलांडलेली मला तरी दिसली नाही. आम्ही घरी परतलो तेव्हा दोन वाजून गेले होते. पण तेव्हाच कुठे मैफलीत रंग भरत होता. मैफलीची भैरवी पहाटपक्ष्यांनी आळवली असावी.

एरवी लिस्बन शहर मला शांत, स्वच्छ, उजळ, मोकळं, विस्कळीतसं वाटलं.

प्रत्येक शहराला एक चेहरा असतो. लंडन कसं भव्य, भीतियुक्त आदर वाटेल असं साम्राज्यशाहीची कवचकुंडलं घेऊन उभं. पॅरिस कसं स्वच्छंदी, आनंदी, मनस्वी, कलासक्त ! म्युनिक दुसऱ्या महायुद्धाच्या जखमा लपवीत, उद्योगमग्न, गंभीर, आत्मरत ! लिस्बन हे या सर्वांहून वेगळं. 'सनी साऊथ' म्हणतात ते नामाभिधान सार्थ करणार. इथल्या सूर्यप्रकाशाची झळाळी वेगळी, तेज वेगळं. आभाळ कसं झिलई दिल्यासारखं. हे शहर सात डोंगरावर वसलं आहे म्हणतात. त्यामुळे पायी चालताना सारखे चढ-उतार लागतात. 'रूसीयो' या भागात तर दोन उंचसखल ठिकाणं जोडणारी एक भलीमोठी लिफ्ट आहे. 'एफेल टॉवर' बांधलेल्या वास्तुशास्त्रज्ञान ती बांधलेली आहे. ती उतारूंची सारखी ने-आण करीत असते शहराच्या प्रवेशद्वारापाशी एका उंच चौथऱ्यावर खिस्ताची दोन्ही हात पसरून उभी असलेली एक प्रचंड मूर्ती आहे. लिस्बन शहराला तो आशीर्वाद देतो आहे ही कल्पना. त्याच्या पावलापर्यंत लिफ्टने जाता येत. खालून पाहताना ही माणसं मुंग्यासारखी दिसतात, त्यावरून पुतळ्याच्या भव्यतेची कल्पना येईल.

'रोसीयु' भागातल्या 'निकोला' या हॉटेलमध्ये आम्ही श्री. रिंके यांच्यासह जेवण घेतलं. तिथे 'बूकाज' हा सुप्रसिद्ध कवी नेहमी जात असे व तिथे बसून कविता लिहीत असे. या छोट्या हॉटेलमध्ये मधोमध त्याचा पुतळा उभा आहे. युरोपात लेखक, कवी यांना सर्वत्र अतिशय मानाच असं स्थान देतात. डिकन्स, शेक्सपियर, गटे याच्याविषयी लिहिलं आहेच. लिस्बनमधल्या जर्मन वकिलातीत गेलो होतो, तिथे गटेच मोठं तैलचित्र लावलेलं दिसलं. भारतात कुठल्याही सरकारी ऑफिसात गांधी, नेहरू, इंदिरा यांची बहुधा चित्रं दिसतात. टागोरांच चित्र कधी दिसेल? जर्मन वकिलातीत गटेला पाहून मला खूपच छान वाटलं.

वास्को द गामा यानं जिथून आपल्या समुद्रप्रवासाला सुरुवात केली ते ठिकाण पाहिलं. त्याच्या स्मरणार्थ तिथं जवळच भलंमोठं चर्च बांधलेलं आहे. तिथल्या स्तंभांवर नाजूक कोरीव काम दिसलं. अशा प्रकारचे कोरीव काम केलेले स्तंभ युरोपात अभावानच दिसतात. 'एवोरा' या गावी तर मी एक भयानक प्रकारचं चर्च पाहिलं. यातल्या सर्व भिंती आणि छत मृत माणसाची हाडे, सापळे आणि कवट्या यानी भरलेल्या आहेत. आत शिरताना प्रवेशद्वारावर लिहिलं

आहे, आम्ही तुमच्या हाडाची वाट पाहात आहोत !'

बा ऽ प रे ! माझ्या अंगावर शहारेच आले. मी प्रीतीला म्हटलं, " या भयकर प्रकाराचा हेतू काय ? "

तो म्हणाला, " माणसाला मृत्यूविषयी विचार करायला लावण–"

हा हेतू पूर्णपणे सफल झाला आहे यात शंका नाही. आत मात्र चिटपाखरू-सुद्धा नव्हतं. तिथून केव्हा एकदा बाहेर पडते अस मला झालं.

लिस्बनमधले शेवटचे दोन दिवस आमच वास्तव्य डॉ. हेगडेंकडे होत. पोर्तुगालमध्ये ' बुल-फाईट ' बघण्याची मला फार इच्छा होती, आणि डॉ. हेगडेंनी ती पूर्ण करण्याची खटपट चालवली होती. स्पेनमध्ये या बैलाला शेवटी ठार मारतात. पोर्तुगालमध्ये असं ठार मारण्यास बंदी आहे, म्हणून मी तो ' शो ' पाहायचा अस ठरवलं होतं. पण त्याआधी टी. व्ही. वर एक कार्यक्रम पाहिला. बैलाला एका लाब त्रिशूळाने खोचून-खोचून रक्तबबाळ करतात. ते पाहून मला कससच झालं. दोन-तीन तास अशा तऱ्हेनं त्या निष्पाप प्राण्याचे हालहाल चालले असता त्याच्या यातना मला बघवतील का ? माझा एकदम अवसानघात झाला नकोच ते ! बुल-फाईटचा बेत रद्द करू या अस मी डॉ. हेगडेंना सागितलं. त्याऐवजी मी सौ. हेगडेंबरोबर घरी बसून टी. व्ही. वर स्पेनमधले वर्ल्ड-कपचे फुटबॉल सामने मनसोक्त पाहिले. आपल्या हिंदुस्थानात क्रिकेटचं प्रस्थ फार पण साऱ्या युरोपात मला फुटबॉलचं वेडच जास्त दिसलं.

डॉ. हेगडे याच घर लिस्बनच्या एका उपनगरात एका लहानशा टेकडीवर आहे. त्याच्या गॅलरीतून पलीकडच्या दरीतील वृक्षराजी आणि दूरवरचा परिसर अस विहंगम दृश्य दिसतं. गोमतकाच्या स्वातंत्र्य-संग्रामात भाग घेतल्याबद्दल डॉ. हेगडे याना कारावासाची शिक्षा झाली होती. त्या वेळी ते ज्या ' काशियश '-च्या तुरुंगात होते तो तुरुंग आता त्याच्या गॅलरीतून दिसतो. तुरुगातून सुटल्या-वरही ते काही काळ पोर्तुगाललाच होते. त्याच वेळी त्यांचा मारिया अमेलिया याच्याशी विवाह झाला. त्यानतर हे जोडपं अनेक वर्षं हिंदुस्थानात होतं. ( मुंबई व नतर मडगाव, गोवा ) आता ती दोघ लिस्बनलाच स्थायिक झाली आहेत. अनेक वर्षं हिंदुस्थानात राहिल्यामुळे सौ. हेगडे साडी छान नेसतात, भारतीय पद्धतीचं जेवणही बनवतात शिवाय डॉ. हेगडे एक रसिक खवय्ये असल्यामुळे त्याच्याकडे लोणची, पापड, सुके बोंबील वगैरे खास भारतीय मंडळीही तैनातीला

असते.

त्यांच्याकडे असताना मी सध्याकाळी सौ. हेगडेंबरोबर दूरदर्शनवर 'श्वेतांबरा'-सारखी चित्रमालिका पाहिली. त्यांनी मला आधीचं कथानक सांगितलं. रोज रात्री पावणेआठला ही चित्रमालिका दाखवीत, त्यामुळे त्या घाईघाईत स्वयंपाक आटपून त्या वेळी टी. व्ही. समोर स्थानापन्न होत.

डॉ. हेगडेंबरोबर आम्ही बरंच शॉपिंगही केलं. कुठे काय मिळतं त्याचे सर्व बारकावे त्यांना माहीत आहेत, कारण बाजारहाट करायची त्यांना सुरुवातीपासूनच हौस आहे. त्यांच्या घरात पाहुण्यांची वर्दळ नेहमी ठरलेलीच. इथल्यासारखे नोकर दिमतीला नसल्यामुळे अशा भारतीय अगत्यशीलतेचा तिथल्या गृहिणीला त्रासच होतो तरी सौ. हेगडे सर्व सभाळून घेतात. एक दिवस त्यांना विश्रांती मिळावी म्हणून आम्ही रात्रीचं जेवण हॉटेलमध्ये घेतलं

दुसऱ्या दिवशी लिस्बनला परतलो.

आपल्या गोमंतभूमीवर साडेचारशे वर्षं राज्य करणाऱ्या या युरोपाच्या नकाशा-वरच्या छोट्या राष्ट्राचा आम्ही सोळा जूनला निरोप घेतला

# ८

# आल्सच्या कुशीतून हिटलरच्या यातनाघरात !

झूरिक विमानतळावर माझी मैत्रीण मनोरमा आणि तिचा नवरा पीटर आल्दिस अशी दोघं आली होती. पीटर हा जन्मानं स्विस असला तरी त्याचं बालपण इंग्लंडमध्ये गेल्यामुळं तो इंग्लिश चागलं जाणतो मनोरमाला जरी मी हॉटेलमध्ये खोली रिझर्व करायला सांगितली होती तरी ती म्हणाली, " एकाच दिवसासाठी हॉटेल कशाला ? तुम्ही आमच्या घरीच राहायचं ! "

विमानतळावरून घरी येताना लक्षात आलं पीटर अगदी बेफाम वेगात गाडी हाकतो. पुढं कळलं की पायलट होण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. त्याचा हा परिणाम असावा. नंतर आम्ही यावरून त्याची थट्टा करीत होतो. पण पहिल्या दिवशी मात्र घरी येऊन पोचेपर्यंत जीव मुठीत धरून होतो. मनोरमाचं घर झूरिकच्या एका उपनगरात निवातशा ठिकाणी एका इमारतीत दुसऱ्या मजल्यावर आहे. आम्ही लिफ्टनं येईपर्यंत पीटर धावत जिना चढून वर येऊन पोचलादेखील होता. मनोरमाच्या गॅलरीतून आल्प्सची बर्फाच्छादित शिखरं दिसतात. थंडीच्या दिवसात ती सगळीच हिमनगरी बनते आणि घराबाहेर पडणं मुष्किल होतं. म्हणून पीटरनं घरातच आपल्या छंदाची पद्धतशीर जोपासना चालू ठेवली आहे. त्याला विमानं आणि आगगाड्या यांची छोटी मॉडेल्स जमविण्याचा छंद आहे. घरातली एक खोली या छंदाला वाहिलेली आहे. खोली भरून विमानांची अनेक छोटी-मोठी, जुनी-नवी मॉडेल्स् दिसतात.

एक खोली अशी व्यापलेली असल्यामुळे आमची झोपण्याची व्यवस्था हॉल-

मध्येच करण्यात आली. तिथं एक सोफा-कम डबलबेड होताच. शिवाय खालून तळघरातून पीटरने स्वत: एक डनलॉपच्या बिछाना आणून जमिनीवर पथारी टाकली. हे म्हणजे खास भारतीय आदरातिथ्य ! युरोपात घरात जेवढ्या कॉट्स असतात तेवढीच माणस राहू शकतात असं ऐकलं होतं. परंतु ज्याच्या बायका भारतीय आहेत त्याना या प्रकाराची सवय झाली असावी एकूण सगळंच वातावरण घरेलू होत. मनोरमाने आमच्यासाठी खास भारतीय पदार्थ बनवले होते जेवताना टी व्ही. वर वर्ल्ड कपचे फुटबॉल सामने चालू होते. प्रत्येक गोल झाला की पीटर लहान मुलासारखा आरडाओरडा करी. या खेळाचं इथे सर्वांनाच भलतच वेड दिसलं. दिवसभर चालू सामने तर पाहायला मिळतच, पुन्हा रात्री त्याचं पुन:प्रक्षेपण असे

फुटबॉल हा खेळ मी इतका आत्मीयतेने पूर्वी कधीच पाहिला नव्हता. याची प्रकृती क्रिकेटपेक्षा फार वेगळी. क्रिकेट हा काहीसा संथ, परीटघडीचा खेळ आहे. याउलट फुटबॉल हा फक्त नव्वद मिनिटांचा असल्यामुळे यात ' कंटाळा ' नामक प्रकार अजिबात अनुभवाला येत नाही. प्रत्येक सेकंद कसा जिवंत, ठासून भरलेला असा असतो. भावनांचं प्रदर्शनदेखील अतिरेकी ! एकाने गोल केला की सगळे एकामागून एक येऊन त्याचं अभिनंदन करण्याच्या नादात त्याला खाली पाडून त्याच्या अंगावरच पडत. काही क्षण खेळाडूंचा एक ढीगच दिसे. शेवटी वेळ संपता संपता खेळ अधिकाधिक ' रॅश ' व्हायचा. प्रेक्षकात असलेला फुटबॉलसम्राट पेले ' अधूनमधून दाखवीत पेले 'वरची एक फिल्म मी पाहिली होती. त्यात तो आनंदातिशयाने रडताना दिसे. या खेळाचा एकदा नाद लागल्यावर ' क्रिकेट ' फारच अळणी, मचूळ, कंटाळवाणं वाटू लागत असावं

दुसऱ्या दिवशी आम्ही माऊंट पिलॅटस बघायला जाणार होतो. आमच्या उपनगरातून आम्ही झुरिकला लोकल ट्रेनने गेलो. तिथे स्टेशनच्या बाहेरच आमची बस उभी होती. बरेचसे प्रवासी अमेरिकन होते. त्यामुळे आमची गाईड इंग्लिशमध्येच बोलत होती. स्वित्सर्लंडमध्ये तसं पाहण्यासारखं ऐतिहासिक काही फारसं नसल्यामुळे ती आम्हाला इतर माहिती देत होती– म्हणजे इथलं राहणीमान कसं उच्च दर्जाचं आहे, किमान पगार किती असतो वगैरे. सुबत्ता, स्वच्छता तर सगळीकडेच दिसत होती

माऊंट पिलॅटसच्या पायथ्याशी आमची बस थांबली आणि आम्ही सर्व

रेलकारमध्ये शिरलो. हा एक छोटा आगगाडीचा डबाच जणू. तो दोऱ्यावरून लोंबकळत वरती शिखराकडे निघाला या दोऱ्या चांगल्या जाडजूड धातूच्या असाव्या. तरी अधांतरी लोंबकळताना पोटात कळ आलीच. सभोवतालचे डोंगर हळूहळू हिमाच्छादित दिसू लागले. थोड्याच वेळात आम्ही वर शिखरावर येऊन पोचलो.

इथे एक अद्ययावत वर्तुळाकृती हॉटेल आहे. हे चहूबाजूंनी काचबंद आहे आणि आत हीटिंग सिस्टिम आहे. आत एक उपाहारगृह, एक छोट चित्रकार्डांचं दुकान आणि एक छोट पोस्ट ऑफिसदेखील आहे. भेटवस्तूंच्या दुकानात तऱ्हे-तऱ्हेची स्विस घड्याळं दिसत होती. आम्ही कार्ड घेऊन प्रथम सर्वांना लिहून टाकली आणि नंतर बाहेर थोडं हिंडायचं ठरवलं चहूकडे हिमाच्छादित शिखरं होती. गुलमर्ग, खिलनमर्गला दिसतं तसंच दृश्य देव इथेच कुठेतरी असावेत ही कल्पना किती रम्य आहे ! हे शिखर समुद्रसपाटीपासून सात हजार फूट उंचीवर आहे. प्रथम वाटलं, एवढं बर्फ असूनसुद्धा थंडी काही फारशी वाटत नाही. पण हळूहळू चोरपावलांनी येऊन थंडीनं आम्हाला कधी वेढलं ते कळलं-सुद्धा नाही. एकदम तळपायातून, पोटातून हुडहुडी भरल्यासारखी वाटू लागली. उपाहारगृहात खाणं-पिणं झालं होतं. तरीसुद्धा ती ऊब पुरेना. काही क्षणात आता काकडून जाणारसं वाटलं. एवढ्यात परत फिरण्याची घोषणा झाली आणि हायसं वाटलं.

परतताना आमची छोटी केबल कार होती. म्हणजे एक छोटा पाळणाच. त्यात फक्त चार सीट्स होत्या. वरून चौघांनी जोरात आमचा पाळणा ढकलून दिला आणि आम्ही दोरीवरून खाली खाली येऊ लागलो. काचेच्या खिडकीतून खाली पाहावं तर डोंगराचे सुळके आणि खोल खोल दऱ्या ' मध्येच दोरी तुटली तर ' हा विचार मनात आल्याशिवाय राहात नाही. सभोवतालच्या शुभ्र-धवल सृष्टिसौंदर्याचा आस्वाद घेताघेता एक धाकधूक मात्र कायमची मनाला अस्वस्थ करीत होती. दोऱ्या अतिशय बळकट आणि दुहेरी होत्या ही त्यातल्या त्यात जमेची बाजू !

या पर्वतशिखरावरून खाली आल्यावर आम्हाला ल्युझर्न या छोट्या शहरात काही काळ भटकण्याची संधी मिळाली. काहीजणांनी शॉपिंग केलं. प्रमुख आकर्षण म्हणजे छोटी-मोठी मनगटी, गळ्यात अडकवण्याची, टेबलावर

ठेवण्याची, भिंतीवर लावण्याची, संगीत टोले देणारी, काही 'कुक् कुक्' करणारी अशी अनेक प्रकारची घड्याळं. यांच्या किंमतीसुद्धा खालपासून वरपर्यंत होत्या. एका दुकानात अंगठीतलं छोटं घड्याळ पाहिलं. किंमत अर्थातच डोळे फिरवणारी !

परतताना गाईडला काही फारसं काम नव्हतं. त्यामुळं ती प्रत्येक प्रवाशाशी काही खास गप्पा मारीत होती. मला म्हणाली, "तुझ्या लेकीचे तपकिरी डोळे आणि केस मला फार आवडले." मी तिला म्हटलं, "कमाल आहे तुझी ! आम्हाला तुमच्या निळ्या डोळ्यांचं आणि सोनेरी केसांचं आकर्षण वाटतं !" ती म्हणते, मला तीन मुली आहेत. तिघींचे डोळे निळे आणि केस सोनेरी. एकीचे तरी तपकिरी असायला हवे होते." यावर मला खूपच गंमत वाटली. मी म्हटलं, "योगायोग पाहा. मला देखील तीन मुलीच आहेत" ती म्हणाली, "त्यांचे पण डोळे आणि केस असेच ?" मी म्हटलं, "मग काय तर ! आपण अदलाबदल करायची का ?" ती डोळे मिचकावून म्हणाली, "फक्त मुलांचीच का ?" तिच्या म्हणण्याचा गर्भितार्थ लक्षात येऊन मला खूपच हसू आलं सटवीचं लक्ष काळे केस आणि तपकिरी डोळे असलेल्या माझ्या नवऱ्याकडेदेखील गेलं होतं म्हणायचं !

दुसऱ्या दिवशी आम्ही अर्ध्या दिवसाच झूरिक-दर्शन केलं. त्यात खास काही पाहण्यासारखं नव्हतं दुपारी मनोरमाबरोबर एका हॉटेलमध्ये जेवलो. (ती तिथल्या बँकेत आहे.) मधल्या सुटीत आमच्याबरोबर होती. लोकल ट्रेनमध्ये बसून आमच्या उपनगरात आलो. स्टेशनवर शुकशुकाट, आपल्यासारख्या जिथे तिथे टॅक्सीज दिसत नाहीत. फोन करून टॅक्सी बोलवावी लागते. त्याप्रमाणे आम्ही घरी येऊन पोचलो. चार वाजता पीटर घरी आला आणि त्याने आम्हाला विमानतळावर पोचवलं. विमानाची वेळ होईपर्यंत आम्ही कॉफी पीत बसलो. कॉफीबरोबर काही खास स्विस् चॉकलेट्स देण्याची इथे प्रथा आहे. पीटरने अनूसाठी आणखी काही चॉकलेट्स घेतली. स्वित्झर्लंडविषयी, तिथल्या उद्योग-धंद्यांविषयी खूपच माहिती त्याच्या बोलण्यातून मिळाली. (तो एका मोटार कंपनीत अधिकारी आहे.) दुसऱ्या महायुद्धाच्या वेळेस हिटलरच्या बाँबवर्षावा-पासून संरक्षण करण्यासाठी म्हणून अख्खं स्वित्झर्लंड आल्प्स पर्वताखाली बंकर्स-मध्ये दडवून ठेवण्याची योजना कशी आखली गेली होती याची चित्तथरारक

हकीकत त्यानं सांगितली. ' हिंदुस्थानात आल्यावर तुम्हाला नक्की भेटेन ' असं त्यानं वचन दिलं आणि आम्ही त्याचा निरोप घेतला.

रात्री फ्रँकफूर्टला येऊन पोचलो. सुरेशच्या घरी येऊन पथारी टाकली तेव्हा हुश्श् झालं. जर्मनी हा आमचा शेवटचा टप्पा. इथे आठ-दहा दिवस राहून हिंदुस्थानात परतणं! सगळ्या युरोप टूरचा वृत्तान्त सुरेशला सांगायचा होता. सुरेश इतकी वर्षं जर्मनीला आहे, पण आम्ही पाहिलेली कितीतरी स्थळं त्यानं अजून पाहिलेली नव्हती. शिवाय प्रवासात भेटलेली माणसं, आलेले अनोखे प्रसंग—त्या दिवशी मध्यरात्र उलटली तरी आमच्या गप्पा संपेनात. सुरेश म्हणाला, " तुम्ही गेल्यावर मला फारच एकटं वाटू लागलं. तुम्ही आणलेली ' गंगा की मौजमें ' वगैरे गाणी ऐकत होतो. पण त्यामुळे जुन्या आठवणी येऊन आणखीनच उदास वाटू लागलं, म्हणून गाणी बंद करून टाकली."

दुसऱ्या दिवशी आम्ही त्याच्या मोटारीतून म्युनिकला जायचं ठरवलं. तिथे आम्ही हिटलरचा कॉन्सेन्ट्रेशन कँप ( यातनाघर ) पाहायला गेलो. दारातून आत शिरताना आजपर्यंत याविषयी वाचलेलं सगळं काही मनात झाकळून आलं. दारातच पाटी लावलेली आहे—

" प्रवाशांना नम्र विनंती, या कँपमध्ये फिरताना योग्य ती शांतता व गांभीर्य पाळावे ! "

अनेक प्रवासी कंपन्यांच्या बसेस भरभरून हा कँप पाहण्यासाठी येतात. परंतु हे काही प्रवाशांना रिझवणारे प्रेक्षणीय स्थळ नव्हे. हिटलरच्या अत्याचारांना जे निरपराध जीव बळी पडले त्यांचं हे स्मारक आहे. तेव्हा इथल्या वातावरणाशी विसंगत असं वर्तन प्रवाशांकडून घडू नये म्हणून हा इशारा प्रवेशद्वारापाशी देण्यात आला आहे.

दुसरं महायुद्ध संपलं तेव्हापासून काही वर्षं हा कँप पूर्णपणे दुर्लक्षित अवस्थेत होता. तिथल्या ताज्या आठवणी इतक्या भयानक होत्या की तिथं कुणी फिरकणंदेखील असंभव होतं. परंतु हळूहळू या सर्व घटनांचं ऐतिहासिक महत्त्व लोकांना पटू लागलं. जे घडलं ते जगापासून लपविण्यात काही अर्थ नाही, उलट माणुसकीला काळिमा फासणारं जे भीषण हत्याकांड इथं घडलं ते जगाला कळायला हवं. ' यान दोमागाला ' हा पोलिश लेखक. तो स्वतः या कॅम्पमध्ये अनेक वर्षं कैदी म्हणून होता. आपल्या ' जे दाखाउमध्ये होते ' या पुस्तकात

तो म्हणतो, ‘ जे आमचे मित्र आमच्या डोळ्यांदेखत मृत्युमुखी पडले त्यांची शेवटची इच्छा होती– “ जर काही चमत्कार झाला आणि तुम्ही जिवंत राहिलात तर जगाला ओरडून सांगा आमचा कसा छळ झाला आणि आम्हाला कसं ठार मारण्यात आलं ते ! ”

ही इच्छा पूर्ण करावी म्हणून मी ही सर्व हकीकत लिहितो आहे.’

अनेकानी याविषयी लिहून ठेवलंय्. तरी त्यात एकवाक्यता नाही. कारण या कँपमधल्या सर्वंच व्यवहाराबद्दल विलक्षण गुप्तता पाळण्यात येत असे. तिथे ठार मारण्यात आलेल्या कैद्यांचा आकडा वीस हजारापासून दोन लाखापर्यंत देण्यात आलेला आहे. नॉयहॉयस्लर हा देखील तिथे कैदी म्हणून शिक्षा भोगलेला धर्मगुरू. तो म्हणतो–

“ मी स्वत. तिथली माहिती गोळा करण्याचा किती प्रयत्न केला. तिथून क्वचित सुटका झालेल्या कैद्यांकडे मी खोदखोदून चौकशी करीत असे. पण व्यर्थ ! ते काहीसुद्धा सांगायला तयार नसत. कारण काही सांगणं म्हणजे नव्या संकटाला आमंत्रण देण्यासारखं होतं. कँपमधले कैदी काही माहिती मिळताहेत, टिपणं काढताहेत असा जरादेखील सुगावा लागला, तर त्या कैद्यांना तडकाफडकी फाशी देण्यात येत असे. शेवटच्या क्षणी कँप शत्रूच्या हाती पडला, तत्पूर्वी सर्व कागदपत्रे, फोटो, दस्तऐवज, वगैरे जाळून टाकण्यात आले होते.”

‘ आम्ही क्षमा करू, परंतु विसरणार नाही ! ’ ( वी विल फरगिव्ह, बट विल् नॉट फरगेट ) हे ‘ दाखाउ ’मधून सुटलेल्या कैद्यांचं घोषवाक्य होत. त्यामुळे युद्ध संपल्यावर आणि सर्व स्थिरस्थावर झाल्यानतर या कँपचं म्युझियममध्ये रूपांतर करण्यात आलं. इथे आत शिरताच इथल्या वातावरणाचा आपल्यावर पगडा बसतो. एरवी युरोपात जिथे मोकळी जागा व हिरवळ दिसेल तिथे रंगी-बेरंगी फुलांचे गालिचे दिसतातच परंतु दाखाउ कँपच्या विस्तीर्ण आवारात एकही फूल दिसत नाही. कसलीही शोभिवंत सजावट नाही. फक्त साधी हिरवळ. आणि भोवती ओळीनं लावलेली सरळसोट झाडं. आत काउंटरवर छोट्या पुस्तिका व पिक्चर पोस्टकार्डस् मिळतात परंतु ती सर्व कृष्णधवल रंगाची आहेत युरोपात प्रवासी भेट देतात त्या प्रत्येक ठिकाणी रंगीत चित्रकार्डांची दुकानं आणि छोटी उपाहारगृहं हमखास असतात. या कँपच्या आवारात मात्र खाण्यापिण्याची कसलीही सोय नाही. सर्व गोष्टींची आखणी किती विचारपूर्वक केलेली आहे, याची

जाणीव होते.

फाटकातून आत शिरताच डावीकडे म्युझियमची बैठी इमारत आहे. ( या इमारतीत कँपचं स्वैपाकघर, कपडे धुण्याची जागा, स्टोअररूम व कैद्यांना फटके मारून फाशी देण्याच्या खोल्या होत्या. ) कँपमधल्या अत्याचाराची अनेक छायाचित्रं इथे ' ब्लो अप् ' करून लावलेली आहेत. आम्ही आत शिरत असतानाच एक प्रौढ, वृद्धत्वाकडे झुकलेली स्त्री डोळे पुशीत बाहेर आली. हे खरं तर प्रवेशद्वार. प्रदर्शन पाहून बाहेर पडायचं दार इमारतीच्या पार दुसऱ्या टोकाला होतं. ही स्त्री इथूनच बाहेर पडली म्हणजे पहिली काही छायाचित्रं पाहताच तिला पुढं जाणं अशक्य झालं असावं. कोण दिसलं तिला या चित्रात? तिचे आई, वडील, भाऊ? आपल्याला युद्धाची दुरूनसुद्धा झळ लागली नाही. तरी ही चित्रं पाहताना आतडी गोठल्यासारखी होतात. मग ज्याचे निकटवर्तीय या हत्याकांडात बळी गेले त्याची काय अवस्था होत असेल? फाशी दिलेली, फटके खात असलेली, रोगराईन उपासमारीत खंगलेली, आत्महत्या केलेली— अशी कितीतरी माणसं या चित्रात दिसतात. समुद्रकिनाऱ्यावर मासळीची रास पडते तशी एका चित्रात मृतदेहाची रास दिसत होती. गिनी पिग्जप्रमाणे येथील कैद्यांवरही काही क्रूर शास्त्रज्ञांनी प्रयोग केले या प्रयोगांना बळी पडलेल्या कैद्यांचीही केविलवाणी चित्रं होती.

म्युझियममधील चित्रं जिवापलीकडे जतन करण यावर तिथे कटाक्ष असतो. तरी ' दाखाउ 'मधल्या ज्या ज्या चित्रात हिटलरचा चेहरा दिसतो तो भाग ओरबाडून काढलेला दिसतो. या माणसाचं नावही कुठे सबंध जर्मनीत उच्चारलं जात नाही. त्यान जर्मन अस्मितेची जी विटंबना केली त्याबद्दल प्रत्येक नागरिकाच्या मनात शरम, दु:ख, चीड आहे. ' हिटलर हा त्यांचा वीक पॉईंट आहे, शक्यतो जर्मनीच्या प्रवासात त्याच्याबद्दल अवाक्षरही काढू नये,' असा प्रवाशाना दिलेला सल्ला मी गाईडमध्ये वाचला होता. त्याची प्रचीती प्रत्यक्षात आली. म्युनिकहून साल्सबर्गला जाताना हिटलरचं समर हाऊस पाहायला म्हणून थांबलो. आजूबाजूला दुकानं आहेत, म्युझियम आहे, जमिनीखाली खोदलेलं ' बंकर ', ( बॉम्बहल्ला झाला तर लपण्यासाठी ) आहे पण हिटलरचं घर काही दिसेना. सुरेशला (दिराला) म्हटल, रिसेप्शनिस्टला विचार, तर तोही विचारायला धजेना. सुरेश गेली वीस वर्षं जर्मनीत आहे. त्यामुळे त्याचे सर्व वीक पॉईंट्स

त्याला माहीत आहेत. शेवटी एका नकाशात ‘ Fuehrer’s house’ असं बारीक अक्षरात लिहिलेलं सापडलं. त्या अनुरोधाने गेलो तर त्या घराची नावनिशाणीसुद्धा नव्हती. बाहेरगावचे प्रवासी येऊन जर्मन इतिहासातल्या या काळ्या प्रकरणाची चवीन नोंद घेतात याची या जर्मनांना विलक्षण खंत वाटत असावी. संधी मिळाली तर हा दाखाउ’चा कॅम्पसुद्धा ते पूर्णपणे जमीनदोस्त करून टाकतील यात शंका नाही.

‘ दाखाउ’ म्युझियमच्या समोर मधोमध सरळ रस्ता आणि त्याच्या दुतर्फा असे चौतीस बॅरॅक्स ( डावीकडे सतरा उजवीकडे सतरा ) आहेत. आज ते सर्व पाडून त्याच्या पायाच्या चौकोनी काँक्रीटच्या खुणा तेवढ्या ठेवल्या आहेत. फक्त पहिला बॅरॅक नमुन्यादाखल म्हणून जसाच्या तसा ठेवला आहे. आत कैद्यांना झोपण्या-साठी म्हणून ‘ शेल्फ ’ सारखी व्यवस्था आहे. ( थ्री टायर आगगाडीत असते तशी ). प्रत्येक बॅरॅकमध्ये दोनशे कैद्यांसाठी व्यवस्था होती. परंतु जसजसे अनेक देश पादाक्रांत करण्यात आले, तसतशी कैद्यांची संख्या वाढली. एका वेळी सोळाशे कैदीसुद्धा एका बॅरॅकमध्ये कोंबण्यात आले होते त्यांना ठार मारण्यासाठी कसलेही क्षुल्लक कारण पुरत असे. नव्हे कधी कारणसुद्धा लागत नसे. गोळी घालून मारणे, फाशी देणे, उपाशी ठेवणे वगैरे सर्व प्रकार वेळखाऊ होते. तेव्हा गॅस चेंबर’चा अभिनव शोध लागला.

‘ बॅरॅकस ’च्या पलीकडे हे ‘ गॅस चेम्बर ’ आहे. आंघोळीसाठी म्हणून कैद्यांना एका खोलीत कोंडून ठेवीत. वर छताला अनेक नळ लावलेले होते. त्याच्या तोंड्यातून पाणी येईल म्हणून कैदी वाट पाहात. प्रत्यक्षात त्यातून विषारी वायू सोडीत असत. आत कोंडले गेलेले सर्व कैदी क्षणार्धात गुदमरून मरून पडत इतर अनेक कँपमधून लक्षावधी कैद्यांना गॅस चेम्बरमध्ये मारण्यात आलं. परंतु ‘ दाखाउ’चा चेम्बर मात्र त्याच हेतूने बांधला असला तरी त्याचा प्रत्यक्षात वापर केला गेला नाही, असं सांगण्यात आलं. या चेम्बरमध्ये मी त्या नळाखाली उभी राहिले तो माझ्या अंगावर सरसरून काटा उभा राहिला. समोरच्या भिंतीवरच मृतदेहाच्या ढिगाऱ्याचं चित्र ‘ ब्लो अप् ’ करून लावलं होतं.

एवढे हे ढिगारे पुरणं तरी कसं शक्य होतं ? जाळणं हा एकमेव पर्याय होता. तेव्हा गॅस चेम्बरला लागूनच ‘ दहन-कक्ष ’ ( क्रिमेटोरियम ) आहे. विटांनी बांधलेल्या या चौकोनी मोठ्या शेगडीत झटपट प्रेते जाळण्याची व्यवस्था होती.

'दाखाउ'मधून कितीतरी कैदी इतर कॅम्पमधल्या गॅस चेम्बरमध्ये पाठवण्यात येत. ऑस्ट्रियातील एका कॅम्पमध्ये १९४२ ते १९४४ पर्यंत एकूण तीन हजार कैद्यांना 'गॅस' करून मारण्यात आल्याची नोंद आहे.

गॅस चेम्बर व दहनकक्ष याच्या पलीकडच्या मोकळ्या जागेत आज तीन प्रार्थनागृहं दिसतात. एक प्रॉटेस्टंट, एक कॅथलिक आणि एक ज्यूइश. ती १९६० व १९६५ साली बांधण्यात आली. ज्यांचे निकटवर्तीय इथे बळी पडले अशी अनेक माणसं त्या प्रार्थनागृहांना भेटी देतात. तिथे खास त्यांच्यासाठी ठेवलेल्या नोंदवहीत ते नाव लिहितात. आपल्या मनातील तडफड व्यक्त करतात तेथील धर्मगुरू त्यांच्यासाठी प्रार्थना करतात. त्यांना मन शांती मिळावी म्हणून देवाला साकडे घालतात.

साक्षात मृत्यू समोर दिसत असतानासुद्धा माणुसकीचं हृदय हेलावून टाकणारं दर्शन झालेल्या अनेक कैद्यांनी लिहून ठेवलेलं आहे. एखादा कैदी पळून गेला आहे असं लक्षात आलं की त्याची शिक्षा म्हणून राहिलेल्या कैद्यांपैकी कुठल्याही दहाजणांना ठार मारण्यात येई. तेही कसं? तर 'बंकर'मध्ये त्यांना मरेपर्यंत उपाशी ठेवीत. जुलै १९४१ मध्ये एक कैदी पळून गेल्याचं अधिकाऱ्यांच्या लक्षात आलं. लगेच काही माणसं उपासमारीसाठी निवडण्यात आली. त्यातला एक ओक्साबोक्सी रडत म्हणाला, 'माझ्यावर दया करा हो! माझी बायकामुलं आहेत!' राहिलेल्या कैद्यात एक पोलिश धर्मगुरू होते. ते पुढे झाले आणि म्हणाले, 'याच्याऐवजी मी जातो.' अधिकारी चकित झाले, परंतु या अदला-बदलीला त्यांना परवानगी दिली आणि हे धर्मगुरू धीरोदात्तपणे मृत्यूच्या जबड्यात चालत गेले. पुढचे पंधरा दिवस मृत्युमुखी पडणाऱ्या आपल्या इतर मित्रांसाठी ते प्रार्थना करीत होते. त्यांना धीर देत होते शेवटी त्यांना इंजेक्शन देऊन मारण्यात आलं. ज्या मित्रासाठी त्यांनी स्वतःची आहुती दिली, तो पुढे सुटला. आपल्या बायका-मुलांत परतला. या धर्मगुरूची कृतज्ञतेनं आठवण काढीत राहिला.

एकदा एका कैद्याला कॉन्सेन्ट्रेशन कॅम्पमध्ये पाठविण्यासाठी आजाराचं खोटं सर्टिफिकेट हवं होतं. एका डॉक्टरने ते देण्यास नकार दिला. अधिकारी चिडून म्हणाले, 'मग तुम्हाला जावं लागेल त्याच्या ऐवजी!' डॉक्टर तिरीमिरीनं म्हणाले, 'जातो'— आणि खरोखरच 'दाखाउ'च्या कॅम्पमध्ये दाखल झाले. पुढे

कित्येक महिने सुटका होईपर्यंत त्यांनी आजारी कैद्यांची निरलसपणे सेवा केली. महायुद्ध संपल्यानंतर हेच डॉक्टर दाखाउ इंटरनॅशनल कमिटी'चे अध्यक्ष झाले.

१९४४ च्या फेब्रुवारी महिन्यात ब्याण्णव रशियन अधिकाऱ्यांना निर्घृणपणे ठार करण्यात आलं त्याचा हृदयद्रावक वृत्तान्त असा – या अधिकाऱ्यांना ठार मारण्यात येणार असल्याची अफवा कॅम्पमध्ये पसरली तेव्हा तेथे असलेल्या वीस हजार कैद्यांमध्ये संतापाची लाट उसळली. या अधिकाऱ्यांना घेतल्याशिवाय आज कामावर जायचंच नाही असा त्यांच्यात गुप्त करार झाला. कैद्यांना मोकळ्या जागेत उभं करून कॅम्प-लीडरने हुकूम सोडला, 'मार्च ऑफ! एकही कैदी हलेना! कॅंप लीडर चकित झाला. पुन्हा तो ओरडला, 'मार्च ऑफ!' तरी हूं की चूं नाही रशियन अधिकाऱ्यांना वेगळं उभं करण्यात आलं होतं. त्यांना या प्रकाराची कुणकुण लागली होती परंतु आपल्यासाठी या वीस हजार कैद्यांनी जीव धोक्यात घालावा हे अर्थातच त्यांना नको होतं त्यांच्यापैकी लेफ्टनंट कर्नल पुढे आले आणि म्हणाले, 'कॉम्रेड्स मार्च ऑफ! आपल्या देशासाठी आम्ही आनंदाने बलिदान करीत आहोत. गुड बाय! मार्च ऑफ!' तरीही कुठे हालचाल नाही. जर्मन कॅंप लीडरने संतापून सातशे बंदुकधारी सैनिकांना पाचारण केलं. तरीही कुणी हलेना रशियन लेफ्टनंट कर्नलनी पुन्हा पुन्हा तीनदा विनंती करूनही कुणाचंही पाऊल पुढं पडेना. ते सर्व ब्याण्णव रशियन अधिकारी आपल्या कैदी-बंधूंचा हा कृतनिश्चय पाहून हेलावून गेले. शेवटी कर्नलनी कैद्यांच्या पुढाऱ्याला जिवाच्या आकांतानं समजावून सांगितलं की, 'आम्हा ब्याण्णव अधिकाऱ्यांसाठी इतर वीस हजार कैद्यांनी जीव धोक्यात घालणं हा शुद्ध वेडेपणा आहे.' शेवटी या पुढाऱ्यानं व्यथित अंत:करणानं हुकूम दिला. कॉम्रेड्स, मार्च ऑफ!' हे कैदी निघून जाताच काही क्षणातच या ब्याण्णव रशियन अधिकाऱ्यांना गोळ्या घालून ठार करण्यात आलं.

अनेक वेळा कैद्यांवर विविध प्रकारचे प्रयोग केले जात एका डॉक्टरांना मलेरियावर औषध शोधून काढावयाची खुमखुमी आली. मलेरिया हा खरं तर उष्ण कटिबंधातला रोग. 'दाखाउ'मध्ये कुणालाही झालेला नव्हता. परंतु या डॉक्टरांनी हजारो डास आयात केले. या कैद्यांवर त्यांचा मारा केला. अर्थातच कैद्यांना मलेरिया झाला. परंतु डॉक्टरांचं औषध मात्र त्यांना लागू पडलं नाही. कॅम्पमध्ये असेपर्यंत हे कैदी कायमचे आजारी असत

२९ एप्रिल १९४५ रोजी अमेरिकन सैन्य आत शिरलं आणि 'दाखाउ'-मधील कैद्यांची मुक्तता झाली. एका भयानक दुःस्वप्नाचा अंत झाला. सर्व कैदी मधल्या मोकळ्या जागेत जमले. गेल्या कित्येक महिन्यांत याच ठिकाणी घडलेल्या अनेक भीषण घटना त्यांच्या अंतःचक्षूसमोर होत्या. एक मोठा क्रॉस तिथे उभा करण्यात आला. 'सर्व दिवंगत आत्म्यांना शांती मिळो' अशी प्रार्थना झाली. सुटका झालेल्या सर्वांनी परमेश्वराचे आभार मानले-आणि तिथून सर्वजण परतले. कुटुंबियांकडे, घरकुलाकडे, प्रिय मातृभूमीकडे! स्वातंत्र्याच्या प्रकाशाकडे!

विसाव्या शतकाच्या मध्यावर युरोपसारख्या पुढारलेल्या खंडात, जर्मनीसारख्या बुद्धिमान समजल्या गेलेल्या देशात माणसाला जनावराच्या पातळीवर घेऊन जाणारा असा इतिहास घडावा हा प्रकार बुद्धीला कुंठित करणारा आहे. यावर कित्येक समाजशास्त्रज्ञ अजून संशोधन करीत आहेत. हिटलरसारखा एखादा नेता विकृत निघणं हे समजू शकतं. परंतु त्यानं एक सर्वंकष यंत्रणा-ज्यात मोठमोठे अधिकारी, शास्त्रज्ञ, डॉक्टर होते-आपल्या लहरींनुसार राबवावी हे आकलन-शक्तीच्या पलीकडचं आहे.

जगप्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ सिगमंड फ्रॉईड याने 'माणसातील पाशवी वृत्ती ही सारासार विवेकबुद्धीपेक्षा अधिक प्रबळ असते,' असा आपला सिद्धान्त प्रथम मांडला तेव्हा एकच खळबळ उडाली. फ्रॉईड म्हणतो, "जगाच्या इतिहासात माणसाची झोप तीनदा उडालेली आहे (१) आपली पृथ्वी ही ग्रहमालेच्या मध्यावर नसून सूर्य हा मध्यावर आहे आणि पृथ्वी म्हणजे इतर ग्रहांप्रमाणे त्याच्याभोवती फिरणारा निव्वळ ग्रह आहे असं प्रथम गॅलिलिओ म्हणाला, तेव्हा. (२) माणसाला देवाने खास अनुग्रह करून बनवलेला नसून तो जनावरांपासून उत्क्रांत होत जन्माला आला असं डार्विन म्हणाला तेव्हा आणि (३) आता माणसातील पाशवी वृत्ती त्याच्या बुद्धीपेक्षा प्रबळ आहे, असं मी म्हणालो तेव्हा! कारण ही तिन्ही विधानं माणसाच्या स्वतःविषयीच्या गर्विष्ठ कल्पनांना धक्का देणारी आहेत." हिटलरची कारकीर्द म्हणजे फ्रॉईडच्या सिद्धान्ताचं चालतं-बोलतं उदाहरण आहे. स्वतः फ्रॉईड हा लंडनला गेला म्हणून वाचला. नाही तर तोही या ज्यू हत्याकांडात बळी गेला असता.

मिलग्रॅम या मानसशास्त्रज्ञानं माणसाच्या आक्रमक प्रवृत्तीचं संशोधन केलं. एकटादुकटा मनुष्य दुसऱ्यावर विनाकारण हल्ला करणार नाही. परंतु समाजाची

किंवा एखाद्या गटाची मान्यता असेल, पाठबळ असेल तर माणस दुसऱ्यावर अनन्वित अत्याचार करण्यास प्रवृत्त होतात अस दिसून आलं. दुसऱ्यांना विना-कारण दुखवू नये असं सांगणारी आपली सदसद्‌विवेकबुद्धी आणि तस करण्यास प्रवृत्त करणारी एखादी अधिकारी व्यक्ती, गट किंवा समाज यांपैकी अधिक प्रबळ कोण हा मिलग्रॅमचा सशोधनाचा विषय होता. आपला सर्वसाधारण समज असा असतो की, ज्याची सदसद्‌विवेकबुद्धी जागृत आहे तो इतराच्या दबावाला बळी पडणार नाही. परंतु मिलग्रॅमच्या प्रयोगात वेगळंच दिसून आल. अत्याचार करणारी माणस काहीशी असहाय होतात, कारण आपण करतो आहोत ते चुकीच आहे हे त्यांना कित्येक वेळी माहीत असनं तरीसुद्धा ती बाहेरून येणाऱ्या दबावाला प्रतिकार करू शकत नाहीत. आपल्यापेक्षा कमकुवत, दुबळ्या, हीन दर्जाच्या समजल्या गेलेल्या माणसावर अत्याचार करताना त्याना अधिकच चेव येतो. अशा अत्याचाराना एक प्रकारच 'सोशल सॅन्क्शन' असत. 'ज्यूंच रक्त हे हीन दर्जाच असून जर्मनीतून त्याचा निपात केल्याशिवाय आपला 'देश' शुद्ध होणार नाही' अस हिटलरनं जर्मनाच्या डोक्यात भरवून दिलं होन. त्यामुळे ज्यूचे हाल करून त्याना ठार मारणं हे आपलं कर्तव्यच आहे अशा पोटतिडकीनं जर्मन त्याच्या जिवावर उठले होते.

अमेरिकेतील बर्कले या विद्यापीठात 'हुकुमशाही प्रवृत्ती'वर सशोधन करण्यात आल. दुसऱ्या महायुद्धानतर झालेल्या या सशोधनाला अतिशय महत्त्व प्राप्त झालं होत. कारण अशा प्रकारचे हुकुमशहा उदयाला येत असताना विचारवंताचे लक्ष तिकडे वेधावे म्हणजे ही कीड मुळासकट उपटून टाकता येईल असा त्यामागे विचार होता.

'दाखाउ कॅन, ॲण्ड शॅल बी अ लेसन'– या पुस्तिकेचा लेखक म्हणतो, "'दाखाउ'चा धडा विसरता येण्यासारखा नाही. आमच्या पुढच्या पिढ्यावर आमच्यासारखे भीषण प्रसग ओढवू नयेत म्हणून आमच दु:ख आम्ही जगाच्या वेशीवर टागतो आहोत, आमच्या आठवणी सागतो आहोत."

'दाखाउ'मधून परतताना मन अतिशय विषण्ण झालं होनं.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६६२
ग्रं. क्र. २४४६६
२५.२०१९१५
शाखा (स्थळ प्रत)

# १

# निरोप

दाखाउचं यातनाघर पाहून आल्यावर मनावर खूपच ताण होता. त्यातून सुटका म्हणून आम्ही त्या दिवशी संध्याकाळी इझार नदीच्या काठी सहलीला जायचं ठरवलं. सुरेश म्हणाला, “ खायला आपण इथून काही न्यायचं नाही. तिथंच कोंबडी भाजून खाऊ या.” हा प्रकार काय ते मला कळेना. नंतर उलगडा झाला.

इझार नदीकाठचं हे ठिकाण अतिशय रम्य, निवांत, वृक्षाच्छादित असं आहे. ह्या जागेलाच ‘ ग्रीन वर्ल्ड ’ ( हिरवं जग ) म्हणतात. आमच्यासारखी अनेक मंडळी मुलाबाळांसकट सहलीला आली होती. आम्ही चटया वगैरे नेल्या होत्या. एक घडीची आरामखुर्चीसुद्धा होती. गाडीतून उतरून नदीकाठी पथारी पसरली, पण तिथं थोडं ऊन येऊ लागलं म्हणून तिथून उठून थोडं आणखी पलीकडे गेलो. इथे सावली अगदी गडद होती. नदीचं स्वच्छ निळं पाणी झुळझुळत होतं आणि दोन्ही काठावर स्त्री-पुरुष सूर्यस्नान करण्याच्या हेतूनं पहुडलेले होते.

या सूर्यस्नानाची चित्रं मी अनेक पाहिली होती. माझा समज असा की, निदान बिकिनी तरी अंगावर असतेच. पण इथलं दृश्य पाहून मला धक्काच बसला. बहुतेक स्त्री-पुरुष संपूर्ण नग्नावस्थेत होते. अवतीभोवती मुलं मुक्तपणे हुंदडत होती. काही जोडपी–प्रणयी युगुलंदेखील आली होती. त्यांची चुंबनं आलिंगनदेखील नि:संकोचपणे सर्वांदेखत चालूच होती. आपण आदम आणि ईव्हच्या युगात आहोत की काय असा क्षणभर भास झाला. पण आता सवयीन

या गोष्टी दृष्टीआड करायला मी शिकले होते. नंतर काही दिवसांनी पेपरमध्ये वाचलं की "अधिकाधिक मंडळी समुद्रकिनारी किंवा नदीकिनारी नग्नावस्थेत राहणं पसंत करतात त्यामुळे पूर्वी काही ठरावीक बीचेस नग्न प्रवाशासाठी म्हणून राखून ठेवण्यात आले होते." आता त्याऐवजी सर्व किनारे नग्न मंडळींना खुले करण्यात आले असून काही ठरावीक जागा मात्र कपडे घालणाऱ्यासाठी राखून ठेवण्यात आल्या आहेत" आहे की नाही गंमत ?

"तुमचं जेवण अधिक पौष्टिक असत, पण आमचं अधिक रुचकर असत" असं मी म्हणाले तेव्हा माझी युरोपियन जाऊ म्हणाली, "मला नाही तसं वाटत. तुम्हा भारतीयांची जीभ विविध मसाल्यांना इतकी चटावली आहे की, पदार्थांची नैसर्गिक चव घेण्याची तुमची क्षमताच नाहीशी झालेली आहे." तिचं म्हणणं थोडंसं पटलं मला खुद्द माझ्याच बाबतीत. युरोपात मी शाकाहारी आहे असं सांगताच माझ्यासमोर एक बशी येई. त्यात टोमॅटो, गाजर, काकडी याचे काप असत कधी उकडलेली कोबीची पानं, बटाटे किंवा नुसतीच लेट्यूसची पानं आपल्याकडेही काहीजण अशा प्रकारे भाज्या खातात आणि त्याच अधिक आरोग्यदायी असतात असं म्हणतात. मला मात्र त्यावर मीठ, लिंबू, मिरची, मिरपूड याचे संस्कार केल्याशिवाय चैन पडत नाही. कोबीची पानं खायची तर ती बारीक चिरून त्यात कांदा, खोबरं, मीठ, लिंबू घालून केलेली कोशिंबीर मी अधिक पसंत करते एकंदरीत जाऊबाईंच्या म्हणण्याप्रमाणे भाज्यांच्या मूळ नैसर्गिक चवीचा आस्वाद घेणं मला जमत नाही. भाज्यांचं कशाला, मासे मटणसुद्धा आपल्याकडे नुसतं उकडून त्यावर मीठ शिंपडून खाणं कितीजणांना जमेल याविषयी शंकाच आहे. आलं-लसूण, लवंग, दालचिनी या खमंग मसाल्याशिवाय मटण म्हणजे शृंगाराशिवाय लावणी असंच म्हणायला हवं की !

'निसर्गाकडे परत जा' हा संदेश मला इतरही अनेक वेळा जाणवला चहा-कॉफी पिणं म्हणजे नुसती चहा-कॉफी ! त्यात दूध आणि साखर हवी असं मुद्दाम सांगायला हवं आपल्याकडे मधुमेह झालेली किंवा लठ्ठपणा घालवू पाहणारी मंडळी अशी बेचव पेयं पितात, परंतु तिथे हा प्रकार सर्रास आढळला. मी शाळेत असताना, 'पर्ल बक्'च्या 'गुड अर्थ' या कादंबरीवरचा चित्रपट पाहिला होता. त्यात जुन्या काळी चिनी लोक चहा कसा पीत ते पाहिलं होतं नुसतं उकळलेलं पाणी आणि त्यात तरंगणारी चहाची पानं आजचा युरोपातला

चहा हा बहुधा याच प्रकारचा असतो. दूध ( सायीच ) आणि साखर आरोग्याला अहितकारक, म्हणून ही प्रथा रूढ झाली असण्याची शक्यता आहे. पण असा चहा चवीनं पिता येतो याचच मला नवल वाटतं. माझ्यावर असा प्रसंग आला तर मी कदाचित चहाच सोडून देईन.

स्त्रियांच नटण-मुरडणसुद्धा आपल्याकडे अधिक असावं युरोपात स्त्रियांचे केस बहुधा लाडे असल्यामुळे वेणी, अंबाडा हे प्रकार वर्ज्य. तेव्हा, फुलं, वेण्या, गजरे हेही आपोआप बाद शिवाय कुंकू, बांगड्या, मंगळसूत्र, कर्णफुलं, नाकातल्या चमकया हे सर्व आपण सौभाग्यालंकार म्हणून वापरतो त्यामुळे त्याचा भारतात अर्थातच वापर अधिक माझी जाऊ म्हणाली, ' विमानतळावर सांताक्रूझ इथे मी एक झाडूवाली पाहिली होती, तीसुद्धा किती नटली होती ! आमच्याकडे असं सहसा आढळत नाही ' अर्थात तिला सौभाग्य आणि त्याच्या खुणा ही कल्पना समजावून देणं कठीण गेलं एकदरीत युरोपात बहुधा स्त्रियांची वेशभूषा केशभूषा साधीसुधी, एकाच प्रकारची, वैचित्र्यहीन अशी दिसते.

लग्नानंतर पटेनासं झालं तर वेगळं होता यावं म्हणून घटस्फोटाची तरतूद झाली. परंतु तेवढेही कष्ट नकोत म्हणून आता लग्न न करताच एकत्र राहण्याची पद्धत तरुण पिढीत सर्रास रूढ होताना दिसते आहे कुटुंबसंस्था हळूहळू मोडकळीला येते आहे विवाहसंस्थेचं पावित्र्य कमी होत आहे. भूक लागली की जेवण, त्याप्रमाणे इच्छा झाली की लैंगिक गरजांची तृप्ती करून घेणं यात काहीच चूक नाही असा एक विचार मूळ धरीत आहे. ( आपल्याकडे, कित्येक वर्षांपूर्वी श्री. र. धों. कर्वे यांनी ' समाजस्वास्थ्य 'मधून असे विचार मांडले होते. ) फार प्राचीन काळी विवाहसंस्था रूढ होण्यापूर्वी असा ' मुक्त ' समाज अस्तित्वात असावा.

एकंदरीत ' निसर्गाकडे परत चला ' या घोषणेत, मला संस्कृतीचं चक्र, एक आवर्तन संपवून पुन्हा मूळपदावर येताना दिसतं आहे.

नदीकाठी मुलांना भूक लागली तशी सुरेशनं कागदाच्या पिशवीतून आणलेले कोळसे खाली जमिनीवर ओतले आणि निखारे पेटवले. ( माझ्या लेकीनं ' हे काय ? '— असं विचारलं तेव्हा माझ्या लक्षात आलं की शेगडी नावाचा प्रकार माझ्या मुलांनी पाहिलेला नव्हता ! ) सुरेशचा मुलगा रोमान आणि त्याचा मित्र असे दोघे कागदाने वारा घालीत निखारे फुलवीत होते. सुरेशनं चिकनचे तुकडे

आणले होते. ते ग्रिलवर भाजून घेतले. हे सारे सोपस्कार होईपर्यंत सर्वांना सडकून भूक लागली होती. त्यामुळे चिकन कधी आणि कसं फस्त झालं ते कळलंसुद्धा नाही. जेवण आटोपल्यावर मुलं पळापळी खेळू लागली आणि आम्ही चटईवर, आरामखुर्चीत पडून गप्पा केल्या.

सकाळी पाहिलेल्या यातनाघराचा विषय निघालाच. पुन्हा पुन्हा ती दृश्य मनश्चक्षूंसमोर उभी राहात होती. थोड्याच वेळात उन्ह कलली. पानांच्या जाळीतून झिरपणारा प्रकाश मऊ मऊ होत गेला. नदीवरून येणाऱ्या गार वाऱ्यानं हुडहुडी भरली तेव्हा मग आम्ही उठलो. बहुतेक आदाम आणि ईव्ह आता वस्त्रांकित होऊन परतीच्या वाटेवर होते. आम्हीदेखील सामान आवरलं आणि त्या निसर्गरम्य स्थळाचा निरोप घेतला.

दुसऱ्या दिवशी डी. एम. डब्ल्यू. या मोटार कंपनीचं प्रदर्शन पाहायला गेलो. हे प्रदर्शन कायम स्वरूपाचं असं चार मजली इमारतीत आहे. प्रथम आमची गाडी पार्क करायला आम्हाला बाजूच्या इमारतीत पाचव्या मजल्यावर जावं लागलं. तिथे गाड्या पार्क करण्यासाठी म्हणून खास इमारती बांधलेल्या आहेत आणि पार्किंग फी देखील जबरदस्त घेतात. म्हणजे हे देखील एक मिळकतीचं साधन आहे

तर हे मोटार प्रदर्शन अभिनव स्वरूपाचं होतं. गोल वर्तुळाकृती जिन्यानं वर वर जायचं आणि जाताना दोही बाजूंना आपल्याला मोटारीच्या सर्वांत जुन्या मॉडेलपासून कसकसे फेरबदल होत गेले याचे नमुने दिसतात. काही मोटारी-समवेत त्या काळच्या सुप्रसिद्ध व्यक्तींचे पुतळे उभे करून ठेवलेले आहेत किंवा मोटारीत बसवलेले आहेत प्रत्येक मजल्यावर छोटे टी. व्ही. सेट्स आहेत आणि त्यावर मोटारीच्या सर्व भागाची माहिती मिळते. काही गंमतीचे, विनोदी प्रसंगही दिसतात आणि एक भाष्यकार त्यावर विनोदी भाष्य करताना दिसतो. सर्वांत वरच्या मजल्यावर गाडीचं लेटेस्ट मॉडेल अगदी शाही इतमामानं उभं आहे. अशा रीतीनं डी. एम. डब्ल्यू. गाडीचा सगळा इतिहास या प्रदर्शनात बघता येतो. खाली येण्यासाठी मात्र लिफ्ट आहे.

तिथून ऑलिंपिकसाठी बांधलेलं प्रचंड स्टेडियम व तिथला पोहण्याचा तलाव इ. सर्व पाहिलं. संध्याकाळ होत आली तेव्हा सुरेश म्हणाला, "तुम्हाला म्युनिक-मधल्या सर्वांत जुन्या बीअर हाऊसमध्ये नेतो " या बीअर बारचं नाव 'हॉफब्रॉइ

हाऊस ' हे सोळाव्या शतकातलं आहे. मोठा प्रचंड हॉल आणि सर्वत्र ओळीन मांडलेली टेबलं आणि बाकडी, मोठमोठी जुन्या पद्धतीची लॅम्पशेड्स, वरती छतावर अनेक पेंटिंग्ज्, भिंतीवर खुंट्या वगैरे. एका कोपऱ्यात बँडचा ताफा बसलेला होता आणि त्यांचे उत्तेजक असे वाद्यस्वर वातावरण उत्फुल्ल करीत होते. हॉल भरून माणसं होती काही स्त्रियाही होत्या, पण जास्त करून पुरुष. मोठमोठ्या जगजमधून फेसाळलेली बीअर पीत होती. काही खास शेलके पदार्थ त्याबरोबर खायलाही मिळत होते. मोठमोठ्यानं गप्पा चालल्या होत्या. एखाद्या लग्नाचा मांडव असावा तसं उत्साही वातावरण होतं.

युरोपात मी एक पाहिलं. सर्वत्र टापटीप, स्वच्छता, कामसूपणा माणसं कशी सदैव उद्योगात आणि तरी अशा उपाहारगृहातून, बार्समधून, नृत्यगृहातून गर्दी असतेच. ती माणसं कुठली आणि ही कुठली ? ती वेगळी आणि ही वेगळी का ? की ती बाहेर उद्योगी, चटपटीत, अबोल, कामसू वाटणारी मंडळी काम संपलं रे संपलं की आनंदोत्सवासाठी बाहेर पडतात ? असंच असावं. ' कामाच्या वेळी संपाटून काम आणि मजेच्या वेळी धुंद मजा ! ' असं यांचं ब्रीदवाक्य असावं. दुकानातली विक्रेती सहा वाजले रे वाजले की गिऱ्हाइकांना तशीच सोडून पळते हे काही मला योग्य वाटेना. पण सुरेश म्हणे, " कदाचित तिला नृत्यगृहात अपॉइंटमेंट असेल म्हणून पळतेय ती ! " म्हणजे तिचं असं पळणं समर्थनीय असून, समजून घेतलं जातं.

ऱ्हाईन नदीच्या काठी असलेल्या रूडेसहाईम या स्थळी अशाच एका ' ड्रिंक अँड डान्स ' उत्सवाला गेलो होतो समांतर असलेल्या मुख्य रस्त्यावर शुकशुकाट पण आत गल्लीत गेलं की सर्वत्र दिव्यांची रोषणाई दिसते आणि संगीताचे स्वर कानी येतात. मला वाटलं जत्रेसारखा प्रकार असेल. पण हा उत्सव बाराही महिने रात्रभर चालू असतो असं कळलं. त्या चिंचोळ्या गल्लीत आणि पुढे आत मोकळ्या जागेत, इमारतींच्या आतमध्ये, तळघरात, अशी अनेक छोटी मद्य-नृत्यगृहं आहेत. इथून हातात हात घालून हिंडणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या साध्या चालीलासुद्धा नृत्याची लय असते नव्हे, या जादुनगरीत शिरल्यावर या भंतरलेल्या वातावरणापासून कोरडं राहणं अशक्यच ! वृद्ध स्त्री-पुरुषांच्या पायानासुद्धा पंख फुटतात. बँड वाजवणाऱ्या कलाकारांना हौशी नर्तक आग्रहानं वाइन पाजीत होते. हे ठिकाण खास वाइनसाठी म्हणून प्रसिद्ध आहे. इथून प्रसिद्ध होणाऱ्या एका

दैनिकाची कॉपी आम्ही आणली. त्यात पहिल्या पानावर थोड्या स्थानिक बातम्या आणि आतली सर्व पानं भरून, तिथे मिळणाऱ्या तऱ्हेतऱ्हेच्या वाइन्सची माहिती, त्याच्या किंमती, त्याची वेगवेगळ्या भाषातली नावं—इत्यादी अनेक तपशील होते. खास मद्याला वाहिलेलं हे कदाचित एकमेव दैनिक असावं. नृत्यगृहातून वाद्य वाजवणाऱ्या संगीत पथकाची माहिती व फोटोदेखील त्यात होते

यानंतर म्युनिकमधलं स्थळदर्शन जवळजवळ संपलंच होतं. बावीस जून रोजी आम्ही सरहद्द ओलांडून ऑस्ट्रियाला जाऊन यायचं ठरवलं. सॉल्सबर्ग हे शहर सरहद्दीजवळच आहे भल्या पहाटे निघालो. वाटेत हिटलरचं समरहाऊस लागलं तिथे उतरून थोडा वेळ इकडं, तिकडं भटकलो. पुढे सॉल्सबर्गला पोचेपर्यंत उन्हं वर आली होती.

शहराच्या मध्यवर्ती भागात मोत्झार्ट या जगप्रसिद्ध संगीतकाराचा पुतळा आहे याचं अनावरण १८४२ सालात त्याच्या दोन मुलांच्या उपस्थितीत झालं. मोत्झार्ट रहात असलेली दोन घरं या शहरात आहेत. दोहोंचं म्युझियममध्ये रूपांतर करण्यात आलं आहे. त्याची सर्व वाद्यं मांडून ठेवलेली आहेत. टेपवर त्याचं ध्वनिमुद्रित संगीत ऐकू येत. त्याच्या घराच्या एका खोलीत त्या काळच्या रंगभूमीची छोटी मॉडेल्स करून ठेवलेली आहेत. त्याचप्रमाणे त्यानं स्वरबद्ध केलेल्या रचनांची पुस्तकं, त्याचे व त्याच्या कुटुंबियांचे अनेक फोटो इथे पाहायला मिळतात. त्याचं अगदी पहिलं वाद्यदेखील जपून ठेवलेलं आहे मोत्झार्टच्या पुतळ्याभोवती एक छोटीशी बाग आहे आणि त्यात लाल गुलाबाचे ताटवेच्या ताटवे फुललेले होते. तिन्ही त्रिकाळ मन प्रसन्न करणारे त्याच्या संगीताचे स्वरच जणू फुलांच्या रूपानं त्याच्या भोवती रुंजी घालत होते.

सॉल्सबर्गला जायचं म्हटल्यावर स्टीफन झ्वाईग या सुप्रसिद्ध लेखकाचं घर देखील पाहायचं ठरलं होतं. झ्वाईग हा 'ह्या'चा आवडता लेखक. त्याच्या आग्रहानं मीदेखील त्याचं साहित्य वाचलंय मूळचा हा ऑस्ट्रियन ज्यू. त्याच्या 'द वर्ल्ड ऑफ यस्टरडे' या आत्मचरित्रात्मक पुस्तकात त्याच्या साहित्यिक प्रांतातली यशाची चढती कमान पाहायला मिळते 'कॅलिडोस्कोप' हा कथासंग्रह, 'बिवेअर ऑफ पिटी' ही कादंबरी, 'थ्री मास्टर्स' हे चरित्रात्मक पुस्तक असे अनेक ग्रंथ, ज्यांनी लोकप्रियतेचे सर्व उच्चांक मोडले. तो म्हणतो, "माझ्या पुस्तकांची रॉयल्टी इतकी प्रचंड येऊ लागली की मीच माझ्या प्रकाशकांना सांगितलं की माझा रॉयल्टीचा

दर कमी करा, म्हणजे लोकाना माझी पुस्तकं आणखी कमी किंमतीत वाचायला मिळतील'' त्याच्या 'एका अनामिकेचे पत्र' किंवा 'रॉयल गेम' या कथावर चित्रपटदेखील निघाले आहेत 'रॉयल गेम' या कथेचा विषय तर अगदी नावीन्यपूर्ण आहे. तुरुंगात एकान्तवासाची शिक्षा भोगत असलेल्या एका कैद्याला जिणं असह्य होतं. वेळ जाता जात नाही अशा वेळी त्याच्या हातात बुद्धिबळा-विषयीचं एक पुस्तक पडतं. ते वाचून-वाचून त्या खेळात तो इतका पारंगत होतो की शेवटी जगातल्या सर्वांत मोठ्या चॅंपियनलादेखील तो हरवतो. त्याच्या दृष्टीनं हा खेळ हा केवळ एक फावल्या वेळचा छंद नसून, त्याचं अवघं आयुष्य झपाटून टाकणारा एक अनुभव असतो. चित्रपटात ही त्याची अवस्था फार सुंदर रीतीनं चित्रित करण्यात आली आहे.

असा हा स्टीफन झ्वाईग दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी हिटलरच्या अत्याचाराचं भक्ष्य ठरला. त्याचे अनेक निकटचे कुटुंबीय ज्यू हत्याकांडात ठार झाले. तो आपल्या पत्नीसह जर्मनी सोडून ब्राझीलला गेला परंतु तिथं नव्यानं आयुष्याला सामोरं जाणं फार कठीण गेलं. अशाच खचलेल्या मानसिक अवस्थेत त्यानं पत्नीसह आत्महत्या केली. पुढं झालेला हिटलरचा पाडाव पाहण्यास तो जिवंत नव्हता. हिटलरची राजवट म्हणजे त्याच्या संवेदनाक्षम व्यक्तिमत्त्वाच्या दृष्टीनं कल्पान्तच होता तेव्हा मृत्यूला कवटाळण्याशिवाय त्याला गत्यंतरच राहिलं नाही.

तिथल्या एका टूरिस्ट ऑफिसमध्ये त्याच्या घराविषयी चौकशी केली तर तिथली पोरगी खांदे उडवून म्हणाली, "दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी मी जन्मालासुद्धा आले नव्हते—'' अर्थात आपलं अज्ञान झाकण्याचा हा तिचा केविलवाणा प्रयत्न होता. "मोत्झार्टच्या वेळी तू जन्माला आली होतीस का? मग त्याचं घर तुला कसं माहीत?'' असं तिला विचारावंसं वाटलं. असो! दुसऱ्या एका गृहस्थानं आम्हाला झ्वाईगच्या घराची वाट दाखवली. दुपारचं जेवण आटपून भर उन्हात आम्ही पायपीट करीत निघालो

एका रस्त्याला स्टीफन झ्वाईगचं नाव दिलेलं आहे, त्यावरून तिथंच त्याचं घर असेल अशी अटकळ बांधली रस्ता वर टेकडीवर जात होता वर चढून गेलो. पाहतो तो बंगला लांबून दिसत होता. परंतु सभोवार कुंपण होतं आणि फाटक बंद होतं. कुंपणाला वळसा घालून आम्ही बंगल्याची प्रदक्षिणा काढली. पलीकडे गर्द जंगल होतं त्यात मधूनमधून बसण्यासाठी बेंचिस होते. त्यावर

दोन बायका बसल्या होत्या. त्यांना विचारलं, 'स्टीफन झ्वाईगच घर हेच का?' त्या म्हणाल्या 'हो!' 'आम्हाला पाहायला मिळेल का आतून?' त्यांचा चेहरा शंकाकुल झाला. तेव्हा मी म्हटलं, "आम्ही दूरवरून, इंडियामधून आलो आहोत. माझा नवरा झ्वाईगच्या साहित्याचा भक्त आहे म्हणून जरा घर बघायचं होतं—" या वाक्याचा अपेक्षित परिणाम झाला. ती म्हणाली, "या घरात एक वृद्ध गृहस्थ राहतात. त्यांची परवानगी मिळाली तर पाहा."

परंतु घराभोवतीच आवार इतकं प्रचंड की घराशी संपर्क कसा साधावा तेच समजेना. परत एक प्रदक्षिणा काढीत असताना आम्हाला झुडपापाठीमागे आणखी एक फाटक दिसलं. ते आतून बंद होतं. पण त्याला कुलूप नव्हतं. आम्ही आत हात घालून ते उघडलं आणि आत प्रवेश केला वास्तविक हे असलं धाडस आम्ही एरवी कधी केलं नसतं. परक्या ठिकाणी तर मुळीच केलं नसतं. पण हा बंगला अगदी डोळ्यासमोर हाकेच्या अंतरावर असताना तो न बघता परतणं ही नामुष्की पदरी घेणं नको होतं. सुरेश म्हणाला, "आपल्याला एकदम असं बघून तो वृद्ध गृहस्थ कदाचित घाबरून जाईल. तू असं कर, तू पुढे हो. म्हणजे बाईमाणूस बघून त्याला भीती वाटणार नाही."

पाऊलवाट ओलांडून आम्ही त्याच्या बंगल्यापाशी पोचलो. बाहेर अंगणात एक वृद्ध गृहस्थ ऊन खात बसला होता आम्हाला पाहून तो एकदम चकित झाला, उठून उभा राहिला. "तुम्ही आत कसे आलात?" हा पहिला रागीट प्रश्न! पण सुरेशला जर्मन येत असल्यामुळे त्यानं खूप दिलगिरी व्यक्त केली आणि आमच्या येण्याचं कारण सांगितलं. त्यानं आमच्याकडे नीट निरखून पाहिलं सभ्य माणसं आहेत याची खात्री झाल्यावर आम्हाला अंगणातल्या लताकुंजात बसायला बोलावलं

थोड्याच वेळात तो आमचा मित्र झाला. त्याचं नाव व्हिक्टर गलोफर. तो म्हणाला, "स्टीफन झ्वाईगला शांतता फार आवडे, म्हणून तो या एकान्तस्थळी राहात असे." आम्ही घर पाहण्याची इच्छा दर्शवली तेव्हा तो आनंदानं तयार झाला. "या घराला ऐतिहासिक महत्त्व आहे, कारण इथे फ्रान्सचा सोळावा लुई (मारी आंतोनेतचा नवरा) राहून गेला होता." असं त्यानं सांगितलं. (मारी आंतोनेतची आई ऑस्ट्रियन होती.) झ्वाईगची लिहिण्याची खोली, झोपण्याची खोली, सारं काही पाहिलं. त्याच्या खाजगी आयुष्यातल्या काही गोष्टी, त्याच्या

सवयी, आवडीनिवडी यावर बोलणं झालं. तिथे जवळच त्याचं एक मोठं स्मारक करण्याची योजना होती. त्याच बांधकाम चालू होतं. ते पाहून झाल्यावर आम्ही या आजोबाबरोबर घराच्या पार्श्वभूमीवर आमचा एक फोटो काढला त्यांनी स्वत घरी बनवलेल एक फुलाच गोड सरबत आम्हाला दिलं. त्याचे आम्ही खूप खूप आभार मानले आणि परतलो. परतताना त्यानी बागेतले दोन गुलाब मला आणि अनूला दिले-- आठवण म्हणून ! त्याच्या पाकळ्या ज्ञानेश्वरीच्या पुस्तकातच ठेवायला हव्यात.

तिथून आम्ही ' साऊंड ऑफ म्युझिक 'च घर पाहायला गेलो. ' साऊंड ऑफ म्युझिक ' हा चित्रपट मी अनेक वेळा पाहिलाय. पण त्याची गोडी तिळ-भरसुद्धा कमी झालेली नाही. चित्रपटात युद्धापूर्वीच सॉल्सबर्ग दिसत. सर फॉन ट्रॅप हा तिथला निवृत्त नौदल अधिकारी. त्याची पत्नी निवर्तलेली आणि अत्यंत द्वाड अशी सात मुल. त्याना साभाळण्यासाठी मारिया या गव्हर्नेसची नेमणूक होते. प्रथम खटके उडतात, पण हळूहळू सर फॉन ट्रॅप हा मारियाच्या प्रेमात पडतो त्याच लग्न होतं. हिटलरच्या जाचातून सुटका करून घेण्यासाठी ते सार कुटुंब ऑस्ट्रियाची सरहद्द ओलाडून पलायन करतं आणि पुढे अमेरिकेत स्थायिक होतं सत्यकथेवर आधारित ही चित्रकथा आबालवृद्धाना वेड लावणारी आहे. ' सॉल्सबर्ग 'मध्ये एका चित्रपटगृहात रोज हा चित्रपट दाखवतात. आम्हाला वेळ नव्हता म्हणून, नाहीतर या चित्रपटाच्या जन्मग्रामी मी तो आवर्जून पाहिला असता. एका पुस्तकाच्या दुकानात मला ' साऊंड ऑफ म्युझिक 'विषयी एक छोटी पुस्तिका मिळाली. त्यात ट्रॅप कुटुंब ज्या घरात राहात होत, त्या घराचं चित्र होतं. त्याच्या शोधार्थ निघालो. एका रस्त्याचं नाव सर जॉर्ज फॉन ट्रॅप रोड अस दिसलं आणि हायसं वाटलं. याच रस्त्यावर त्याचं घर असावं तिथे जवळच कुठेतरी ग्लायडर्स क्लब असावा. खूपशी माणस मोठमोठे रगीबेरगी पतग घेऊन आकाशात भराऱ्या घेत होती. जणू एक पक्ष्याचा थवाच ! हे नवलदृश्य पाहात असतानाच आम्ही एका घरापाशी येऊन थडकलो पुस्तिकेतल्या चित्राशी पड-ताळून पाहता लक्षात आलं की हेच ते घर ! पिवळ्या भिंती असलेलं, एकमजली, वर उतरत छप्पर. घरात कुणी असतील का ? ( जॉर्जची नातवंड वगैरे ! ) म्हणून चौकशी केली. परतु दार-खिडक्या बंद होत्या. आत फारसा वावर दिसेना. नतर आठवलं ट्रॅप कुटुंब अमेरिकेला गेलं तेव्हा त्यानी आपलं घर

विकून टाकलं असावं. सध्या तिथे ‘ रेडक्रॉस ’ संस्थेच्या ऑफिसर्सची पाटी दिसली. तरी तिथल्या बागेत थोडे रेंगाळलो ट्रॅप मुलं इथच वागडली असतील. जॉर्ज—मारियाचा प्रणय इथच फुलला असेल या कल्पनेनं थरारल्यासारखं झालं

चित्रपटात दिसतं ते त्याचं खरं घर नव्हे. आम्ही पाहिलं ते खरं घर चित्रपटाचं शूटिंग सॉल्सबर्गच्या एका राजवाड्यात झालेलं आहे तो राजवाडा, तिथल्या बागेतलं काचेचं समरहाऊस ( जिथे ‘ यू आर सिक्सटीन ’ हे गाणं गायलेलं आहे), मारिया जिथून आली तो जोगिणींचा मठ, त्याचं लग्न झालं ते जुनं ऐतिहासिक चर्च, ही सर्व चित्र त्या पुस्तिकेत पाहिली. पण वेळ थोडा असल्यामुळे हे काहीच प्रत्यक्ष पाहता आले नाही. तरी मूळ घर पाहता आलं याचाच मला खूप आनंद झाला पुस्तिकेत खऱ्या जॉर्ज ट्रॅपचा फोटोदेखील आहे तो चित्रपटातल्या ख्रिस्तोफर प्लमरसारखा मुळीसुद्धा दिसत नाही. परंतु नौदल अधिकाऱ्याचा डौल आणि रुबाब मात्र तसाच !

या सर्व सुंदर आठवणी सोबतीला घेऊन आम्ही म्युनिकला परतलो. आणि म्युनिकहून फ्रँकफर्टला. शेवटचे दोन दिवस शॉपिंग करण्यातच गेले. मुलांच्यासाठी केस सुकवण्याचं यंत्र ( हेअर ड्रायर ), माझ्यासाठी ताक करण्याचं यंत्र ( इलेक्ट्रिक रवी ), जीन्स, सेंटच्या व शंपूच्या बाटल्या, चॉकलेट्स आणि इतर छोट्या भेटवस्तू अशी एकूण खरेदी झाली. दुकानात चॉकलेट्सच्या विभागात गेलं की मला काय घेऊ आणि काय नको असं व्हायचं. विविध प्रकारची चॉकलेट्स हारीनं मांडून ठेवलेली पाहून डोळ्याचं पारणच फिटे. तू आल्यापासून इथे चॉकलेट्स महाग झाली आहेत ' अशी सुरेश माझी थट्टा करी.

संध्याकाळी ‘ बाड हॉंबुर्ग ’च्या पार्कमधला ‘ कॅसीनो ’ बघायला गेलो. ‘ कॅसीनो ’ म्हणजे उच्चभ्रूंचा जुगारी अड्डा एका मोठ्या हॉलमध्ये खूप टेबल मांडलेली होती आणि प्रत्येक टेबलाभोवती जुगार खेळणाऱ्यांचा घोळका होता. टेबलाच्या मध्यभागी एक गोल फिरणारी तबकडी होती. तबकडीवर सभोवती आकडे होते प्रत्येक आकड्यापाशी एक छोटा खळगा होता. ज्याला खेळात भाग घ्यायचा असेल त्यानं हातानं एक गोटी घेऊन ( अशा बऱ्याच गोट्या तिथं तात्पुरत्या विकत मिळतात ) ती त्या फिरत्या तबकडीवर सोडून द्यायची. ती ज्या खळग्यात पडेल, त्यावर जो आकडा असेल, तेवढे पैसे त्या माणसाला मिळतात. शून्यापासून शंभर, हजार असे विविध आकडे त्या तबकडीवर

असतात. पैसे तिथल्या तिथ मिळत असल्यामुळे क्षणात श्रीमंती किंवा पैसे गेल्यास क्षणात गरिबी असा नशिबाचा खेळ सतत चालू असतो.

' कॅसीनो 'चा खरा आस्वाद घ्यायचा तर तिथे खेळलंच पाहिजे असं सुरेश म्हणाला आणि त्यानं पाच मार्क ( १ मार्क = अदाजे ४ रु. ) माझ्या स्वाधीन केले. आम्ही एका यंत्रापाशी आलो ( तिथे विविध प्रकारचे यान्त्रिक खेळही होते) त्या यंत्रात एक गाजर, एक टमाटो आणि एक मुळा अशी तीन चित्रं होती. भोकात मार्कच नाण टाकून कळ दाबली की ती चित्रं बदलत. कधी दोन गाजर आणि एक टमाटो, कधी दोन मुळे आणि एक गाजर याप्रमाणे ओळीनं जर तीन टमाटो किंवा तीन गाजर किंवा तीन मुळे आले तर मला पन्नास मार्क मिळणार होते. ( भोकात दोन मार्क टाकले तर बक्षीस शभर मार्क, चार टाकले तर दोनशे, याप्रमाणे ) मी सावधगिरीन प्रत्येक खेपेस एकेकच मार्क टाकीत होते. पण नशीब काही फळेना. चार चान्सिस गेले. जुगारात आपल्याला काही यश नाही असं म्हणत मी शेवटचा मार्क भोकात घातला, कळ दाबली —

आणि काय सागू ? समोर तीन लालभडक टमाटो ओळीन लटकले आणि त्याबरोबर खालच्या ट्रेमध्ये खण् खण् असा पन्नास मार्कांचा पाऊस पडला ! सुरेश ' ब्रोवो ' करून ओरडला आणि त्यान माझं अभिनदन केलं पैसे गोळा करता करता तो म्हणाला, ' तुला लक् आहे, आणखी खेळायचं का ? ' मी त्या मोहाला शरण जाणार इतक्यात माझं मध्यमवर्गीय मन ओरडलं, सावधान !' हाच तो क्षण ! साभाळ — ( द्यूतापायी राज्य गेलं इ. इ. )

मी निग्रहान म्हणाले, नको, निघू या आपण. उशीर होईल. '

अशा रीतीने मी पन्नास मार्क जिंकून जेत्याच्या थाटात बाहेर पडले. पण तिथे मी अशी अनेक माणस पाहिलं की जी भारल्यासारखी एकापाठोपाठ एक खेळ खेळत होती. काही वृद्ध स्त्रियादेखील होत्या. सर्वसाधारणपणे एकदा बक्षीस लागल की माणस खेळायच थाबवीत असतील असा माझा आपला समज पण तस नाही. पन्नास मार्कांचे हजार मार्क करायची महत्त्वाकाक्षा आणि मग त्यापायी ते पन्नासच नव्हे तर आणखी वर खिशातन देखील जातात. पण ते काही क्षण आपण एका फार वेगळ्या विलक्षण चित्तथरारक वातावरणात तरगत असतो एवढं मात्र खर !

द्यूतापायी राज्य कस गेलं असेल ते मला त्या दिवशी प्रथम कळल !

शेवटचा दिवस बांधाबांध करण्यातच गेला. सुरेशने स्वत खपून त्या दिवशी बटाट्याची भाजी, मटण करी वगैरे पदार्थ बनवले. घरीच विश्रांती घेतली. संध्याकाळी चेरीच्या झाडावरच्या चेरीज् खात खात शेतातून फेरफटका मारला. मनमोकळ्या गप्पा केल्या

२७ जून रोजी आम्ही सुरेशचा, फ्रँकफर्टचा आणि युरोपचा निरोप घेतला. निरोपचा क्षण हा नेहमीच गलबलून टाकणारा. आमची कस्टमची तपासणी होईपर्यंत थोडा वेळ गेला. सुरेशला उशीर होईल म्हणून आम्ही त्याला ' जा ' अशी पुष्कळदा खूण केली पण आम्ही आत जाईपर्यंत हात हलवीत तो तिथंच उभा होता. दोघा भावांची ताटातूट हा विषण्ण करणारा अनुभव

परतीच्या विमानप्रवासात मनाची अवस्था फार वेगळी होती जाताना मनात असलेली अनामिक भीती, हुरहूर, उत्सुकता सारं काही दूरचं वाटत होतं. आता घरची ओढ, मुलींना भेटण्याची आतुरता, एकूण प्रवासाचा शीण, तरी विविध प्रकारच्या अनुभवानी मनाला आलेली समृद्धी

' एकंदरीत युरोपचं तुझ्या मनावर कोणत चित्र उमटलं ? ' —असं मित्रमंडळी विचारतात. परतताना मी देखील हा प्रश्न मला खूप वेळा विचारला आणि मनात संशोधन केलं.

प्रथमदर्शनी एकदम छाप पडते ती तिथल्या समृद्धीची, सुबत्तेची, स्वच्छता, कार्यक्षम वृत्ती आणि सौंदर्यदृष्टीची या सर्वांचा परस्परसंबंध आहेच आणि त्यामुळ एकातून दुसर अशी ही गुणमालिकाच आहे. या सर्वांची स्तुती केली, आपण त्याच अनुकरण केलं पाहिजे असं म्हटलं की, भारतात आपल्याला एक ठरावीक उत्तर मिळतं— ' एवढं सारं असूनही त्याना सुख कुठे आहे ? घटस्फोट, अमली पदार्थांचं सेवन, म्हाताऱ्यांची समस्या असे कितीतरी प्रश्न तिथ आहेत.'

असतीलही, नव्हे आहेतच ! पण म्हणून जे चांगलं आणि अनुकरणीय आहे तिकडे कानाडोळा करून कस चालेल ? -भरल्या पोटी अध्यात्माच्या गप्पा ठीक आहेत. परंतु दोन वेळच पोटभर जेवण आणि पिण्याचं स्वच्छ पाणी या मूलभूत गरजासुद्धा आपले लाखो देशबांधव भागवू शकत नाहीत यासारखी लाजिरवाणी गोष्ट दुसरी नसावी. त्या पुरवण हे आपलं पहिलं कर्तव्य आहे— आणि ते जोपर्यंत आम्ही पार पाडीत नाही तोपर्यंत आपल्या संस्कृतीच्या सर्व गप्पा व्यर्थ आहेत असं मला वाटतं बरं, आपल्याला हे अशक्य आहे असं मुळीच नाही

मुळात चिकाटी, श्रम करण्याची तयारी, प्रामाणिकपणा, बुद्धिमत्ता हे सारं काही आपल्यापाशी भरपूर आहे. फक्त या सर्वांना गती देणारं, दिशा दाखवणारं, शिस्त लावणार असं समर्थ नेतृत्व आपल्याला हवं आहे मग या दारिद्र्याच्या गर्तेतून निघायला आपल्याला वेळ लागणार नाही. महायुद्धानंतरची युरोपची अवस्था म्हणजे भूकंपानंतरची असावी तशी होती. पण आज त्याची नावनिशाणीदेखील कुठे दिसत नाही. कसं शक्य झालं हे ? तीसुद्धा आपल्यासारखी माणसंच, आणि फार मोठ्या ताकदीची असंही नव्हे फक्त ' केल्याने होत आहे रे ! हा मंत्र त्यांना सापडलाय आर्थिक समृद्धी आली म्हणजे सर्व सुखं हात जोडून उभी राहतील, असं खुळं विधान कुणी करणार नाही. म्हणून आपल्या दारिद्र्याचं समर्थन करणं हा नतद्रष्टपणा होईल.

निसर्गाविषयीचं प्रेम, जुन्या वस्तूंविषयीचं प्रेम आणि सौंदर्यदृष्टी याचा सुरेख मेळ तिथं दिसतो निसर्गसौंदर्याला धक्का न लावता मानवी तंत्रज्ञानाचा खुबीनं उपयोग करून घेऊन त्याचा अधिक रसास्वाद कसा घेता येतो ते ठायी-ठायी दिसून येतं. म्हातारी माणसं, अपंग किंवा लहान मुलं यांच्या अडचणी लक्षात घेऊन सर्व प्रकारच्या सोयी-सवलती उपलब्ध आहेत. घरकामाला नोकरमाणसं मिळत नसल्यामुळे आपल्यापेक्षा वेगळे प्रश्न त्यांच्यापुढे उभे आहेत. शिवाय घट-स्फोट, अमली पदार्थांचं अतिरेकी सेवन इ समस्या आहेतच. परंतु त्यांची उत्तरं शोधण्याची जागरूकता, तत्परतादेखील आहे— प्रश्न लोंबकळत सोडलेले नाहीत.

पाश्चात्त्य लोक खूपसे आत्मकेन्द्रित आहेत, आपल्याइतकं आदरातिथ्य तिथं नसतं अशी आपली समजूत परंतु आम्हाला भेटलेली माणसं आदरातिथ्यात तिळभरदेखील कमी पडलेली दिसली नाहीत हे आमचं भाग्य समजावं का ? की भारतीयांशी संबंध आल्यामुळे ही मंडळी तशी झाली ? तेही काही खरं नाही. एकंदरीत प्रत्यक्ष अनुभव घेतल्याशिवाय आपले ठोकताळे बनवू नयेत हे खरं ! मला वाटतं वरवरचे शिष्टाचार, वागण्याच्या पद्धती हे सोडलं तर मुळात माणसं सगळीकडे सारखीच असतात. आपले व त्यांचे काही संस्कार वेगळे असल्यामुळे दृष्टिकोणात फरक पडतो हे खरं, पण ही वरची ढापणं निघाली की अस्सल माणूस सगळीकडे सारखाच !

तिथे स्थायिक झालेल्या किंवा वरचेवर तिथे जाऊन येणाऱ्या काही भारतीयांच्या बोलण्यात मात्र मला भारताविषयी एक तुच्छतेची भावना आढळली. भारतापुढे

अनेक प्रश्न आहेत आणि दिवसेंदिवस ते अधिकाधिक बिकट होत आहेत हे खर. पण शेवटी ते ' आपले ' प्रश्न आहेत. त्याविषयी खत हवी, दु ख हव, आपलेपणाची तळमळदेखील हवी आपली आई अशिक्षित, कुरूप किंवा गरीब असली तर आपण तिची घृणा करतो का ? तिला चागले दिवस दाखवणे हे आपलं कर्तव्य नव्हे का ? ते नसेल जमत तर निदान तिची हेटाळणी तरी करू नये एवढं तरी कळू नाही का ?

एकंदरीत आपल्या मातृभूमीविषयी मला दोन टोकाच्या भूमिका दिसल्या– एक तर आधळ प्रेम, दोषाकडे डोळेझाक करण्याची वृत्ती, दारिद्र्याचदेखील लंगडं समर्थन आणि पाश्चात्त्य समस्यांकडे बोट दाखवून समाधान मानण, आणि दुसर टोक म्हणजे तिथली सगळी समृद्धी पाहून आपली पाळमुळं विसरणं आणि भारताला तुच्छ लेखणं.

मला वाटतं, या दोहोच्या मध्ये आपण कुठेतरी असायला हवं. पाश्चात्त्याच जे काही चागल आहे ते खुल्या मनान कबूल करणं, ते आपल्यात आणण्याचा प्रयत्न करण, त्याचबरोबर परस्पर मानवी सबध जोपासणाऱ्या आपल्या भारतीय संस्कृतीत जे काही चागलं आहे ते जतन करणं, त्याचा अभिमान बाळगण आणि मुख्यत आपला देश ज्या कठीण परिस्थितीतून जात आहे त्यातून तो सहीसलामत सुटून उन्नतीच्या दिशेनं कसाजाईल यासाठी प्रयत्नशील आणि आशावादी असणं हे अत्यंत अगत्याचं आहे. या बाबतीत आपलही काही कर्तव्य आहे याची प्रथम जाणीव असायला हवी.

एका मोठ्या औषधी कपनीच्या डायरेक्टरची परवा एक सुदर आठवण सागितली. आपल्या कपनीत काही तरुण अधिकाऱ्याची भरती करण्यासाठी ते इग्लंडला गेले होते. ही तरुण भारतीय मुलं इंग्लंडमध्ये उच्च विद्याभ्यासासाठी गेलेली. त्याच पोस्टिंग ( निवड झाल्यास ) भारतात होणार होत. मुलाखतीच्या वेळी हे डायरेक्टर अर्जदाराना एक ठराविक प्रश्न विचारीत-- ' इथे सर्व सुखसोयी अधिक प्रमाणात असताना तुम्ही भारतात परतायला तयार का झालात ? ' प्रत्येकाच वेगळ उत्तर येई. कुणी म्हणे, वंशभेदाचा इथे त्रास होईल म्हणून, कुणी म्हणे, भारतात अधिक काटकसरीनं राहता येईल म्हणून. फक्त एकच उमेदवार चटकन म्हणाला, ' भारतात मी का जातो ? कारण ते माझं घर आहे म्हणून. बिकॉज इट इज माय होम ! या उत्तरान डायरेक्टर इतके चकित

झाले, भारावून गेले. ते नंतर आम्हाला सांगत होते, तत्क्षणी मी ठरवलं, याचीच निवड करायची. किती सुंदर, सोप उत्तर–बिकॉज इट इज माय होम!'

याचा अर्थ तिथे स्थायिक झालेले सर्व भारतीय देशद्रोही आहेत असं मुळीच नव्हे. उलट भारतीय बुद्धिमत्तेचं निशाण त्रिखंडात फडकतय् ही अभिमानाचीच गोष्ट आहे. मी फक्त मानसिक बांधिलकीविषयी बोलते आहे. एक तिथे असलेले उच्चपदस्थ सुखसमृद्ध गृहस्थ मला म्हणाले, 'मी भारताविषयी वाचतो, ऐकतो तेव्हा फार अस्वस्थ होतो. काहीतरी काँक्रीट केल्याशिवाय मला चैन पडायचं नाही–' अशी मंडळीदेखील पुष्कळ भेटली. इथे कुठेतरी सूर जुळल्यागत होतो.

युरोपात छोटी बाळ पाहणं हा एक अनोखा अनुभव होता. एकही मूल मला अशक्त, किरकिर, रोगट असं दिसलं नाही. सगळीच सुंदर, गुटगुटीत, आनंदी! तिथं जन्माला आलेली भारतीय पिढी ही या दृष्टीनं भाग्यवान खरी. पण ती भारताला मात्र पुरती दुरावणार यात शंका नाही. एक मैत्रीण म्हणाली "पूर्वी खेड्यातून मुंबईला येणं म्हणजे पुरतं दुरावणं असं समजत. नंतर सवय झाली. युरोपात किंवा अमेरिकेत स्थायिक होणं हे देखील हळूहळू अंगवळणी पडेल. जग हळूहळू लहान होतंय्. जाणं-येणंसुद्धा सोपं होतंय्."

हे विश्वचि माझे घर ही भावना वाढीस लागलेलसं दिसतंय. एकूणच जाणिवेच्या कक्षा रुंदावताहेत, क्षितिजं विस्तृत होताहेत– आपलं काय? परकं काय? मधल्या भिंती धूसर होताहेत!

विविधरंगी युरोपचं अंतरंग दीड महिन्यात कितीसं कळणार? त्यासाठी पुन्हा पुन्हा जायला हवं.

जी मंडळी आमच्या आधी युरोपला जाऊन आलेली आहेत, त्यांच्याशी गप्पा करताना, 'लंडनला राहून तुम्ही हाइड पार्कमधलं भाषण एकलं नाहीत? कमाल आहे!' किंवा 'पॅरिसला जाऊनही नाईट क्लब्ज पाहिले नाहीत? आणि लूव्रचे म्युझियमसुद्धा नाही? अहो सांगता काय? म्हणजे, पंढरपूरला जाऊन विठोबाचं दर्शन न घेण्यासारखं आहे' असे उद्‌गार ऐकायला मिळतात. आम्ही स्वतंत्रपणे हिंडायला गेलो होतो तरी वेळेच्या मर्यादा असतातच शिवाय काही वेळा नशीब आडवं येतं. (लूव्रच्या कामगारांना त्याच वेळी संपावर जाण्याची बुद्धी का व्हावी? इंग्लंडच्या थॅचरबाईंना त्याच वेळी वर्सायला कॉन्फरन्स ठेवण्याची इच्छा का झाली? त्यामुळे पंधरा दिवस राजवाडा बंद ठेवण्यात आला.) याशिवाय

दूधदुभत्यानं संपन्न असे स्कॅंडिनेव्हियन देश, प्राचीन तत्त्वज्ञानाचे आगर असलेला सॉक्रेटिसचा ग्रीस देश, जन्माला आल्यावर एकदा तरी पाहिलंच पाहिजे असं म्हणतात ते रोम आणि इटलीमधली इतर कलासक्त शहरं—असं खूप काही पाहायचं राहूनच गेलं.

पण त्यातही एक गंमत आहे. कारण युरोपचं आकर्षण अजून मनात कायम आहे. ' जिचा सहवास इतका ओढ लावणारा होता की त्यामुळे तृप्ती, होण्या-ऐवजी, जितकी इच्छापूर्ती अधिक तितकी अतृप्ती अधिक ' असं शेक्सपिअरनं क्लिओपात्राचं वर्णन केलं आहे. हेच युरोपविषयी म्हणता येईल ज्याप्रमाणे ' जोपर्यंत जगण्यात गंमत आहे तोपर्यंत मरण्यात स्वारस्य आहे.' असं म्हणतात त्याप्रमाणे ' जोपर्यंत अधिक काही पाहावंसं वाटतंय् तोपर्यंतच प्रवास संपायला हवा- '

असाच तो संपला. एक चुटपूट, एक खंत, एक ओढ मनात घेऊनच आम्ही परतलो. पुन्हा कधी जायला मिळेल या प्रतीक्षेतसुद्धा एक आनंद असतो नाही का ?

नीलाक्षीच्या डोळ्यांत एक संदेश होताच—

' पुनरागमनाय च ! ' असा !

REFBK-0024486

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६-६२
रा. क. २४८६
२५ २०।९।९
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

दूधदुभत्यानं संपन्न असे स्कॅंडिनेव्हियन देश, प्राचीन तत्त्वज्ञानाचे आगर असलेला सॉक्रेटिसचा ग्रीस देश, जन्माला आल्यावर एकदा तरी पाहिलंच पाहिजे असं म्हणतात ते रोम आणि इटलीमधली इतर कलासक्त शहरं--असं खूप काही पाहायचं राहूनच गेलं.

पण त्यातही एक गंमत आहे. कारण युरोपचं आकर्षण अजून मनात कायम आहे. ‘ जिचा सहवास इतका ओढ लावणारा होता की त्यामुळे तृप्ती, होण्याऐवजी, जितकी इच्छापूर्ती अधिक तितकी अतृप्ती अधिक ’ असं शेक्सपिअरनं क्लिओपात्राचं वर्णन केलं आहे. हेच युरोपविषयी म्हणता येईल. ज्याप्रमाणे ‘ जोपर्यंत जगण्यात गंमत आहे तोपर्यंत मरण्यात स्वारस्य आहे.’ असं म्हणतात त्याप्रमाणे ‘ जोपर्यंत अधिक काही पाहावंसं वाटतंय् तोपर्यंतच प्रवास संपायला हवा– ’

असाच तो संपला. एक चुटपूट, एक खंत, एक ओढ मनात घेऊनच आम्ही परतलो. पुन्हा कधी जायला मिळेल या प्रतीक्षेतसुद्धा एक आनंद असतो नाही का ?

नीलाक्षीच्या डोळ्यांत एक संदेश होताच–

‘ पुनरागमनाय च ! ’ असा !

REFBK-0024486

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६६२
दा. क्र. २७४८८६
२५ २०/९/८५
ग्रंथ, शाखा (स्थळ प्रत)